
ऑक्टोबर १९७१

# अर्थ

दिवाळी अंक

"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र



# सर्वच कॉर्डुरॉ शूज सारखे असतात काय?


अर्थातच नाहीं, स्वस्तिकच्या

''लीडर'' बाबत बोलावयाचे तर..

**स्वस्तिक**

**लीडर**





व्हिनिलीन सोल्स

वैशिष्ट्यपूर्ण व्हिनिलीन सोल्स मुळें 'लीडर' कॉर्डुरॉ शूज खास शीतल, दीर्घकाळ टिकाऊं आणि आरामदायक ठरले आहेत. स्वस्तिकचे 'लीडर' कॉर्डुरॉ शूज आजच खरेदी करा अन् मित्रमंडळी मध्यें आपला रुबाब वाढवा.

स्वस्तिकचीं पादत्राणे म्हणजे उत्तम गुणवत्ता आणि मितव्यय यांचा सुरेख संगमच !

किंमत रु १८=९५ स्थानिक कर वेगळे.

**स्वस्तिक रबर प्रॉडक्टस् लि.,**

खडकी, पुणे-३ (भारत)


ठाकरसी कापडाने फॅशनची रंगत वाढते!
पुढचं पाऊल काय टाकावं हे कळेनासं होतं तेंव्हा—प्रथम ठाकरसी कापड वापरा. मग कोणत्याहि कामासाठी आवश्यक सळसळतं चैतन्य, उल्हसित करणारा उत्साह आणि तरतरी वाटू लागेल! फॅशंनच्या क्षेत्रांत आघाडीवर राहण्यासाठीं खुशाल पाऊल टाका नि ठाकरसीचं कापड घ्या. एव्हरफ्रेश (६७% 'टेरीन' ३३% कॉटन) साड्या, फ्रॉकचे कापड, शर्टिंग्ज आणि सूटिंग्ज, स्क्रीन प्रिंट्स, २×२ पॉप्लिन, रंगीत/प्रिंटेड् कॅम्ब्रिक्स, वॉयल्स, डॉबीज्, जेकार्डस्, आणि अनेक प्रकारचे कापड.
Madison/HSW/4 Mar
दि हिंदुस्थान स्पिनिंग अॅण्ड वीव्हिंग मिल्स लि., १६, अपोलो स्ट्रीट, मुंबई-१


नवी दिवाळी नवी सुरूवात ।
सुख समृध्दीची हो बरसात ॥
किर्लोस्कर
किर्लोस्कर ऑईल एंजिन्स लिमिटेड,
पुणे-३ (भारत)
® एंजिनसाठी किर्लोस्कर ऑईल एंजिन्स लिमिटेड यांनी या ट्रेडमार्कच्या उपयोगाचा अधिकार नोंदविलेला आहे.


आपली आवड
बेडेकर
उत्पादनें
बेडेकर मसाले, लोणचीं, पापड व इतर उत्पादनें उत्तम साफ केलेले कच्चे पदार्थ व या विषयांतील ५५ वर्षांचा रोजचा अनुभव यामुळें सर्वांनांच आवडतात. आपणही अनुभव घ्या.
MANGO PICKLE
पापड
बेडेकर
व्ही. पी. बेडेकर ॲन्ड सन्स प्रायव्हेट लि.
मुगभाट, मुंबई ४
B.VASANT 165

# ☆ अर्थ ☆

दिवाळी अंक

बुधवार, २० ऑक्टोबर, १९७१





संस्थापक :

प्रा. वामन गोविंद काळे

संपादक :

श्रीपाद वामन काळे


"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र.

## संपादकीय

अर्थाचा ३७ वा वार्षिक दिवाळी अंक वाचकांस सादर करण्यास आम्हांस आनंद वाटत आहे.

ह्या दिवाळीत वाचकांना विशेष प्रकारचे पौष्टिक खाद्य पुरविण्याचा आम्ही प्रयत्न केला आहे. आपण आपल्या नागरिकांच्या मानसिक विकासाकडे पुरेसे लक्ष दिलेले नाही. शिक्षणाचा प्रसार पुष्कळ झाला आहे. शिक्षणावर होणाऱ्या खर्चात वाढही खूप होत आहे. परंतु हे शिक्षण विकासाला प्रेरणा देणारे नसून उत्पादनापेक्षा उपभोगाकडे नेणारे आहे. त्यामुळे शिक्षणावरील खर्च वाया जात आहे, इतकेच नव्हे तर तो पुढील पिढ्यांचे अतीव नुकसान करणारा ठरणारा आहे. विकासाची प्रेरणा वाङ्मयातून मिळावयाची असते; जसे वाङ्मय तशी प्रेरणा. (१) इतरांच्यापेक्षा श्रेष्ठ ठरण्याची इच्छा आणि (२) समाजाचे हित घडवून आणण्याच्या गरजेची जाणीव, ह्या दोन मानसिक अवस्था उत्कर्षाला आवश्यक व पोषक असतात. ह्या दृष्टीने, भारताने आपल्या शिक्षणात आमूलाग्र सुधारणा घडवून आणायलाच हवी; त्याखेरीज राष्ट्रीय विकास अशक्य आहे. सामाजिक हिताची भावना चित्रित करणारे बालवाङ्मय ज्या देशात निर्माण झाले, तेच देश कालांतराने द्रुतगतीने प्रगत झाले, हा इतिहासाचा अनुभव आहे. ह्या अंकातील पहिल्या लेखात ह्या विषयाचे दिग्दर्शन करण्यात आले आहे.

दुसऱ्या लेखात प्रा. वि. म. दांडेकर ह्यांनी व्यवहारवादी, व्यवहार कुशल नेतृत्वास वैचारिक बैठकीची गरज आहे असे सांगून आमच्या बरोबरच स्वतंत्र झालेले, आमच्या सारख्याच बिकट आर्थिक समस्या असलेले दुसरे लहान–मोठे देश पुढे गेले, ते का ? ह्या प्रश्नांची उत्तरे देऊन नेतृत्वास अनुरूप आणि आवश्यक अशा तऱ्हेचे शिक्षण देण्याची व्यवस्था झाली पाहिजे, असे त्यांनी प्रतिपादन केले आहे. सामाजिक व राजकीय कार्यकर्त्यांना काही शिक्षण हवे, ते पद्धतशीर, उच्च दर्जाचे आणि विचारप्रवर्तक हवे, याची दखल अजून महाराष्ट्रातील नेतृत्वाने घेतलेली नाही असे त्यांनी कळकळीने म्हटले आहे. उद्योगधंद्यातील मॅनेजमेंटचे महत्त्व डॉ. एन. के. कुलकर्णी ह्यांनी समजावून सांगितले आहे. मॅनेजरची संघटक आणि तंत्रज्ञ अशी दुहेरी भूमिका कशी असते, ह्याबाबतीत आपणास किती वाटचाल करावयाची आहे, हे डॉ. कुलकर्णी ह्यांच्या लेखावरून लक्षात येईल.

उत्कर्षाला उत्साही, वैचारिक नेतृत्व हवे; आर्थिक शिस्तही तितकीच आवश्यक असते. आपल्याजवळील त्रोटक भांडवलाचा योग्य उपयोग करून विकासाच्या प्रयत्नांची शिकस्त करावयाची म्हटली, म्हणजे दिरंगाई, अनास्था, वेळ मारून नेणारे निर्णय, 'पुढचे पुढे' ची वृत्ती, ह्यांना स्थान राहता कामा नये. भांडवल पुरविणाऱ्या संस्थांची ह्याबाबत जबाबदारी डॉ. वसंत पटवर्धन ह्यांनी विशद केली आहे.

ग्राहक सहकारी संस्थांच्या अपयशाची मीमांसा आकडेवारीच्या साह्याने एका लेखात देण्यात आली आहे, तर श्री खं. म. खंडागळे ह्यांनी अल्पप्रगत नागरी सहकारी बँकांची कैफीयत मार्मिकपणे मांडली आहे. सहकारी हौसिंग सोसायट्यांच्या व्यवहारावर विदारक प्रकाश टाकणारा हायकोर्टाचा निवाडा झाकलेली परिस्थिती स्पष्ट करून दाखवील. सहकारी बँकांतले कर्मचारी आणि त्यांच्या व्यथा हा श्री. शशिकांत कुलकर्णी ह्यांचा लेख संबंधितांच्या दु:खांना वाचा फोडणारा आहे.

भारताच्या आर्थिक विकासास निर्यात व्यापाराचे महत्त्व अनेकवार सांगितले गेलेले आहे. निर्यातीमधील बराच बोजा नवीन उद्योगधंद्यांना वाहावा लागणार आहे. मालाचा दर्जा आणि योग्य किंमत याशिवाय इतर गोष्टीही स्पर्धेत यशस्वी होण्यासाठी आवश्यक असतात, त्यांपैकी वेळेवर माल पोचविणे आणि परदेशी कारखानदारांना द्यावे लागणारे क्रेडिट, ह्या दोन गोष्टींचे विवेचन श्री. बी. डी. कानिटकर ह्यांनी आपल्या लेखात केले आहे. ह्या दोन्ही बाबी कित्येक वाचकांना नवीन वाटतील.

कस्टम्सच्या कोंडाळ्यामुळे होणारे हाल परदेशी प्रवाशांना भारतात उतरण्यास नाउमेद करणारे आहेत. त्याचे दिग्दर्शन एका लेखात केलेले आढळेल, तर श्री. राजाध्यक्षांनी आपल्या लेखात हॉटेलच्या धंद्याचे राष्ट्रीय, आर्थिक महत्त्व वर्णन केले आहे. श्री. शंकरराव थत्ते ह्यांनी केलेल्या साहसाला कसकसे सक्रीय उत्तेजन मिळत गेले, त्याची हकीकत कौतुकास्पद वाटेल.


'ग्राहकांच्या बदलत्या वृत्तीचे सामाजिक परिणाम' आणि 'लठ्ठपणा टाळण्यासाठी काय करावे ?' ह्या लेखांची योजना सुस्थितीच्या परिणामांकडे लक्ष वेधण्यासाठी करण्यात आली आहे.

**ही दिवाळी व नवे वर्ष आमच्या सर्व हितचिंतकांना व वाचकांना सुखाचे जावो !**

## अनुक्रमणिका


१ संपादकीय ७
२ जसे वाङ्मय तशी प्रेरणा ९
३ आता गरज वैचारिक नेतृत्वाची १३
४ आर्थिक शिस्त अंगी बाणून घेणार काय ? १५
५ भारताच्या आर्थिक विकासात निर्यात व्यापाराचे महत्त्व १९
६ उद्योगधंद्यातील मॅनेजमेंटच्या कार्याचे स्वरूप २१
७ करमुक्त उत्पन्नाची मर्यादा २३
८ ग्राहक सहकारी सोसायट्यांची दुरवस्था २९
९ अल्पप्रगत नागरी सहकारी बँका ३३
१० कस्टम्सच्या कोंडाळ्यात विमान प्रवाशांचे हाल ३५
११ हॉटेल व्यवसायाच्या विकासाला हातभार ३९
१२ डिझेल एंजिनांच्या धंद्यातील मंदी ४१
१३ हाऊसिंग सोसायट्यांच्या व्यवहारावर विदारक प्रकाश ४३
१४ माझ्या यशातील भले-बुरे ४५
१५ लठ्ठपणा टाळण्यासाठी काय करावे ? ४७
१६ ग्राहकांच्या बदलत्या वृत्तीचे सामाजिक परिणाम ५१
१७ सहकारी बँकांतील कर्मचारी आणि त्यांच्या व्यथा ५९


**वाचकांस सूचना : दिवाळीनिमित्त सुटीमुळे "अर्थ" चा दि. ३ नोव्हेंबरचा अंक प्रसिद्ध होणार नाही. त्यानंतर १७ नोव्हेंबरचा अंक नेहमीप्रमाणे प्रसिद्ध होईल.**





ही दिवाळी व नूतन वर्ष आपणां सर्वांस
आनंददायक व सुखसमृद्धीकारक जावो !

**किर्लोस्कर ब्रदर्स लिमिटेड** उद्योगभवन, टिळक रोड पुणे २
कारखाने • किर्लोस्करवाडी व कराड (महाराष्ट्र)
• देवास (म. प्र.)

# आर्थिक उत्कर्षाला पोषक अशी मानसिक अवस्था हवी
# जसे वाङ्मय, तशी प्रेरणा

काही समाज झपाट्याने विकास पावतात, तर काही समाज थंड गोळ्यासारखे राहातात ह्याचे रहस्य समजून घेतले पाहिजे. आंध्र प्रदेशातील काकिनाडा येथील प्रयोगाची ही हकीकत उत्साहवर्धक वाटेल. "धोपटमार्गा सोडुं नको" ह्या उपदेशाचा त्याग केल्याखेरीज विकास अशक्य आहे.

काही देश झपाट्याने आर्थिक आणि सामाजिक विकास घडवून आणतात, तर काही देशांची प्रगती तर नाहीच, पण पुच्छप्रगती होताना आढळते. ख्रिस्त शकापूर्वी ६०० वर्षे काळात अथेन्सची वाढ का होत गेली आणि थोड्याच शतकात त्याची संस्कृती एवढी का फैलावली ? ख्रिस्तशकापूर्वी ४०० वर्षे ह्या काळात रोमन्सना कार्थेजिनिअन्सकडून एकसारखा पराभव पत्करावा लागत होता; तरी सुद्धा जहाजांचे नवे काफिले बांधण्यासाठी त्यांनी पैसे कसे उभारले आणि अखेर ते कसे यशस्वी झाले ? उत्तर अमेरिका खंडाच्या ज्या विभागात इंग्रजांनी वसाहत केली, तो विभाग आर्थिक दृष्ट्या कसा सत्वर समृद्ध झाला आणि ज्या विभागात प्रथम स्पॅनिअर्डसनी वसाहत केली, तो अगदी परवा परवापर्यंत मागासलेला का राहिला ? १९ व्या शतकात जपानने आर्थिक प्रगतीसाठी झपाट्याने पावले उचलली, पण चीन जागच्याजागीच का राहिला ? आर्थिक विकास आणि आधुनिकीकरण ह्यांना प्रेरणा कोठून मिळते, ह्या प्रश्नाच्या उत्तरात वरील सर्व प्रश्नांचे उत्तर सामावलेले आहे. हारवर्ड विद्यापीठाच्या 'सामाजिक संबंध' विभागाचे प्रमुख, प्रोफेसर डेव्हिड सी. मॅकलेलँड ह्यांनी हे उत्तर देण्याचा प्रयत्न केला आहे. भारताच्या विकासाच्या दृष्टीने त्यांचे विवेचन अत्यंत मोलाचे ठरेल.

मानसशास्त्रज्ञांनी एका विशिष्ट मानसिक प्रेरणेला ह्या बाबतीत अत्यंत महत्त्वाचे स्थान दिले आहे. कोणत्याही व्यक्तीत ही प्रेरणा भिनली, म्हणजे तो विशेष उत्साहाने सर्व कामे करू लागतो असे आढळून आले आहे. कुठलीही गोष्ट अधिक चांगली, कसोशीने, लवकर, कार्यक्षमतेने, कमी श्रमात करण्यास तो त्यामुळे प्रवृत्त होतो. काही जणांना मनातले विचार प्रकट करण्यास सांगितले, तर 'अ' म्हणतो, "माझी परीक्षा जवळ आली आहे, पण माझ्या प्रेयसीबद्दलच्या विचारामुळे मला अभ्यासावर लक्ष केंद्रित करता येत नाही." 'ब' म्हणतो, "मला पुढे इंजिनिअरिंग कॉलेजात जावयाचे आहे, तेव्हा मला वरचा नंबर मिळविलाच पाहिजे. मी रात्री जागरण करून अभ्यास करतो, पण मी परीक्षेत पुरेसा वर येईनना, ह्याची मला चिंता वाटते." 'ब' ची उत्कर्षाची प्रेरणा प्रबळ असल्यामुळे तो जास्त मार्क मिळवितो.

ही प्रेरणा वाङ्मयातून मिळत असते. जसे वाङ्मय, तशी मानसिक प्रेरणा. उदाहरणार्थ, ग्रीक वाङ्मयात (ख्रिस्तपूर्व सातवे ते सहावे शतक) असे प्रेरक लिखाण भरपूर होते; १६ व्या शतकातील इंग्रजी वाङ्मयाची प्रेरक शक्ती तत्कालीन स्पॅनिश वाङ्मयापेक्षा अतिशय प्रभावी होती. त्यामुळेच त्या काळातील ग्रीक त्यानंतरच्या ग्रीकांपेक्षा आर्थिक दृष्ट्या कितीतरी प्रबळ झाले; तीच गोष्ट उत्तर अमेरिकेतील स्पॅनिअर्डसच्या तुलनेने इंग्रजांची.

इसवी सन १४०० ते १८०० ह्या काळातील (ट्यूडर राजवट ते औद्योगिक क्रांतीचा काल) इंग्रजी वाङ्मयाच्या प्रत्येक २५ वर्षांच्या कालखंडातील लोकप्रिय वाङ्मयाची छाननी केली आणि त्याबरोबरच इंग्लंडच्या आर्थिक वाढीची छाननी केली, तर काय आढळले ? वाङ्मयातील प्रेरणेचा अंश वाढला, म्हणजे सुमारे ५० वर्षांनी त्यामुळे आर्थिक विकासाला गती मिळते, असे दोनदा दिसून आले (एकदा १५२५ च्या सुमारास आणि पुनः १७२५-१७५० च्या सुमारास). ह्या उलट, वाङ्मय गुळमुळीत झाले म्हणजे कालांतराने आर्थिक विकासही मंदावतो असेहो दोनदा दृष्टोत्पत्तीस आले. लहान मुलांच्या आणि तरुणांच्या हातात पडणाऱ्या वाङ्मयाचे सुपरिणाम किंवा दुष्परिणाम अशा रीतीने तात्काळ लक्षात येत नाहीत पण कालांतराने ते जाणवतात. हे सर्व कसे घडते ह्याची तात्त्विक चर्चा करण्यापेक्षा प्रत्यक्ष उदाहरणानेच ते दाखवून देणे श्रेयस्कर होय.

विकासाची प्रेरणा आर्थिक उत्कर्षाच्या दृष्टीने महत्त्वाची असते, हे लक्षात आल्यावर एकाद्या जनसमूहात त्या प्रेरणेचे बीजारोपण करून त्याचे परिणाम काय होतात ते अभ्यासणे इष्टच ठरते. एका समूहाला ह्या प्रेरणेचा संसर्ग करावयाचा आणि दुसऱ्या समूहाला करावयाचा नाही आणि त्यांच्या आर्थिक प्रगतीची तुलना करावयाची.

ह्या प्रयोगासाठी आंध्र प्रदेशातील १,००,००० लोकवस्तीचे, बंगालच्या उपसागराला लागून असलेले काकिनाडा हे गाव निवडण्यात आले. पूर्वीच्या संशोधनाने दाखवून दिलेले होते की, उत्कर्षाच्या बीजारोपणास व्यापारी लोक सर्वात पोषक असतात. कारण, त्यांच्या वृत्तीत आर्थिक उत्कर्षाची तळमळ असण्याचा संभव असतो. तेव्हा त्यांच्यात विकासाची वृत्ती जोपासता येण्याची शक्यता अधिक. म्हणून काकिनाडाच्या व्यापाऱ्यांना ह्या प्रयोगात सामील होण्याचे आवाहन करण्यात आले. हैद्राबाद ह्या ३५० मैल दूरच्या शहरात जाऊन, तेथील स्मॉल

इंडस्ट्रीज एक्स्टेंशन केंद्रात १० दिवसांच्या स्वयंविकासाच्या कार्यक्रमात भाग घेऊन आत्मनिरीक्षणाची आणि कामाकडे स्वतंत्र बुद्धीने पाहण्याची व्यवस्था ह्या प्रयोगात करण्यात आली होती. १९६४ मध्ये एकूण ५२ जणांना चार गटात मिळून हे प्रशिक्षण देण्यात आले.

हा अभ्यासक्रम पूर्णपणे स्वेच्छेचा, एकत्र राहण्याचा, कसून कष्टाचा होता आणि १७ वर्षांच्या प्रेरणाविषयक माहितीचा त्यासाठी उपयोग करून घेण्यात आला होता. जमलेल्या व्यापाऱ्यांत उत्कर्षाची प्रेरणा रुजवण्यात हा अभ्यासक्रम बऱ्याच अंशी यशस्वी झाला. त्यावरून आणि इतर ठिकाणच्या पाहणीवरून असा अंदाज आहे की, अशा व्यापाऱ्यांपैकी सुमारे एक-तृतीयांश व्यापारी वैशिष्ट्यपूर्ण आणि नावीन्यपूर्ण व्यावसायिक उपक्रमास प्रवृत्त होतात. ते नवीन जिन्नस बनवू लागतील, काही तरी विशेष करून पगारात वाढ घडवून; आणतील किंवा हिशेब ठेवण्याचे शिक्षण घेण्यास प्रवृत्त होतील.

काकिनाडा येथील शिबिरानंतर त्यांपैकी दोन-तृतीयांश व्यापाऱ्यांनी नवे मार्ग चोखाळण्यात विशेष रस घेण्यास प्रारंभ केला. शिबिरानंतर कित्येक जण स्वतःच्या धंद्याकडे अधिक चांगले लक्ष देऊ लागले. काहींचा वडिलार्जित धंदा होता (उदाहरणार्थ, सायकलचे दुकान). काम नोकरांवर सोपवून मालक आराम करू शकत असत, ते आता दुकानात जास्त लक्ष घालू लागले, ते लवकर येऊ लागले, उशिरा घरी जाऊ लागले, गिऱ्हाइकांकडे जास्त लक्ष देऊ लागले; त्यांची कमाई वाढली.

कित्येकांना पूर्वी असे वाटावयाचे की, धंदा ठीक चालला आहे, तेव्हा आणखी कष्ट करा कशाला ? तेच आता अधिक कष्ट करण्यास प्रवृत्त झाले : पैसा कमाविण्यासाठीच केवळ नव्हे, तर अधिक चांगल्या तऱ्हेने धंदा करण्यासाठी, काकिनाडासाठी आणि भारतासाठी अधिक काही करून दाखविण्यासाठी. त्यामुळे अधिक मानसिक समाधान लाभते, ह्याची त्यांना जाणीव झाली होती. काही जणांनी नव्या गोष्टी करून पाहण्यास प्रारंभ केला. एका छायाचित्रकाराने चष्म्याच्या काचा घासून बनविण्यास प्रारंभ केला कारण त्या तेथे मिळत नव्हत्या. धान्याच्या दुकानदाराने नवीन प्रकारची दळणाची गिरणी बसविण्याचे ठरविले. जुन्याऐवजी काहीतरी नवीन, चांगले करण्याच्या जिद्दीने हे सर्वजण प्रेरित झाले होते.

कित्येकांनी आपले पैसे गुंतविण्याचे मार्ग बदलले. स्थानिक बँक मॅनेजर पूर्वी फक्त तारणाप्रमाणे कर्जे द्यावयाचा. बहुधा जमिनीचे तारण घेतले जावयाचे. त्यामुळे श्रीमंत जमीनदारांनाच फक्त कर्ज मिळावयाचे : त्यांना कर्ज वापरण्याची आवश्यकता असो वा नसो; त्यांची कर्जमागणी लग्नासारख्या अनुत्पादक बाबींसाठीच बहुधा असावयाची. त्यामुळे ह्या बँकेचे कर्ज देण्याचे धोरण लवचीक नसावयाचे. शिबिरानंतर हाच बँक मॅनेजर




कर्जदाराची हुशारी आणि ज्यासाठी कर्ज हवे त्या उपक्रमाची पात्रता पाहून कर्जे देऊ लागला. ही दोन क्रांतिकारक 'तारणे' जमिनीच्या तारणाइतकी सुरक्षित खासच नव्हती; त्यात धोक्याचा अंश होता. परंतु, ह्या कर्जदारांच्याबद्दलचा त्याचा अनुभव अद्यापपावेतो तरी समाधानकारक आहे. त्याला कलकत्त्याला अधिक चांगल्या पगाराची नोकरी आली, तरी त्याने ती न पत्करता काकिनाडा येथेच राहून येथील लोकांच्या विकासास हातभार लावण्याचे ठरविले; त्यात त्याला काही तरी समाजकार्य केल्याचा अभिमान वाटत होता. स्वतःचे काम अधिक चांगले करण्याच्या ईर्षेचा स्थानिक उत्कर्षास आता अशा रीतीने हातभार लागला.

"मला दर शेकडा दरमहा २ टक्क्यांनी पूर्ण तारणावर कर्जे देता येतात; तेव्हा मी गावाच्या उद्धारासाठी कशाला कर्जे देऊ?" असे एका बँकरने विचारले. उद्योगधंद्यांना कर्जे देऊन स्वतःचे नुकसान करून घ्यायला, व्याज मिळण्यासाठी काही काळ थांबायला तो तयार नव्हता. त्याच्या प्रश्नाला आर्थिक उत्तर नाही. परंतु, काकिनाडामधील ही मूलग्राही समस्या आहे. तेथे श्रीमंत घराणी पुष्कळ आहेत, त्यामुळे भांडवलाचा तुटवडा नाही. पण विकासाच्या योजनात गुंतविण्यासाठी आर्थिक कारण सांगता येणार नाही. त्याला उत्तर एकच; "शिबिराला जाऊन आल्यानंतर, गप्प बसल्याने त्याचा स्वाभिमानच नाहीसा होईल; त्याने काहीच हातपाय हलविले नाहीत, तर तो कंटाळून जाईल." हे उत्तर आर्थिक दृष्ट्या बिनतोड नाही, परंतु तो अगदी आर्थिक-पेक्षा थोड्या वेगळ्या प्रेरणेने प्रभावित होऊन लघुउद्योगांना कर्जे देण्यात सार्थक मानू लागला.

काहींनी नवे उद्योग सुरू केले. एका रेडिओच्या दुकानदाराने रंगाचा आणि व्हार्निशचा कारखाना काढला. त्याने पैसे उभारले, केमिस्ट नेमला, यंत्रसामग्री आणली आणि थोड्याच अवधीत तयार मालाच्या विक्रीस प्रारंभ केला. त्याने सर्व साधकबाधक विचार करून ही हिम्मत केली; स्वतः जबाबदारी पत्करून काहीतरी वैशिष्ट्यपूर्ण करून दाखविले.

थोडक्यात म्हणजे, काकिनाडामध्ये छोटीशी एक क्रांतीच घडून येऊ पाहात आहे. ह्या क्रांतीने मूळ धरल्यास आर्थिक विकास झपाट्याने घडून येणार आहे. तेथील लोकांना बाहेरून आर्थिक किंवा तांत्रिक मदत मिळालेली नाही, हे ध्यानात धरायला हवे; कल्पना, हेतू, प्रेरणा, ही त्यांनी बाहेरून घेतली. त्याचे परिणाम मात्र किती दूरगामी ठरणारे आहेत! बँका, सिनेमागृहे, दुकाने, छापखाने, गिरण्या, ही सर्व ह्याच व्यापाऱ्यांच्या नियंत्रणाखाली असल्याने त्यांची कृती आणि निर्णय ह्यांचा त्या सर्वांचे उत्पन्न, मागणी, शेतकऱ्यांना मिळणारा बाजारभाव ह्या सर्वांवर म्हणजे समाजाच्या सर्व प्रकारच्या आर्थिक जीवनावर होणार आहे.

उत्कर्षाची जिद्द असली म्हणजे मनुष्य समाजाला उपयुक्त अशीच गोष्टी करील असेच काही नाही; सदसद्विवेकबुद्धीच्या अभावी तो यशस्वी चोरही बनू शकेल! तथापि, काकिनाडा प्रयोगातील लोकांच्या बाबतीत त्यांनी स्वतःपुरतेच पाहिले नाही. काकिनाडा, भारत, सबंध जगाच्या उद्धाराची त्यांच्यांत तळमळ निर्माण झाली होती. सर्वांच्या हितासाठी एकत्र येऊन सहकार्याने प्रयत्न करण्यास ते उद्युक्त झाले होते. अशी सामाजिक हिताची भावना चित्रित करणारे बालवाङ्मय ज्या देशात निर्माण झाले, ते देश कालांतराने द्रुतगतीने प्रगत झाले, असाच अनुभव आहे. अविकसित किंवा विकासाची गती असणाऱ्या देशातील बालवाङ्मयात परंपरेवर भर दिलेला आढळला; नावीन्यावर नव्हता. गोष्टीतील माणसे पूर्वी असेच करीत असत म्हणून त्यांचे अनुकरण करायचे; इतर माणसांच्या गरजांचा विचार नाही करायचा. आपल्या परिचयाचे इतर नव्हे तर परकेही लोक ह्यांच्याही कल्याणाचा विचार परंपरेची जागा घेतो, तेव्हा विचारसरणीत खूपच इष्ट असा फरक पडतो.

सार्वजनिक आरोग्य आणि शिक्षणप्रसार ह्यामुळे कालांतराने आर्थिक विकास २० वर्षांनी घडून येतो, असा ३०–४० विकसनशील देशांतील अनुभव आहे. सर्वांच्या हिताच्या विचाराचे आर्थिक प्रगतीत अशा रीतीने रूपांतर होते.

कोणत्याही वंशापुरते किंवा वातावरणापुरते हे संक्रमण मर्यादित नाही; ते लष्करी मुलुखगिरीवर अवलंबून नाही. तांत्रिक प्रगतीने ते आपोआप घडून येत नाही. काकिनाडा येथील मासे पकडणाऱ्या कोळ्यांना भारत सरकारने नायलॉनची जाळी दिली; ती जाळी टिकाऊ असतात, लवकर फाटत नाहीत; त्यात जास्त मासे पकडता येतात. त्यामुळे कोळ्यांची पैशाची मिळकत वाढते, त्यातून उपभोग्य जिनसांची खरेदी करता येते, धंदा वाढविता येतो. प्रत्यक्ष काय घडले? कोळी जास्त मासे पकडू लागले पण पूर्वी इतके मासे पकडून होताच काहीजण मासे पकडणे थांबवू लागले म्हणजे कमी काम करू लागले; काहींनी जास्त पैसे कमावले पण ते हातभट्टीच्या दारूत उधळले. मासे पकडण्याची जाळी सुधारली, पण मच्छीमारी करणारे कोळी काही सुधारले नाहीत.

औद्योगिक क्रांतीच्या वेळी भूमध्य समुद्राच्या उत्तरेकडील रहिवासी कितीही पुढे गेले तरी दक्षिणेकडील रहिवाशांना त्याचा स्पर्शही झाला नाही. त्यांचा आणि उत्तरेकडील लोकांचा संपर्क आला, तरी त्यांना प्रेरणा घेता आली नाही. अरब लोकांना युरोपियनांच्या यांत्रिकीकरणात मुळीच रस वाटला नाही. ह्याउलट प्रेरणा असेल तर यांत्रिकीकरणास सत्वर चालना मिळते, हे काकिनाडाच्या रेडिओच्या दुकानदाराने दाखवून दिले.

प्रगतीसाठी तळमळ असणारे धर्म आपल्या अनुयायांत व्यावहारिक यशाची तळमळ निर्माण करतात, असा इतिहासाचा दाखला आहे. पश्चिम युरोपमधील 'प्रोटेस्टंट रेफर्मेशन'ने काकिनाडातील व्यापाऱ्याप्रमाणे नव्या जिद्दीचे व्यापारी व

कारखानदार निर्माण केले. भारतातील पारशी व जैन, वेगवेगळ्या देशातील ज्यू, जपानमधील समुराई, पूर्व आशियात किंवा आफ्रिकेत स्थाईक झालेले भारतीय, ह्या सर्वांनी अर्थव्यवहारात वैशिष्ट्यपूर्ण प्रगती करून दाखविलेली आहे. आजूबाजूच्या लोकांपेक्षा आपण श्रेष्ठ आहोत, ह्याची मनोमन खात्री पटली म्हणजे उद्धाराची गुरुकिल्ली आपणाजवळच आहे अशी भावना निर्माण होते आणि तेच त्यांच्या असामान्य यशाचे रहस्य आहे.

(१) इतरांच्यापेक्षा श्रेष्ठ ठरण्याची इच्छा, आणि (२) समाजाचे हित घडवून आणण्याच्या गरजेची जाणीव, ह्या दोन मानसिक अवस्था आर्थिक उत्कर्षाला आवश्यक व पोषक आहेत, असा निष्कर्ष निघतो.

विसाव्या शतकातील कम्युनिस्ट देशांनी अशा मानसिक अवस्था घडवून आणण्यात बरेच यश संपादन केलेले दिसते. काकिनाडा शिबिराप्रमाणे आपण व्यक्ति-व्यक्तित वैयक्तिक उत्कर्षाचे आणि सामाजिक जबाबदारीचे बीजारोपण करून त्याला खतपाणी करू शकतो. स्वतःच्या प्रेरणेला आधुनिकीकरणाचे वळण देण्याचा हा प्रश्न आहे.

GREETINGS FROM

**SUKDOW**

THE TRUSTED NAME IN GOA

M/s. SUKDOW INDUSTRIAL
M/s. SUKDOW & COMPANY
M/s. SUKDOW AGENCY

SUKDOW BUILDING
POST BOX 208
MARGAO

दीपावली अभीष्टचिंतन

**दि कोल्हापूर शुगर मिल्स लि.**

साखरेप्रमाणेच रासायनिक धंद्यातही अग्रेसर.

प्रत्येक कुटुंबाची आवड :—

शुभ्र, दाणेदार, मोहक व गोडच गोड साखर

*अनेक धंद्यांत आवश्यक असणारी आमची रसायने—*

ॲसेटिक ॲसिड, एन् ब्युटेनॉल, ब्युटाईल ॲसिटेट, ॲबसोल्युट अल्कोहोल, रेक्टिफाईड व डिनेचर्ड स्पिरिट.

आमची उत्पादने उत्कृष्ट व नाणावलेल्या दर्जाची असतात.

भारतातील एक प्रमुख अद्ययावत कारखाना.

दि कोल्हापूर शुगर मिल्स लि.
कसबा बावडा, कोल्हापूर नं. ३.

# आता गरज वैचारिक नेतृत्वाची

( वि. म. दांडेकर, संचालक, गोखले अर्थ-शास्त्र संस्था, पुणे )

स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या गेल्या २०–२५ वर्षांत महाराष्ट्रात ज्या अनेक राजकीय, सामाजिक व आर्थिक घटना घडल्या, स्थित्यंतरे झाली, त्यामध्ये महाराष्ट्राच्या नेतृत्वात गेल्या २०–२५ वर्षांत जो आमूलाग्र बदल झाला त्याला मी, विशेष, महत्त्व देतो. स्वातंत्र्यपूर्व काळात महाराष्ट्राचे नेतृत्व पुष्कळसे शहरी, ब्राह्मणी वा अन्य बुद्धीजीवी वर्गाकडे होते. स्वातंत्र्योत्तर गेल्या २०–२५ वर्षांत ते हळूहळू ग्रामीण श्रमजीवी बहुजनसमाजाकडे गेले. हे स्थित्यंतर आता जवळजवळ पूर्ण झाले आहे. ते ज्या पद्धतीने घडले ते सर्व महाराष्ट्रास भूषणावह आहे.

साहजिकच हे नेतृत्व बहुतांशी स्वातंत्र्योत्तर लोकशाही राजकारण आणि शासकीय वा शासननियंत्रित आर्थिक विकासाचे कार्यक्रम यांतून निर्माण झालेले आहे. ते राज्यव्यवहारकुशल, आर्थिक समृद्धीच्या प्रेरणा असलेले आणि व्यवहारवादी आहे. सुदैवाने त्याला राजकीय स्थैर्य प्राप्त झालेले आहे. आगामी दहा वर्षे ते अबाधित राहील असा संभव दिसतो. म्हणूनच आगामी दशकातील संभाव्य घटनांचा जेव्हा मी विचार करतो तेव्हा या दशकात महाराष्ट्रास भूषणावह असे नेतृत्व देण्यास आजचे आणि आगामी नेतृत्व समर्थ आहे का ? आणि नसले तर ते समर्थ कसे होईल ? हे प्रश्न प्रामुख्याने माझ्या मनात येतात.

याबाबत माझे मन काहीसे साशंक का आहे ते स्पष्ट करतो. महाराष्ट्राचे आजचे नेतृत्व व्यवहारकुशल आहे हे मी म्हटलेच आहे. राजकीय सत्ता आणि आर्थिक सत्ता यांच्या अन्योन्य संबंधाचे या नेतृत्वास चांगले आकलन आहे. राजकीय सत्तेतून आर्थिक सत्ता कशी प्राप्त करावी आणि या आर्थिक सत्तेतून पुनश्च राजकीय सत्ता कशी हस्तगत करावी याचे तंत्र या नेतृत्वास अवगत आहे. राजकीय व आर्थिक सत्ता अबाधित ठेवण्याकरता त्यांचे किमान विकेंद्रीकरण का व कसे करावे हे या नेतृत्वास चांगले कळते आणि हे त्याने कुशलतेने साधलेले आहे. दुसऱ्या शब्दांत सांगावयाचे तर या नेतृत्वाने महाराष्ट्रभर राजकीय कार्यकर्त्यांचे एक प्रभावी जाळे निर्माण केलेले आहे आणि प्रत्येक कार्यकर्त्यास ज्याच्या त्याच्या स्थानानुरूप सत्तेचा अंश त्याने प्रदान केला आहे. साक्षेपी मोजदाद केली तर मला वाटते या संघटनेत चार ते पाच हजार कार्यकर्ते निघतील. महाराष्ट्रातील प्रस्थापित राजकीय सत्ता आणि त्या अनुषंगाने प्राप्त झालेली आर्थिक सत्ता ह्यांचे हे एवढे भागीदार आहेत. वरपासून खालपर्यंत ते व्यवहारवादी व्यवहारकुशल आहेत आणि एकमेका अवघे साहाय्य करून एकत्र उभे आहेत. हे नेतृत्व जनताभिमुख आहे याचा अर्थ हे चारपाच हजार कार्यकर्ते परस्पराभिमुख आहेत. या नेतृत्वास जनतेचा पाठिंबा आहे हा अभास आहे. कारण जनता सत्तेची पुजारी आहे; सत्तेपरता नाही धर्म, सत्ता हेचि परब्रह्म असे मनोमन मानणारी आहे. जुन्या सरंजामशाहीतील समाजव्यवस्था आणि त्यावर आधारलेली दीडशे वर्षांची ब्रिटिश राजवट यांचा हा वारसा आहे. या मनोवृत्तीतून जनता अजून स्वतंत्र झालेली नाही. ती कोणत्याही सत्तेस पाठिंबा दिल्याखेरीज राहणार नाही. समाजातील स्वतःस बुध्दिजीवी म्हणविणारा जुना व नवा लहानसा वर्गही याला अपवाद नाही.

अशा या व्यवहारवादी, व्यवहारकुशल नेतृत्वास जर कसली उणीव असली तर ती वैचारिक बैठकीची आहे. किंबहुना वैचारिक बैठक सहसा व्यवहारवादात अडचणी उत्पन्न करणारी अशा समजुतीने या नेतृत्वाने ती बुद्धिपुरःसर टाळलेली आहे असे वाटते. वैचारिक तत्त्वचिंतन प्रासंगिक समारंभ साजरे करण्यास उपयुक्त असते हे जाणून लहानमोठे सर्व नेते प्रसंगानुरूप विचारपरिप्लुत उत्तम भाषणे करतात. परंतु दैनंदिन राजकीय व्यवहार त्यापासून अलिप्त ठेवतात. हे केवळ अधिकारारूढ नेत्यांबाबतच खरे आहे असे नाही. विरोधी नेतृत्वाबाबतही ते खरे आहे. राजकीय विरोध उभा करावयाचा तर त्यास काहीतरी वैचारिक बैठक हवी हे जाणून विरोधी पक्ष वैचारिक तत्त्वचिंतनाचा ऊसना आव आणतात. परंतु प्रत्यक्ष व्यवहारास असले तत्वचिंतन अप्रस्तुत आहे असे त्यांसही वाटत असावे असे दिसते. म्हणून विरोधाचेही केवळ नाटकच होते. सामान्य जनास तर अधिकारारूढ पक्ष जाणि विरोधी पक्ष यांतील फरक जाणवतच नाही.

असो. या व्यवहावादी व्यवहारकुशल नेतृत्वाने महाराष्ट्राचा सामाजिक, राजकीय व आर्थिक व्यवहार गेली २०–२५ वर्षे जरी कुशलतेने संभाळला असला तरी हा निव्वळ व्यवहारवाद आगामी दशकात उद्‌भवणाऱ्या प्रश्नांना तोंड देण्यास समर्थ ठरेल असे मला वाटत नाही. राजकीय स्वातंत्र्यानंतर अपरिहार्यपणे झालेली सामाजिक घडामोड आणि शासनाने मोठ्या प्रमाणात अंगीकारलेला आर्थिक विकासाचा कार्यक्रम यांमुळे गेली वीस वर्षे समाजात काही नव्या प्रेरणा, नव्या अपेक्षा, नव्या आकांक्षा निर्माण झाल्या. त्या भरतीवर समाजाचा व्यवहार चालू राहिला. ती भरती आता ओसरू लागली आहे. गेल्या २०–२५ वर्षांत अंगीकारलेल्या मार्गाने काही सामाजिक व आर्थिक प्रगती होऊ शकते हे सामान्य जनास मान्य आहे. परंतु अशा प्रगतीच्या मर्यादाही आता लक्षात येऊ लागल्या आहेत. स्वातंत्र्यानंतर जन्मलेली नवी पिढी आता पुढे येत आहे. आगामी दशकात ती ठायी ठायी उभी राहिलेली दिसेल. स्वातंत्र्यपूर्व काळाच्या मानाने काही प्रगती झालेली आहे हे सांगून तिचे समाधान होणार नाही. वर्तमान परिस्थितीतील असमाधानाने अस्वस्थ होऊन ती नवीन प्रश्न

विचारू लागेल. त्यास तोंड देण्यास आजचे व्यवहारवादी नेतृत्व आणि त्याच पठडीतून पुढे येणारे आगामी नेतृत्व पुरे पडणार नाही.

दीडशे वर्षांपूर्वी ब्रिटिश राजवट आली, त्याबरोबर पाश्चात्य संस्कृती, समाजव्यवस्था आणि अर्थव्यवस्थेची ओळख झाली. त्याने वैचारिक कोलाहल निर्माण झाला. त्या निमित्ताने झालेल्या विचारमंथनात महाराष्ट्रातील विचारवंत भारतात अग्रेसर होते. पुढे गांधीयुग आले आणि एक नवीन वैचारिक व नैतिक भूमिका प्रस्थापित झाली आणि त्या भूमिकेशी निष्ठा असलेले नवे नेतृत्व निर्माण झाले. त्याचबरोबर कम्युनिझमूचा उदय झाला. कम्युनिझम् हा एक नवा मूलगामी विचार असल्यामुळे कम्युनिस्ट पक्षाने त्याच्या वैचारिक भूमिकेचा निष्ठेने प्रचार केला आणि त्यातून नव्या निष्ठेचे नवे कार्यकर्ते निर्माण केले. या दोनही वैचारिक चळवळींत महाराष्ट्र आघाडीवरच होता. गेल्या २०-२५ वर्षांच्या धडामोडीत या वैचारिक उपासनांची पडझड झालेली आहे. परंतु आगामी दशकात तरुण पिढी जे प्रश्न उपस्थित करणार आहे ते तितकेच मूलगामी असणार आहेत. राजकीय स्वातंत्र्य मिळून इतकी वर्षे झाली तरी बहुजन होते तेथेच का ? सरंजामशाही नष्ट झाली, परंतु लोकशाहीत नव्या महाजनांचे राज्य प्रस्थापित होऊ पाहात आहे ते का ? आमच्याबरोबरच स्वतंत्र झालेले, आजच्यासारख्याच बिकट आर्थिक समस्या असलेले दुसरे लहानमोठे देश पुढे गेले ते का ? इत्यादी प्रश्न आगामी दशकात विचारले जातील. त्यांची उत्तरे आलबेलची भाषणे करून देता येणार नाहीत.

आगामी दशक हे भारतात आणि महाराष्ट्रात पुनश्च एका वैचारिक मंथनाचे दशक ठरणार आहे. त्याकरिता महाराष्ट्रातील नेतृत्वाने सिद्ध झाले पाहिजे. निदान ज्येष्ठ नेत्यांनी तरुण, उदयोन्मुख नेत्यांची त्याकरिता सिद्धता केली पाहिजे. ही सिद्धता करावयाची तर ज्ञानाची, विचारांची उपासना करावयास हवी. विविध देशांचा राजकीय व आर्थिक इतिहास, राजकीय व आर्थिक तत्त्वज्ञान आणि तत्त्वमीमांसा यांचा सखोल अभ्यास करावयास हवा. वास्तविक पाहता विद्यापीठातील एतद्विषयक शिक्षणातून हे काम व्हावयास हवे. परंतु दुर्दैवाने आज ते होत नाही. विद्यापीठातील या विषयाचे अभ्यासक्रम सर्वथा अप्रस्तुत व निरर्थक झालेले आहेत. त्यातून नवी वैचारिक परंपरा निर्माण होण्याचा मुळीच संभव नाही. या संबंधात केव्हा सुधारणा होईल ती होवो परंतु तोवर निदान तरुण नेतृत्वाकरिता नेतृत्वास अनुरूप आणि आवश्यक अशा तऱ्हेचे या विषयांचे शिक्षण देण्याची व्यवस्था झाली पाहिजे.

सामाजिक व राजकीय कार्यकर्ते आणि नेते, उद्योगपती व उद्योगधंद्यातील वरिष्ठ अधिकारी आणि शासनातील वरिष्ठ अधिकारी हे तीन वर्ग समाजाचे राजकारण व अर्थव्यवहार सांभाळीत असतात. यांपैकी शासनातील वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या शिक्षणाकडे प्रथमपासूनच लक्ष दिलेले आहे आणि अलीकडे त्यात आवश्यक त्या सुधारणाही होत आहेत. उद्योगधंद्यातील वरिष्ठ व्यक्तींच्या शिक्षणाकरताही खास संस्था आता निघाल्या आहेत आणि वाढत आहेत. आज सोय नाही ती समाजिक व राजकीय कार्यकर्त्यांच्या शिक्षणाची. किंबहुना त्यांना काही शिक्षण हवे, ते पद्धतशीर, उच्च दर्जाचे आणि विचारप्रवर्तक हवे याचीच दखल अजून महाराष्ट्रातील नेतृत्वाने घेतलेली नाही. आगामी दशकात अपरिहार्यपणे होणाऱ्या वैचारिक क्रांतीत महाराष्ट्रास अग्रेसर राहावयाचे असेल तर महाराष्ट्रातील नव्या तरुण नेतृत्वाच्या शिक्षणाची अशी उपेक्षा करून चालणार नाही.

( पुनर्मुद्रित )


"विना सहकार नहीं उद्धार"

## दि जळगांव जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लिमिटेड, जळगांव

मुख्य कचेरी : नवी पेठ, महात्मा गांधी रोड, जळगांव
टेलिफोन नं. ४४९, १५४, १३४

स्थापना : १९१६ ] [ तारेचा पत्ता—" इकोबँक "

चेअरमन—श्री. बापुसाहेब के. एम्. पाटील, एल्एल्. बी.

व्हाईस चेअरमन—श्री. प्रल्हादराव एकनाथराव पाटील, एल्एल्. बी.

व्यवस्थापक—श्री. गो. स. शहाणे, बी. कॉम., एच. डी. सी., जी. डी. सी. अँड ए.

एकूण शाखा—५२

ता. २७—८—७१ अखेर आकडे लाखांत

| | |
|---|---|
| ( १ ) अधिकृत भाग भांडवल | २००·०० |
| ( २ ) खपलेले भाग भांडवल | ९३·५४ |
| ( ३ ) गंगाजळी व इतर फंडस् | ७९·४९ |
| ( ४ ) एकूण ठेवी | ७७९·२१ |
| ( ५ ) एकूण खेळते भांडवल | १२६४·७२ |
| ( ६ ) सहकारी संस्थांना दिलेले कर्ज | ९५१·८८ |

- भारतातील प्रमुख शहरी हुंड्या, बिले वगैरे वसुलीची व्यवस्था केली जाते.
- सर्व प्रकारच्या ठेवी आकर्षक दराने स्वीकारल्या जातात.
- सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.
- जळगांव—चोपडा—चाळीसगांव—यावल—पारोळा—जामनेर व पाचोरा येथे सेफ डिपॉझिट व्हॉल्टसूची व्यवस्था आहे.
- बँकेत ठेवलेला पैसा जिल्ह्यातील शेती उत्पादनासाठी व शेतकऱ्यांच्या समृद्धीसाठी उपयोगात आणला जातो.

# आर्थिक शिस्त अंगी बाणून घेणार काय ?

फर्म्स, लिमिटेड कंपन्या, कर्जपुरवठा करणाऱ्या संस्था, पब्लिक सेक्टरमधील उपक्रम आणि प्रत्यक्ष सरकार ह्यांच्या कसोटीची ही वेळ आहे.

( डॉ. वसंत पटवर्धन, जॉईंट जनरल मॅनेजर, बँक ऑफ महाराष्ट्र. )

आपल्या देशात औद्योगीकरणाची प्रगती बऱ्या प्रकारे झाली असली, तरी "औद्योगीकरण म्हणजे उत्पादन" असेच समीकरण अद्याप मानले जात आहे. त्याच्या व्यवस्थापनाकडे–आर्थिक, विक्रीबाबत, मानवी घटकांबाबत–पुरेसे लक्ष दिले जात नाही. काही मोठ्या कंपन्या ह्याला अपवाद आहेत, हे खरे आहे. पण, मध्यम आणि लघु उद्योगांत त्याचे महत्त्व पटलेले दिसत नाही. पैसे आले म्हणजे तातडीच्या गरजा भागविण्यासाठी खर्ची टाकणे व्यवस्थापकांना भाग पडते. अल्प मुदतीच्या ठेवी दीर्घ मुदतीच्या उद्दिष्टांवर खर्चिल्या जातात; दीर्घ मुदतीच्या उद्दिष्टांसाठी घेतलेले व राखून ठेवलेले पैसे तावडतोबीच्या, नाइलाजाच्या अटळ खर्चासाठी वापरले जातात.

अशा उद्योगधंद्यांना पैसे कर्जाऊ देणाऱ्या बँकांनी ह्याबाबत दक्ष राहायला हवे, इतकेच नव्हे तर कर्जदारांना जागे करून शिक्षित करायला हवे. आपण उत्पादक कार्यासाठी पैसे देत आहो, ह्या सत्कृत्य करीत असण्याच्या भावनेत बँका गुंग होत्या. आपण कारखान्यांना दिलेला पैसा कुठे आणि कसा खर्च होतो इकडे बँकांनी लक्ष दिले असते आणि त्यांना घसारा न काढलेल्या किंवा झिजलेल्या नेट ब्लॉकच्या तारणावर कर्जे घेण्यास प्रत्यवाय केला असता, तर भारतभर विखुरलेल्या 'सिक' कारखान्यांची समस्या निर्माणच झाली नसती. "माल आणि / किंवा यंत्रसामग्री ह्यांचे तथाकथित तारण आपण घेतले आहे, तेव्हा मी फिकीर करायचे काय कारण आहे" अशी वृत्ती बँकांनी धारण करण्यात समाधान मानले. गेली कित्येक वर्षे, ठेवींच्या जाहिरातीत काही तपशील देण्याचे बंधन कपन्यांवर अस्तित्वात आहे, त्याचप्रमाणे वसूल भांडवल आणि मुक्त गंगाजळी ह्यांच्या २५% पेक्षा जास्त मुदती ठेवी घ्यावयाच्या नाहीत असेही त्यांच्यावर बंधन आहे. ह्या सोप्या तरतुदींचे पालन करून बिगर-तारण कर्जे घेण्यास कंपन्यांना मुभा आहे. "ह्या सोप्या तरतुदींचे" असे म्हणण्याचे कारण, ताळेबंदात खूप मोठा तोटा दाखवूनही ठेवी घेण्यास परवानगी आहे. हा तोटा वसूल भांडवल अधिक मुक्त (?) गंगाजळी ह्या पेक्षाही मोठा असला तरी हरकत नसते. भागधारकांकडून कर्जे घेण्याच्या नावाखाली कंपन्या ठेवी घेऊ शकतात; अशा ठेवीदारांच्या नावे एकादा भाग वर्ग करून ठेवीदाराला भागधारक बनविले म्हणजे त्याची ठेव कर्ज म्हणून गणली जाते, ठेवीवरील बंधने तिला लागू होत नाहीत !

अर्थात, हे सर्व केल्यामुळे कंपनी फार काळ टिकेलच असे नाही. तोट्याची रकम फुगतच जाते, कामगारांना पुरेसे वेतन मिळू शकत नाही. आपले पैसे प्रारंभापासून भागात गुंतविणाऱ्यांना वर्षानुवर्षे डिव्हिडंड मिळत नाही आणि कंपनी मात्र चालू राहते. प्रारंभीच्या काळीच नव्हे तर पुढे अनेक वर्षे तोटा सोसणारी कंपनी आपले भांडवलही नष्ट करते आणि तरी ती चालू राहते. त्याचा भुर्दंड कुणावर तरी, केव्हातरी, पडणार हे उघड आहे. त्यांच्या ते आज लक्षात येणार नाही, एवढेच.

विशिष्ट कंपनीच्या हितासाठीच नव्हे तर समाजाच्या हिताच्या दृष्टीनेही, अर्थव्यवहारांच्या निरोगीपणासाठी, आर्थिक बाबतीत कडक शिस्त अमलात आणणे आवश्यक झाले आहे. भांडवलाचा जास्तीत जास्त उपयोग केला जाऊन चलनवाढही रोखली जावी, ह्या दृष्टीने अनेकविध उपाय योजायला हवेत. ह्यासंबंधातील नियमांची कसोशीने अमलबजावणी केली गेली पाहिजे आणि कंपनी कायद्यात आवश्यक ती सुधारणा करण्यात आली पाहिजे.

कारखान्यांना बँकांमार्फतच सामान्यतः कर्जपुरवठा केला जाणे, ही ह्या उपायातील पहिली पायरी आहे. सध्या दिली जाणारी कर्जे उत्पादनासाठी, कच्च्या मालाच्या खरेदीसाठी किंवा चालू अथवा भांडवली गरजा भागविण्यासाठी असतात. शेतीच्या व्यवसायात खत जमिनीत जिरते, आणि ते दिसून येत नाही. तसे कारखानदारीत होत नाही. प्रत्येक क्रिया डोळ्याला दिसत असते. तेव्हा, कर्जाच्या तारणाबद्दल एवढा आरडाओरडा का केला जावा, ते समजत नाही. कर्जाच्या पैशामुळे जर एखादी जिंदगी निर्माण झाली, तर ताळेबंदात दुसऱ्या बाजूस कर्जाची रकम दाखविली जाते. मार्जिन ठेवलेले नाही, असे मानले तरी कर्जाला १०० % तारण असते. त्याची मूळ किंमत कर्जाच्या भांडवलाइतकी असतेच. तेव्हा, बँकांनी ह्या बाबीवर भर द्यावा आणि कर्जाने निर्माण होणारी जिंदगी तारण म्हणून देण्यास कचरण्याचे कारण नाही ही गोष्ट कर्जदारांना पटवून द्यावी.

लहान कर्जदारांना ही दक्षता आवश्यक आहे; आर्थिक शिस्तपालनाची ती पहिली पायरी आहे. इतर कर्जदारांनाही तिची तर जास्तच आवश्यकता आहे. प्रत्येक कर्जदाराने आपला ताळेबंद तयार केला पाहिजे आणि त्यातील प्रत्येक नोंद काय दर्शविते हे नीट समजून घेतले पाहिजे. अशा छाननीचा कर्जदाराप्रमाणे धेणेकऱ्यांना, ठेवीदारांना आणि लिमिटेड कंपनीच्या बाबतीत भागदारकांनाही फायदा होतो. कारण, त्यावरून धंद्याची परिस्थिती आपोआप ध्यानात येते. ताळेबंदात द्यावयाच्या तपशिलाच्या बाबतीत आता बरीच सुधारणा झाली असली

तरी अद्याप त्यात दर्शविलेल्या गोष्टींपेक्षा लपविलेल्या गोष्टीच अधिक असतात, हे विकसित पाश्चात्य देशांतही जाणकार ओळखतात. अधिक तपशील देणे कंपनीच्या हिताचे होणार नाही, कारण त्यामुळे स्पर्धकांना यशाचे मर्म कळेल, ह्यावर ग्रेटब्रिटन मध्येही कुणी विश्वास ठेवीत नाही. तेथील बँकांनी स्वतःची गुप्त गंगाजळी ताळेबंदात प्रकट करून इतर कंपन्यांवर आघाडी मारली आहे.

अशा प्रकटीकरणाची भारतातही आवश्यकता आहे; त्यामुळे सर्वसाधारण माणसाला, नोकरवर्गाला, पार्लमेंटला, बँकांचा कारभार कसा चालला आहे हे कळू शकेल. बँकांप्रमाणे इतर कंपन्यांच्या कारभाराचाही अधिक तपशील जाहीर व्हायला हवा; त्यांचा कामगारवर्ग आणि ग्राहक ह्यांनाही कंपन्यांबद्दल तपशील कळणे अगत्याचे आहे.

घसाऱ्याचीच बाब घेऊ या. 'फिक्स्ड' जिंदगीचे पूनर्मापन करतेवेळी घसाऱ्याची पद्धत बदलली जाते. कित्येक वेळा घसारा मुळीच काढला जात नाही. जरी न काढलेला घसारा संचालकांच्या किंवा ऑडिटरांच्या अहवालात निदर्शित केला असला तरी वाचक ते सबंध वाचीत नसल्यामुळे ताळेबंदातील आकड्यांमुळे त्यांची दिशाभूल होईल. धंदा लिमिटेड कंपनीच्या स्वरूपात नसेल, तर पूर्वी न काढलेल्या घसाऱ्याचा उल्लेखही आढळणार नाही. म्हणून, काही किमान आकाराच्या पेक्षा मोठ्या आकाराच्या (उदाहरणार्थ, स्वतःचे आणि / किंवा कर्जाऊ भांडवल २५ लक्ष रु.पेक्षा अधिक असेल तर किंवा विक्री २५ लक्ष रु. पेक्षा जास्त असेल तर) धंद्यांवर लिमिटेड कंपनीत रूपांतर करण्याची सक्ती करण्याची आता खरोखरीच वेळ आलेली आहे. त्यामुळे अशा फर्म्सना आपले हिशेब आपोआपच ठराविक पद्धतीने नेहमीच सादर करावे लागतील.

अर्धवट तयार माल आणि तयार माल ह्यांच्या मूल्यमापनाचा प्रश्न नेहमीच बिकट असतो. मोठ्या कंपन्या किंवा प्रायव्हेट कंपन्या आपले खरे मोठे नफे लपविण्यासाठी किंमत कमी लावतात, तर नुकसानीत चाललेल्या कंपन्या त्याची किंमत वाढवून दाखवितात, कारण त्यांना लोकांच्याकडून पैसे आकर्षित करायचे असतात. अर्धवट तयार मालाची म्हणजे वर्क्स-इन-प्रोग्रेसची अचूक किंमत ठरविणे कठीण असते. भारतात अशा मालाला बँका तारण म्हणून स्वीकारीत असतात. (वास्तविक ह्या तारणाला काहीच बाजारभाव नसतो; कारखाना बंद पडला तर त्याला किंमत येऊ शकत नाही.) तेव्हा त्याची किंमत कच्च्या मालाच्या किंमतीपेक्षा जास्त लावली जाता कामा नये. ही किंमतही खरेदीची किंवा बाजारभावाची, जी कमी असेल तीच, लावायला हवी. कंपनी कायद्यात ह्या सुधारणा घडून यावयास हव्यात.

उद्योगधंद्यांच्या प्राथमिक अवस्थेत अशा तऱ्हेने सर्व गोष्टी पैसे गुंतविणारांना उघड करून दाखविल्याने सगळे प्रश्न सुटतील असे म्हणणे धाष्टर्याचे होईल. पण त्यामुळे बाहेरील दडपणामुळे


पैसा झाडाला लागत नाही.
पण पैशानं झाड लागतं. वाढतं. फोफावतं.
आणि असा पैसा उपलब्ध करणारी
जिल्ह्यातील एकमेव अग्रेसर बँक आहे.

दि सोलापूर जिल्हा मध्यवर्ती
सहकारी बँक लि.

लहानात लहान शेतकऱ्यास सर्वांगीण मदत
करणारी जिल्ह्यातील पहिली बँक...
आता ३५ कार्यालयाद्वारे खातेदारांचे आणि
शेतकऱ्यांचे दारी सेवेस सिद्ध आहे.
विपूल आणि सहज कर्ज उपलब्धतेमुळे
आमचा शेतकरी कमाल धान्योत्पादन
करून जिल्हा समृद्ध करील अशी ग्वाही
आम्ही आज देऊ शकतो.

दि सोलापूर डिस्ट्रिक्ट सेंट्रल
को-ऑ. बँक लि., सोलापूर

एम. एन. मोहिते-पाटील,
एम. एल. ए., चेअरमन.



## दि कराड अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि., कराड

ऑडिट वर्ग सतत ३८ वर्षे 'अ'

ही दीपावली आमचे सभासद, ठेवीदार, हितचिंतक
व ग्राहकांस सुखाची व समृद्धीची जावो.

| | | |
|---|---|---|
| (१) भाग भांडवल | रु. | १,८३,३४० |
| (२) रिझर्व्ह फंड | रु. | ३,५४,०७० |
| (३) इतर फंडस् | रु. | ११,१७,४०० |
| (४) ठेवी | रु. | १,०५,८८,५०० |
| (५) खेळते भांडवल | रु. | १,२८,६६,४०० |

◆ सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.
◆ ठेवीवर वाढविलेले व्याजाचे आकर्षक दर.
◆ अद्ययावत सेफ डिपॉझिट व्हॉल्टसची सोय.

अधिक चौकशीसाठी संपर्क साधा.

श्री. गो. आगवेकर — मॅनेजिंग डायरेक्टर
वि. कृ. तांबवेकर — चेअरमन

सुधारणा करणे भाग पडेल, हे मात्र खरे आहे. मिळालेले पैसे आणि त्यांचा वापर ह्यासंबंधीचा तक्ता ताळेबंदाच्या प्रारंभीच जोडण्यास कंपनी लॉ बोर्डाने सक्तीचे करण्याचा जरूर विचार करायला हवा. बँकांनीही कर्जदार फर्म्सवर (विशेषतः त्यांचे कर्ज १० लक्ष रुपयांवर असेल तर) हा तक्ता दाखल करणे सक्तीचे करावे.

केवळ भागधारकांच्याच आणि कर्ज देणारांच्याच नव्हे, तर असंख्य ठेवीदारांच्या हितसंरक्षणाचा हा प्रश्न आहे. जोपर्यंत कंपन्यांना आणि फर्म्सना ठेवी घेण्याची मुभा आहे, तोपर्यंत हे हितसंरक्षण आवश्यकच आहे. पण त्याहीपेक्षा कर्ज देणाऱ्या आर्थिक संस्थांनी ह्याकडे लक्ष पुरवायला हवे. भागभांडवल आणि कर्ज ह्यांचे १:१ प्रमाण असणे पाश्चात्य देशांत आदर्श मानले जाते. तेवढी कडक मर्यादा आपल्या देशात ठेवता येणे अशक्य ठरेल. आपण विकासाच्या मार्गावर आहोत आणि भांडवल गुंतवणुकीसाठी पुढे येण्यास उत्सुक नसते, हे मान्य करूनही, ही मर्यादा किती सैल करावी, ह्यालाही काही मर्यादा आहे. येथील फर्म्स आणि कंपन्या ह्यांच्या ताळेबंदात नाना तऱ्हेचे प्रकार आढळतात आणि कर्जपुरवठा करणाऱ्या संस्थाही त्याच्याकडे कानाडोळा करतात. कारण, कायद्याची तशी तरतूद नाही. स्वतःचे भांडवल नाममात्र असून भागीदारीच्या पार्टनर्सच्या चालू खात्यात मोठाल्या शिलका दाखविलेल्या आढळतात. काही ताळेबंदांत एका बाजूला भांडवलाचा आकडा मांडलेला असतो आणि दुसऱ्या बाजूला पार्टनर्सनी मोठाल्या रकमा कर भरण्यासाठी घेतलेल्या दाखविलेल्या असतात, म्हणजे भांडवल उरलेलेच नसते. सुप्रतिष्ठित, कित्येक वर्षांच्या कंपन्याही शिल्लक माल आणि विक्रीची येणे रक्कम व्यापारी देणे आणि बँक कर्ज ह्यापेक्षा कमी दाखवितात. चांगल्या कंपन्यासुद्धा कराची तरतूद देणे म्हणून दाखवीतच नाहीत; ती रक्कम जनरल रिझर्व्हमध्ये किंवा इतर रिझर्व्हमध्ये घालतात आणि ह्या रिझर्व्ह-मधून कर दिला जाईल अशी कुठेतरी नोंद छापतात. कित्येक जुन्या कंपन्याही फिक्स्ड ॲसेट्स घसारा काढून दाखवीत नाहीत कारण त्यामुळे त्यांचा तोटा वाढेल; अहवालात फक्त लिहितात की घसाऱ्याची अमूक अमूक रक्कम थकलेली आहे. काही कंपन्या एवढेही सौजन्य दर्शवीत नाहीत; ऑडिटरांनाच मग आपल्या रिपोर्टात ही गोष्ट भागधारकांच्या निदर्शनास आणण्याची पाळी येते. जी गोष्ट थकलेल्या घसाऱ्याची, तीच गोष्ट प्रेफरन्स भागांच्या द्यावयाच्या राहिलेल्या डिव्हिडंडची. ह्या सर्व अप्रस्तुत गोष्टींना तात्काळ आळा बसविण्यात आला पाहिजे. मालक-व्यवस्थापक कंपन्यांचे दिवस आता संपले आहेत; व्यावसायिक व्यवस्थापनाने त्यांची जागा सत्वर घेतली पाहिजे. म्हणजे सुधारणा लवकर होऊ शकेल.

पैशांचा वापर कसा करावयाचा, हे एक शास्त्र आहे आणि ज्यांना आपला धंदा काटेकोरपणे करावयाचा असेल त्यांनी ह्या शास्त्राचे संकेत पाळायला हवेत. जे तसे करीत नसतील त्यांना कायद्याने ते पाळायला लावले पाहिजेत. जोपर्यंत कारखान-दारांकडे समाजाच्या ठेवी ठेवल्या जात आहेत तोवर त्यांना ही शिस्त पाळायला लावलीच पाहिजे.

जी विक्री रोखीने केली जात नाही, अशा विक्रीला किती मुदतीचे कर्ज दिले जावे, ह्याचाही अभ्यास करणे आवश्यक झाला आहे. बिल मार्केट आता नुकतेच सुरू करण्यात आले आहे आणि बुक डेट्सच्या प्रमाणात कॅश क्रेडिट देण्याची आपली पद्धत बँकांनी हळूहळू बंद करावी, असे त्यांना सांगि-तले जात आहे. त्यांची जागा खरेदीदारावर काढलेल्या हुंड्या डिस्कौंटने घेतली जावी अशी अपेक्षा आहे. बँकांनी ह्या डिस्कौंट केलेल्या हुंड्या, गरज पडल्यास, रिझर्व्ह बँकेकडून रीडिस्कौंट करून घ्याव्या अशी योजना आहे. ज्या कर्जदारांना मोठाल्या रकमा कॅश क्रेडिटच्या स्वरूपात दिल्या जात होत्या, त्यांना हुंड्या डिस्कौंटिंगकडे ओढण्यासाठी बँका नेहमीच्या दरापेक्षा ३ ते ४ टक्के कमी दराने हुंड्या डिस्कौंट करण्याची तयारी दाखवीत आहेत. अर्थात, पैसा कोणत्या दराने बँकांना उपलब्ध होईल त्यावरच कर्जावरील व्याजाचा दर अवलंबून राहणार. व्याजात सवलत देण्याइतपत अल्प दराने बँकांना स्वतःलाच पैसा मिळाला नाही, तर त्यांनी कर्जदारांना हुंडी डिस्कौंटिंगकडे आकर्षित करण्याचे कारण नाही; सर्व बिले कालांतराने रिझर्व्ह बँकेकडून रीडिस्कौंट करून मिळणारच आहेत.

आपले वार्षिक औद्योगिक उत्पादन १२,००० कोटी रु. वर आहे आणि सर्व जण खरेदीदारावर ९० दिवसांच्या मुदती हुंड्या काढू लागले, आणि त्या डिस्कौंट करू लागले, तर एकूण ३,००० कोटी रुपयांच्या हुंड्या डिस्कौंट कराव्या लागतील. एवढ्या प्रचंड रकमेच्या सर्व हुंड्या बँकांना डिस्कौंट करता येणे अशक्य होईल. हुंड्यांची मुदत आणखी वाढविली, तर ह्याहीपेक्षा जास्त रकम आवश्यक होईल. गेल्या वर्षी रिझर्व्ह बँकेने ४५० कोटी रु. चा रीफायनान्स केला होता. ह्या वर्षाची रीफायनान्सची रकम ५०० ते ५५० कोटी रु. यापेक्षा जास्त होण्याचा संभव नाही. ह्यापलीकडे मागणी गेली तर आणखी रीफायनान्स थांबविण्याची पाळी येईल. हुंड्यांची मुदत ३० दिवसच केली, तर हा प्रश्न सुटू शकेल. त्यामुळे पैसे अधिक वेगाने फिरत राहून एकूण पैसा कमी पुरेल. सुरवाती सुरवातीस बाजाराला जरा ताण बसेल; आवाक्याबाहेर धंदा करणारांना शह बसेल. पण त्याला इलाज काय?

ह्या सर्व दिशांनी सत्वर कृती करणे आवश्यक आहे. आपण समस्यांना तोंड देऊन शिस्तीने आर्थिक कारभार करू शकतो का? दिरंगाई, अनास्था आणि वेळ मारून नेणारे निर्णय करून किंवा 'पुढचे पुढे' ह्या पद्धतीने पब्लिक आणि प्रायव्हेट सेक्टर त्याचप्रमाणे सरकार ह्यांचा कारभार चालविणार आहोत की काय, हे कालांतराने कळेलच.

(Kesari-Maharatta Industrial Annual, 1971)

# दि बँक ऑफ कराड लि., कराड

(शेड्युल्ड बँक)

**रौप्यमहोत्सवी वर्ष**

रजिस्टर्ड ऑफिस :—१५, रविवार पेठ, कराड

शाखा :—मुंबई, पुणे, सातारा, इस्लामपूर, तासगाव, विटे, कोल्हापूर, मलकापूर व भोर.

**: ठेवीवरील वाढविलेले व्याजाचे दर :**

| | |
|---|---|
| सेव्हिंग्ज ठेव | ४½ टक्के |
| १ वर्ष ते २ वर्षांपर्यंत | ६½ टक्के |
| २ वर्षांपेक्षां जास्त व ३ वर्षांअखेर | ७ टक्के |
| ३ वर्षांपेक्षा जास्त व ५ वर्षांअखेर | ७½ टक्के |
| ५ वर्षांपेक्षा जास्त | ७¾ टक्के |

कराड येथें सेफ डिपॉझिट व्हॉल्टची सोय आहे. तसेंच इस्लामपूर व तासगांव येथें सेफ डिपॉझिट लॉकर्सची सोय आहे.

**म. वि. खंडकर**
चेअरमन

# इचलकरंजी जनता सहकारी बँक लि., इचलकरंजी

(स्थापना ७ फेब्रुवारी १९६३)

फोन नं. २१९१ व २१९२ तार : जनता बँक

केवळ आठ वर्षांच्या वाटचालीतील नेत्रदीपक प्रगती

**" सेवा हेच आमचे ब्रीद "**

(आकर्षक व्याजाच्या दराने ठेवी स्वीकारल्या जातात)

## " लघु उद्योगधंद्यांना भांडवलपुरवठा करणें हेंच आमचे ध्येय "

| | | |
|---|---|---|
| (१) खपलेले भाग भांडवल | रु. | ४,९८,१००-०० |
| (२) गंगाजळी व इतर निधी | रु. | ३,५६,०२१-०० |
| (३) ठेवी | रु. | ७३,००,०००-०० |
| (४) खेळते भांडवल | रु. | १,०५,८१,०००-०० |

**आर. पी. कुलकर्णी,** मॅनेजर

**के. बी. आवाडे,** चेअरमन

हेड ऑफिस टे. नं. २२ मिश्रखत विभाग टे. नं. ५६
माल खत वि. विभाग टे. नं. ५८ ऑईल मिल टे. नं. ५०

**शेकडो शेतकऱ्यांनी वापरून अत्युत्कृष्ट अनुभव घेतलेला आहे. म्हणूनच बहुसंख्य शेतकरी दि पैसाफंड शेतकी सहकारी बँक लि., हुपरी निर्मित**

# पैसाफंड मिश्रखत

| | |
|---|---|
| १५ : ५ : ५ | १२ : ६ : ० |
| १० : ५ : ५ | ६ : १२ : ० |
| ९ : ९ : ५ | ९ : ९ : ० |

सर्व पिकांना वापरणे पसंत करतात. आपण एकवेळ अनुभव घेतल्यास कमी पैशांत भरपूर मोबदला मिळाल्याचे समाधान आपणासही लाभेल. एकवेळ वापरून खात्री करा.

**एल. वाय. पाटील**
चेअरमन

**डी. बी. देमाण्णा**
शेती अधिकारी

**आ. बा. नाईक**
मॅनेजिंग डायरेक्टर

**दि पैसाफंड शेतकी सहकारी बँक लि., हुपरी, जिल्हा—कोल्हापूर.**

**तुझ्या घामामधून, तुझ्या कामामधून**
**उद्या पिकलं सोन्याचं रान....**

भारताचे उद्याचे सोन्याचं रान पिकण्यासाठी खरीखुरी 'सुवर्णभूमी' निर्माण करण्यासाठी घाम गाळला पाहिजे, काम उपसले पाहिजे. महाराष्ट्रामध्ये कामगारांच्या घामातून, कष्टातून यशवंत सिमेंट वस्तु निर्माण सहकारी सोसायटी निर्माण झाली आहे. ते सोन्याचं रान निर्माण करण्याचा प्रयत्न करीत आहोत. शेतकरी साथ देत आहेत. तशीच साथ पुढेही द्यावी अशी या दिवाळीच्या शुभदिनी आशा करतो.

**ना. बा. कराडकर**
सेक्रेटरी

**र. रा. भिडे**
चेअरमन

# यशवंत सिमेंट वस्तु निर्मिती सहकारी सोसायटी

औद्योगिक वसाहत, सांगली.

# भारताच्या आर्थिक विकासात निर्यात व्यापाराचे महत्त्व

( बी. डी. कानिटकर, किर्लोस्कर उद्योगसमूह, पुणे )

निर्यात व्यापाराचे महत्त्व अजमावण्यापूर्वी आर्थिक विकास म्हणजे काय हे निश्चित केले पाहिजे. हे विषयांतर नव्हे किंवा तात्या पंतोजीगिरीही नाही. कारण आर्थिक विकासाच्या अनेक व्याख्या केल्या गेल्या आहेत आणि त्यासंबंधी कल्पना तर भरपूर आहेत. तेव्हा निर्यात व्यापाराच्या संदर्भात कोणती व्याख्या किंवा कल्पना अभिप्रेत असावी हा प्रश्न महत्त्वाचा आहे. कदाचित एक-दोन उदाहरणे देऊन हा मुद्दा अधिक स्पष्ट होईल.

पश्चिम आशियात जी अनेक अरब राष्ट्रे आहेत, त्यात कुवेत हे एक चिमुकले राष्ट्र आहे. दरडोई सरासरी वार्षिक उत्पन्न ही जर आर्थिक विकासाची कसोटी धरली तर जगातील समृद्ध राष्ट्रांमध्ये कुवेतचा क्रमांक बराच वर लागेल. पण कुवेतचे आर्थिक दृष्ट्या विकसित किंवा प्रगत राष्ट्र असे वर्णन केलेले माझ्या तरी ऐकिवात नाही. या चिमुकल्या राष्ट्राची सबंध अर्थव्यवस्था केवळ तेलाच्या निर्यात व्यापारावर अवलंबून आहे. तेल ही त्या देशाची निसर्गदत्त देणगी आहे. त्याच्या निर्यातीशिवाय ते राष्ट्र जगूच शकणार नाही. त्याच्याजवळ निर्यातीसाठी दुसरा कोणताही माल नाही आणि त्या गोष्टीची जरूरीही नाही, इतके गडगंज उत्पन्न त्या राष्ट्राला तेलापासून मिळते. या उत्पन्नाचा जवळजवळ ८० टक्के हिस्सा कुवेतच्या राजेसाहेबांकडे जातो. उरलेला भाग इतरत्र विभागला जातो. संख्याशास्त्राच्या सरासरीप्रमाणे कुवेतचा सामान्य नागरिक इंग्लंड किंवा स्वीडनच्या नागरिकाइतका किंवा त्याहूनही श्रीमंत आहे. प्रत्यक्ष वस्तुस्थिती जास्त विशद करण्याचे कारण नाही.

दुसरे उदाहरण आफ्रिकेमधील झांबियाचे देता येईल. या देशाची सर्व अर्थव्यवस्था आजपर्यंत तरी तांब्याच्या निर्यातीशी निगडित होती. मग झांबिया हे विकसित किंवा प्रगत राष्ट्र समजायचे काय ? तेथील दरडोई उत्पन्नही कुवेतच्या मानाने फारच किरकोळ आहे. हीच गोष्ट रबर-राष्ट्रांच्या बाबतीत म्हणता येईल.

तात्पर्य, जगातील काही थोड्याफार राष्ट्रांकडे जगातील इतर राष्ट्रांना अत्यावश्यक असणाऱ्या वस्तूंची मक्तेदारी आहे. याचा परिणाम त्यांच्या दरडोई वार्षिक उत्पन्नावरही दिसून येतो. पण ही मक्तेदारी प्रत्येक गोष्टीत कायम स्वरूपाची राहीलच असे नाही. रबराचे बाबतीत हे विशेष दिसून येईल; कारण पर्यायी गोष्टींचे उत्पादन इतरत्र विलक्षण वेगाने सुरू आहे, याचा परिणाम त्या त्या देशांच्या अर्थव्यवस्थेवर काय होईल हे विस्ताराने सांगण्याचे कारण नाही.

थोडक्यात, हे अपवादात्मक देश आपल्याला सोडून दिले पाहिजेत. आर्थिक विकास म्हणजे काय हे ठरविताना सर्वसामान्य देशातील नैसर्गिक संपत्ती आणि इतर उपलब्ध साधने, त्यांचे एकमेकाशी प्रमाण, आणि त्यांचा वापर किंवा त्यांचा अभाव, या गोष्टींवरच भर द्यायवयास पाहिजे. परिणामी, देशाचे एकंदर वार्षिक आणि दरडोई उत्पन्न हीच कसोटी आपल्याला घ्यावी लागणार. पण ते उत्पन्न केवळ एकाच नैसर्गिक संपत्तीवर अवलंबून आहे की वर सांगितलेल्या गोष्टीच्या एकमेकांवर होणाऱ्या प्रक्रियेवर अवलंबून राहील हा महत्त्वाचा प्रश्न आहे.

जगातील महत्त्वाच्या प्रगत देशांच्या अनुभवावरून हे स्पष्ट झालेले आहे की आर्थिक विकास आणि त्यामुळे वार्षिक उत्पन्नात होणारा वाढावा या गोष्टी त्या त्या देशातील शेती, कारखानदारी आणि 'सर्व्हिस' इंडस्ट्रिज् यांच्या परस्पर-प्रमाणावर अवलंबून असतात. कृषिव्यवसायातून कारखानदारीकडे आणि शेवटी सर्व्हिस इंडस्ट्रीकडे संक्रमण होणे हे विकासाच्या दृष्टीने इष्ट आणि अटळ आहे. याचा अर्थ, प्रत्येक अवस्थेत हे संक्रमण शंभर टक्के झाले पाहिजे असा नव्हे, आणि ते शक्यही नाही. तिन्हीतील समतोल गाठणे हा महत्त्वाचा भाग आहे.

१९५६ सालापासून अशा तऱ्हेचा समतोल गाठण्याचा भारताचा जिद्दीने प्रयत्न चालू आहे, आणि यात आपण बरीच मजलही मारली आहे हे अभिमानाने सांगितले पाहिजे. वाढती लोकसंख्या आणि परचक्रे यांमुळे या संक्रमणांचा परिणाम दरडोई उत्पन्नात दिसून येत नाही ही दुर्घटना आहे. पण भारत अद्यापही अप्रगतच देश आहे असे म्हणणे मात्र धाष्टर्याचे आहे.

निर्यातीचे महत्त्व वरील संक्रमणावस्थेत आणि त्याच्या पद्धतीत दिसून येते. ज्या तऱ्हेच्या कारखानदारीमुळे पश्चिमात्य राष्ट्रे आपल्याइतकी पुढे गेली आहेत, तशी कारखानदारी सुमारे वीस वर्षापूर्वी आपल्याकडे नव्हतीच. अशा कारखानदारीचा प्रारंभ खऱ्या अर्थाने दुसऱ्या पंचवार्षिक योजनेपासून झाला. तिची पायाभरणी करताना आपल्यापुढे ज्या दोन महत्त्वाच्या अडचणी उभ्या राहिल्या त्या म्हणजे तांत्रिक ज्ञानाचा आणि संबंधित अशा साधनसामग्रीचा अभाव. दोन्हीही गोष्टींची योग्य तऱ्हेनें आणि योग्य प्रमाणांत आयात करणे हे अटळ होते. गेली वीस वर्षे आपण हे करत आलो आहोत, आणि त्यामधून नवीन कारखानदारीही आपण उभी केली आहे. वेगवेगळ्या कारणासाठी पाश्चिमात्य राष्ट्रांनी या बाबतीत आपल्याला भरपूर आर्थिक मदतही केली आहे. पण परिणामी आपल्याला आपल्या पायावरच उभे राहावे लागणार आहे. म्हणजेच अशा मदतीची अपेक्षा न करता या पुढील अर्थसंकल्प आपल्याला करावे लागणार आहेत. कारण अजून आपल्याला खूपच मजल मारायची आहे.

याचाच अर्थ जे जे आपण बाहेरून विकत घेणार त्याचा

मोबदला आपल्याला बव्हंशी आपल्या निर्यातीच्या स्वरूपात द्यावा लागणार. गेल्या काही वर्षांच्या अनुभवावरून असे दिसते की आपल्या निर्यातीतील पारंपारिक गोष्टी म्हणजे चहा, कापड, ज्यूट वगैरे यांचा या दृष्टीने आपल्याला विशेष उपयोग होणार नाही. अर्थतज्ज्ञांत या बाबाबत दुमत आहे. सरकारी धोरणातील विशिष्ट गोष्टीत बदल केल्यास वरील गोष्टींची निर्यात निश्चित वाढेल असे काही कारखानदारांनाही वाटते. ती किती वाढेल याबाबत मात्र कोणीही निर्वाळा देऊ शकत नाही. अशा परिस्थितीत नवीन कारखानदारीतील वस्तूंच्या निर्यातीवर लक्ष जास्त केंद्रित करणे योग्य ठरेल असे मला वाटते.

चौथ्या पंचवार्षिक योजनेत आपल्या वार्षिक उत्पादनात ५ ते ६ टक्के वाढ इष्ट आणि शक्य धरली आहे. त्यानुसार कृषिव्यवसाय, कारखानदारी आणि इतर व्यवसाय यांचीही टक्केवारी ठरविली आहे. यालाच अनुसरून आयातीची टक्केवारी ६ ठरविली आहे. आणि हे सर्व परकीय मदतीशिवाय जर करायचे असेल तर आपली वार्षिक निर्यात किमान ७ टक्क्यांनी वाढली पाहिजे असे गृहीत धरले आहे.

वरील आकडेवारी ग्राह्य मानल्यास निर्यातीमधील बराच बोजा नवीन उद्योगधंद्यांना वाहावा लागणार आहे हे निश्चित आणि पारंपारिक गोष्टींशी तुलना करता या कामातील अडचणी आणि कटकटी जास्त आहेत. मुख्य अडचण म्हणजे ज्या ज्या नवीन वस्तूंची निर्यात आपण करीत आहोत—आणि जेथे करीत आहोत—तेथील बाजारपेठेत आंतरराष्ट्रीय स्पर्धेशी आपल्याला टक्कर द्यावी लागत आहे—लागणार आहे. आणि ही स्पर्धा केवळ मालाचा दर्जा आणि त्याची किंमत यावरच अवलंबून नसून इतर अनेक गोष्टींवर आहे. प्रश्न निर्माण होत आहेत ते यामुळे. आम्ही निर्यात करतो ते पंखे, डिझेल इंजिने, इंटिग्रेटेड शुगर प्लॅन्ट या गोष्टी दर्जाच्या, किंवा किमतीच्या दृष्टीनेही, इतर देशातून येणाऱ्या वस्तूंपेक्षा कमी प्रतीच्या आहेत अशी परिस्थिती आता राहिली नाही. पण आमची निर्यात अद्याप अशा तऱ्हेच्या मालाच्या पलीकडे गेली नसल्यामुळे परकीय ग्राहकांचे लक्ष स्वाभाविकच दर्जा आणि किंमत याशिवाय इतर गोष्टींकडे जाणे स्वाभाविक आहे.

या 'इतर' गोष्टींच्यामागे अनेक गोष्टी अंतर्भूत आहेत. त्यापैकी एक-दोन गोष्टींचाच येथे विचार करू.

पहिली गोष्ट म्हणजे माल त्या त्या ठिकाणी वेळेवर पोचविणे. आजच्या जगात परदेश कितीही दूर असला तरी तेथील गिऱ्हाइकाला मागणीनंतर माल मिळण्यास २ ते ३ महिन्यांपेक्षा जास्त अवधी लागू नये असे मला वाटते. आपल्या बाबतीत ते सर्वस्वी घडत आहे असे मला वाटत नाही. वेळेवर माल पोचविणे हा आंतरराष्ट्रीय स्पर्धेतीलच एक प्रकार आहे. अशा परिस्थितीत भारतात आणि इतर देशांत जेथे जेथे आपला माल जातो तेथे सरकारने माल साठवून ठेवण्यासाठी गुदामांची व्यवस्था केल्यास फार मदत होईल असे मला वाटते.

दुसरा मुद्दा क्रेडिटचा. हाही एक आंतरराष्ट्रीय स्पर्धेचाच भाग आहे. ज्या ज्या परदेशात भारतातील कारखानदार त्यांचा माल स्थानिक वितरकांच्यातर्फे विकतात त्यांना तीन महिन्यांपासून ते तीन वर्षांपर्यन्त—हे मालाच्या प्रकारावर अवलंबून असते—क्रेडिट द्यावे लागते. प्रत्येक निर्यातदाराला हे नेहमीच शक्य होते असे नाही. आणि ही परिस्थिती लक्षात घेऊन बऱ्याच प्रगतशील देशामध्ये एक्सपोर्ट क्रेडिट गॅरंटी कॉर्पोरेशन्स सरकारने गेल्या दहाबारा वर्षांत स्थापन केली आहेत. यामुळे निर्यातदाराला त्याने बाहेर पाठविलेल्या मालाच्या ८० ते ९० टक्के किंमत त्याच्या देशाच्या चलनामध्येच त्या देशातील बँकेमधून तावडतोब मिळू शकते. पण असे अनेक निर्यातदार आणि अनेक देश असल्यामुळे या गोष्टींचा बोजा २ महिन्यांपासून ते ३ वर्षांपर्यन्त परिणामी त्या त्या देशांच्या मध्यवर्ती सरकारी बँकांवर पडतो आणि पडणार हे उघड आहे. आणि हे असे होत असताना आयात आणि निर्यात यांच्या बिलांचा मेळ कसा घालायचा हा यक्षप्रश्न अशा देशांच्या सरकारपुढे उभा राहतो, आणि उभा राहणे साहजिक आहे. हा प्रश्न सुटला नाही तर त्याचा परिणाम भारताच्या निर्यातीवर निश्चित होईल.

पण हा प्रश्न—भारतापुरतेच बोलावयाचे झाले तर—रिझर्व्ह बँकेच्या कक्षेपलिकडील आहे. आंतरराष्ट्रीय पातळीवरच तो धसास लावला पाहिजे. म्हणजेच ज्यामुळे रिझर्व्ह बँकेला तिने घेतलेल्या जोखमीचा मोबदला तावडतोब एखाद्या इंटरनॅशनल क्रेडिट गॅरंटी कॉर्पोरेशनतर्फे मिळू शकेल, अशा तऱ्हेच्या यंत्रणेची आज अत्यंत गरज आहे. पण हा प्रश्न रिझर्व्ह बँकेच्या आणि आजच्या विषयाच्या कक्षेच्या बाहेरील आहे.


सरदारगृह

मुंबईत राहण्याची व भोजनाची उत्तम सोय.
मंगलकार्ये व मेजवान्या यांसाठी सोईस्कर ठिकाण.
— आमची वैशिष्ट्ये —
* हीरकोत्सवानिमित्त अद्ययावत् पद्धतीचे भोजनगृह व अनेक प्रकारच्या सुखसोई.
* टिळक जन्मशताब्दीदिनी लोकमान्यांचे सरदारगृहात केलेले स्मारक.
फोन नं. :-३८३३७] सरदारगृह प्रा. लि. [तार—सरदारगृह
क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.

# उद्योगधंद्यांतील मॅनेजमेंटच्या कार्याचे स्वरूप

( डॉ. एन. के. कुलकर्णी, प्राचार्य, बृहन्महाराष्ट्र कॉलेज ऑफ कॉमर्स, पुणे )

गेल्या काही वर्षांत बिझिनेस मॅनेजमेंट ही एक स्वतंत्र व स्वयंसिद्ध ज्ञानशाखा झाली आहे. ह्या संदर्भात मॅनेजरची भूमिका संघटक आणि तंत्रज्ञ अशी दुहेरी झाली आहे. मॅनेजरच्या भूमिकेचे हे दिग्दर्शन वाचा.

ज्या क्रियांवरती ताबा ठेवणे सुलभ होईल अशा क्रियांत कामाची विभागणी करणे आणि ह्या क्रियांची सुसूत्र रचना करणे म्हणजे संघटना असा अर्थ आहे. संघटनेची जी चौकट असेल तीतील प्रत्येक घटकाला आपल्या स्थानाची अचूक कल्पना असणे हे संघटनेचे सर्वांत महत्त्वाचे तत्त्व आहे. अधिकाऱ्याच्या मर्यादा इतक्या स्पष्ट तऱ्हेने घालून देण्यात आल्या पाहिजेत की प्रत्येक माणसाला आपला वरिष्ठ कोण आणि हाताखाली काम करणारा कोण ह्याची स्पष्ट कल्पना असली पाहिजे. दुसरे असे की निरनिराळ्या खात्यांच्या कामाची वाटणी अगदी स्वच्छ असली पाहिजे. म्हणजे कामात पुनरुक्ती, त्यांतील परस्पर अस्पष्टता आणि त्यामुळे होणारा गोंधळ होण्याची शक्यता राहात नाही. शिवाय संघटनेतील निरनिराळ्या खात्यांचे काम आणि श्रम ह्यांची सांगड घालणारी एखादी पद्धती असली पाहिजे. विचारविनिमयाची कार्यक्षम पद्धती असेल तर अशी सांगड घालणे सोपे होते. सर्व निर्णयांचा आधार म्हणजे माहिती. ही माहिती प्रमुख चालकाकडून त्याच्या हाताखालील लोकांकडे आणि त्यांच्याकडून प्रमुख चालकाकडे सतत दिली-घेतली पाहिजे. अधिकार एकवटलेला असला पाहिजे. ह्याचा अर्थ असा की कोणत्याही माणसाला एकापेक्षा अधिक वरिष्ठ असता कामा नये. अधिकार हा प्रमुख चालकापासून खालच्यात खाली असलेल्या माणसाकडे आणि कारकुनी काम करणाराकडे सरळ आलेला असला पाहिजे आणि प्रत्येक पातळीवर अधिकार आणि जबाबदारी ह्यांचा मेळ घातलेला असला पाहिजे. आणखी असे की काम कार्यक्षमतेने पार पाडता यावे म्हणून अधिकार सोपविण्यात आला पाहिजे. दुसऱ्यावर जबाबदारीने काम सोपविण्याचे तत्त्व असे आहे की प्रत्यक्ष काम करणारे जे असतील ते संबंधित प्रश्नांची सोडवणूक करण्यास अधिक पात्र असतात. त्यामुळे त्वरित निर्णय घेतले जाऊन वेळ वाचतो. शिवाय काम करणारांच्या साखळीतील प्रत्येक माणसाची पुढे होऊन काम करण्याची वृत्ती त्यामुळे जागृत होण्यास मदत होते आणि कामांत आपलाही काही वाटा आहे ह्याची जाणीव झाल्यामुळे कृतार्थ होऊन ते कामात आस्थापूर्वक लक्ष घालीत राहतात. अलीकडे कामातील विशेषज्ञता वाढत चाललेली आहे. त्याचा एक परिणाम असा झाला आहे की नोकरवर्ग आणि त्यांची एकसंघ साखळी ही कल्पना कोणत्याही मोठ्या संघटनेत आवश्यक होऊन बसली आहे.

'स्टाफ ॲथॉरिटी' आणि 'लाइन ॲथॉरिटी' ह्या दोन कल्पना अगदी भिन्न आहेत. गेल्या ३ हजार वर्षांत मॅनेजमेंटच्या शास्त्रात जी प्रगती झाली आहे ती ह्या दोन कल्पना स्पष्ट होण्यानेच मुख्यत: झालेली आहे. साखळीत काम करणाऱ्या माणसांनी प्रत्यक्ष कार्य करावयाचे असते; तर त्यांना जरूर असणाऱ्या सोयी उपलब्ध करून देऊन त्यांच्या कामात त्यांना मदत करणे ही स्टाफ ॲथॉरिटीची जबाबदारी असते. शिस्त राखली जाण्याच्या दृष्टीने आणि कार्य पद्धतीचे सातत्य टिकविण्याच्या दृष्टीने साखळीची संघटना जरूर असते. कार्यक्षमता राखण्याच्या दृष्टीने स्टाफ संघटना आवश्यक असते. संघटनेच्या ह्या दोन विभागांत उत्स्फूर्त सहकार्य आणि सुसंवाद घडवून आणणे हे व्यवहारात अवघड असते. म्हणूनच साखळीतील कार्याधिकारी आणि स्टाफ अधिकारी ह्यांच्यात परस्पर संपूर्ण सामंजस्य असण्याचे महत्त्व फार आहे. संघटनेला आपले साध्य गाठता यावे म्हणून आपण काय केले पाहिजे ह्याची दोन्ही प्रकारच्या अधिकाऱ्यांना स्पष्ट कल्पना असली पाहिजे. एखाद्या कामातील जबाबदारी स्पष्टपणे वाटण्यात येऊन प्रत्येक माणसाला आपल्यावरील जबाबदारीची खास कल्पना असली म्हणजे लोकांकडून त्यांच्या पूर्ण मगदुराप्रमाणे काम घेता येणे शक्य होते. अशा तऱ्हेनेच कामाची संघटना करण्यात आली पाहिजे.

तथापि संघटना बांधणे हे मॅनेजमेंटच्या अनेक कामांपैकी एक काम आहे. संघटनेची बांधणी-आखणी करण्याशिवाय मॅनेजमेंटला इतर अनेक कार्ये करावयाची असतात. गेल्या काही वर्षांत मॅनेजमेंट हे शास्त्र एक स्वयंसिद्ध ज्ञानशाखाच होत चालली आहे. अमेरिकेतील उद्योगधंदे युरोपमधील उद्योगधंद्यांच्या मानाने अधिक उत्पादनशील आणि कार्यक्षम आहेत. ह्या दोहोंमधील तफावत तंत्रज्ञानातील अंतरामुळे उत्पन्न झाली नसून मॅनेजमेंटमधील अंतरामुळे उत्पन्न झाली आहे असे विवरण करण्याचे प्रयत्न होत आहेत. तेव्हा मॅनेजमेंटच्या शास्त्राची चिकित्सा करून त्याचा अधिक पद्धतशीर अभ्यास होत आहे ह्यात आश्चर्य मानण्यासारखे काही नाही. तर मग मॅनेजमेंटच्या कार्याचे नक्की स्वरूप काय आहे ? संघटनेत मॅनेजिंग डायरेक्टर्स, खात्याचे प्रमुख अगर एखाद्या विभागाचे पर्यवेक्षक असतात. त्या सर्वांना सारखीच करावी लागणारी अशी काही कामे असतात काय ? प्रत्यक्ष व्यवहारात असे आढळून येते की अनेक मॅनेजर्स त्यांचा ज्या कामाशी मुळींच संबंध नसतो अशा कामांत लक्ष घालून वेळ वाया दवडीत असतात. ही परिस्थिती खरी आहे. परंतु मॅनेजर्स जी आवश्यक

कार्ये करतात अगर जी त्यांनी करणे जरूर आहे, अशा कार्यांची छाननी केली तर सर्व प्रकारच्या मॅनेजर्सना सर्व पातळीवर समान असणारी कार्ये निश्चित करता येणे शक्य आहे.

मॅनेजरचे मूलभूत कार्य साध्ये ठरविणे आणि ती प्रत्यक्षात उतरविण्यासाठी निश्चित स्वरूपाची कार्यपद्धती आखून देणे हे आहे. त्याला स्वतःलाच जर साध्यांची स्पष्ट कल्पना नसेल तर त्याची वाटचाल आत्मविश्वासपूर्ण होऊ शकणार नाही. वेगाने बदलत जाणाऱ्या अर्थव्यवस्थेत त्याने आपल्या साध्यांची मधून-मधून फेर तपासणी केली पाहिजे आणि जरूर तर त्यांच्यात फरक केला पाहिजे. त्याचप्रमाणे आपल्या धोरणाची आखणी करताना तात्पुरते हितसंबंध आणि दीर्घकालीन हितसंबंध ह्यांच्यात तोल राखण्याचा प्रयत्नही त्याने केला पाहिजे. ह्यासाठी सतत नियोजनाची आवश्यकता आहे. झपाट्याने बदलत जाणाऱ्या जगात प्रगती होत आहे की नाही ह्याचा ताळमेळ मॅनेजरने घातला पाहिजे. तरच कार्यक्रमाप्रमाणे गोष्टी होत आहेत की नाही हे त्याला समजू शकेल. एखाद्या विभागात काम समाधान-कारक होत नाही असे आढळून आल्यास त्याने तात्काळ ते नीट व्हावे म्हणून योग्य ते उपाय योजले पाहिजेत. निरनिराळ्या विभागांतील प्रगती अजमाविण्यासाठी गेल्या काही वर्षांत अनेक उपयुक्त तंत्रांचा विकास करण्यात आला आहे. त्यांच्यामुळेच प्रगतीचे पृथक्करण करणे आणि मापन करणे शक्य होते. उदा. पर्ट, क्रिटिकल पाथ ॲनेलिसिस, पे-ऑफ टेबल्स इत्यादी. तथापि ह्या तंत्रांचे महत्त्व आणि त्यांच्या मर्यादा ह्यांची मॅनेजरला नीट समजूत पटलेली असली पाहिजे. नवीन तंत्रामुळे अधिक संग्राहक आणि अधिक काटेकोर माहिती त्वरित मिळू शकते. असे असले तरी मॅनेजरने आपले तारतम्य आणि अनुभव पडताळून मिळालेल्या माहितीचे मूल्यमापन करणे जरूर आहे. नवीन तंत्रज्ञान आणि गणकयंत्राचा वापर ह्यामुळे मॅनेजर्स निरुपयोगी होत जातील अगर त्यांची जागा केवळ तंत्रज्ञ घेऊ शकतील असे नाहीं. उलट मॅनजमेंटच्या सर्व पातळीवर मॅनेजरच्या जबाबदारीवर आणि पात्रतेवर पूर्वीपेक्षा फार ताण पडू लागेल.

कारभारी हा केवळ नोकरशाही वृत्तीचा व कामांची व्यवस्था पाहणारा असून चालणार नाही. स्पर्धामय जगात त्याला यशस्वी व्हावयाचे असेल तर त्याने कल्पकतेने कारभार केला पाहिजे. मामुली पद्धतीने काम करून चालणार नाही. मॅनेजरला लोकांच्या मार्फतच काम घ्यावयाचे असल्याने त्याने लोकांना शिकविले पाहिजे. आपल्या सहकाऱ्यांना व हाताखालच्यांना कामातील मर्म समजावणे आणि त्यांना कार्यप्रवण करणे ही मॅनेजरची विशेष कर्तबगारी असली पाहिजे. हाताखालील लोकांना पूर्ण विकासाचा अवसर त्याने दिला पाहिजे. व्यापारधंद्यांचे दीर्घकालीन भवितव्य उज्ज्वल करण्यासाठी लोकांना स्वतंत्रपणे निर्णय घेण्याचे प्रशिक्षण देण्यात आले पाहिजे. नवीन तंत्रज्ञानाच्या वापराला समयोचित लवचिकपणा आणि विकेंद्रीकरण ह्यांची गरज आहे. त्यांचा अभाव नडेल. औद्योगिक समाजाचे मॅनेजमेंट हे आर्थिक इंद्रिय आहे. ज्या सामाजिक आणि राजकीय चौकटीत मॅनेजरला काम करावयाचे असते त्याची त्याला चांगली समजूत असली पाहिजे. नवीन युगप्रवृत्तीची त्याला जाण असली पाहिजे. कारण त्या युगातच त्याला कामधंदा करावयाचा असतो. मुक्त अर्थव्यवस्थेच्या काळात खाजगी दोष सार्वजनिक फायद्याचे ठरतात हे मँडेव्हिलचे प्रसिद्ध सुभाषित कदाचित खरे ठरले असेल. पण आजच्या बदललेल्या परिस्थितीत धंदा अशा रीतीने चालविण्यात आला पाहिजे की सार्वजनिक हित हेच त्यांचे खाजगी हित झाले पाहिजे. ॲडॅम स्मिथने असे म्हटले आहे की ज्या समाजातील फार मोठी संख्या गरीब व दुःखी लोकांची बनलेली असते असा कोठलाही समाज भरभराटणार नाही आणि सुखी होणार नाही. ॲडॅम स्मिथच्या शब्दांत जो भाव, जे शहाणपण आणि जी दूरदृष्टी आहे त्याची जाणीव मॅनेजमेंटने ठेवली पाहिजे. तात्पर्य मॅनेजमेंटने उद्दिष्टे ठरविली पाहिजेत, संघटनेची रचना केली पाहिजे, प्रगतीची वारंवार तपासणी केली पाहिजे, कल्पकता लढविली पाहिजे आणि लोकांचा विकास घडवून आणण्यासाठी त्यांना दूरदृष्टी आणि आत्मविश्वास बाळगण्यास शिकविले पाहिजे. ज्या सामाजिक पार्श्वभूमीवर मॅनेजमेंटला कार्य करावयाचे असते त्याची पूर्ण जाणीव असेल तरच समाधानकारक आर्थिक यश पदरात पाडून घेता येते. (आकाशवाणी, पुणे केंद्राच्या सौजन्याने)


शास्त्रज्ञ डॉ. प्रफुल्लचंद्र राय यांनी सर्टिफिकेट दिलेले
रुचकर आणि स्वादिष्ट



मुखशुद्धीसाठी
चमन
चिमूटभर तोंडात टाकताच मुख सुगंधमय होते.
बाटली किंमत रु. १·५०
*याच्या सेवनाने तहान भागून आवाज खुलतो; करिता वक्ते, गवई, नटनटी, वगैरे लोकांना अत्यंत उपयोगी आहे. चमन तोंडात टाकताच लाळेबरोबर मिश्र होऊन श्वास सुगंधित होतो. लहान-थोरांस, तसेच गरोदर स्त्रियांनाही उपयुक्त.*
इंग्लिश औषधे आणि अत्तरे बनविणार
स्टार कंपनी, बेळगाव

# करमुक्त उत्पन्नाची मर्यादा वाढविणे व्यावहारिक आणि न्यायाला धरून आहे

ठराविक उत्पन्न असणाऱ्या लोकांना प्राप्तीवरील कर वाढत्या किमतीमुळे डोईजड होतो. शिवाय त्याने उत्पन्नात भरही बेताची पडते. कसे ते खाली वाचा.

ज्या ज्या देशात प्राप्तीवरील कर घेण्यात येतो त्या त्या देशात त्यातून सूट देण्याच्याही व्यवस्था करण्यात आलेल्या असतात. अशा तरतुदी मुख्यतः पुढील कारणांसाठी असतात. प्राप्तीवरील कराच्या रूपाने नागरिकांच्या उत्पन्नातून काही वजावाट न करता त्यांना काही विशिष्ट दर्जाचे जीवनमान जगता यावे हा एक हेतू; काही नागरिकांना प्राप्तीवरील कर देणे शक्यच नसते; म्हणजे त्यांचे उत्पन्न अल्प असते. ह्या वस्तुस्थितीची दखल त्यांना प्राप्तीकरातून सूट देऊन घेण्यात येते. शिवाय अगदी कमी उत्पन्न असलेल्या बऱ्याच लोकांनाही प्राप्तिकरातून वगळण्यात येते. त्यामुळे कर वसूल करण्यासाठी येणारा खर्च वाजवी राहण्यास मदत होते. १८६० साली भारतात प्रथम प्राप्तीवरील कर बसविण्यात आला. तेव्हापासून त्यातून सूट मिळण्याची मर्यादा वेळोवेळी घालून देण्यात आली आहे. क्रमांक १ ह्या कोष्टकात ह्या मर्यादेची दिशा दाखविण्यात आली आहे.

**कोष्टक नं. १**

**प्राप्तिकरातून सूट देण्यात आलेली प्राप्ती**

| वर्ष | रु. |
|---|---|
| १८६० | २०० |
| १८६२ | ५०० |
| १८७१ | ७५० |
| १८८६ | ५०० |
| १९०३ | १,००० |
| १९४७ | २,५०० |
| १९४८ | ३,००० |
| १९५० | ३,६०० |
| १९५३ | ४,२०० |
| १९५५ | ४,२०० |
| | + १,००० अविवाहितांना आणि |
| | + २,००० विवाहितांना |
| १९७० | ५,००० |

१८६० साली सुटीची मर्यादा २०० रुपये होती ती १८६२ साली ५०० रुपये करण्यात आली. करपात्र व्यक्तींपैकी दोन तृतिआंश लोक २०९ ते ५०० रुपये उत्पन्नाच्या गटांतील होते. त्यांच्यावरील कराचा दर अल्प होता. प्राप्तीवरील कराच्या एकूण उत्पन्नापैकी फक्त एक पंचमांश उत्पन्नच ह्या गटातील लोकांकडून मिळाले असे दिसून आले. ह्या कारणासाठी १८६२ साली सुटीची मर्यादा २०० वरून ५०० पर्यंत वाढविण्यात आली. १८७१ साली ही मर्यादा ७५० रुपयांपर्यंत वाढविण्यात आली. त्या वेळचे अर्थखात्याचे चिटणीस सर रिचर्ड टेंपल ह्यांना असे आढळून आले की, ७५० रुपयांपेक्षा कमी उत्पन्न असलेल्या लोकांकडून जादा कर आकारल्याच्या व इतर तक्रारी मुख्यतः करण्यात आल्या होत्या आणि ह्या छोट्या उत्पन्न वाल्यांवरच कराचे ओझे जास्त टाकण्यात आलेले होते. १८८६ साली पुन्हा सुटीच्या मर्यादा ७५० रुपयांवरून ५०० रुपयांपर्यंत कमी करण्यात आली. परंतु त्याच वेळी ५०० रुपयांपासून २,०१० रुपये उत्पन्न असलेल्या करपात्र व्यक्तींकडून कराच्या पूर्ण दरापेक्षा कमी दराने कर घेण्याची सवलत देण्यात आली. रु. ५०० ते ७५० रु. पर्यंत १० रु., ७५० ते १०००रु. पर्यंत १५ रुपये, आणि १,००० ते २,००० रुपयांपर्यंत ४२ रुपये दर ठेवण्यात आला. १९०३ साली सुटीची मर्यादा १,००० रुपयांपर्यंत वाढविण्यात आली. त्यामुळे कराच्या उत्पन्नावर काही परिणाम न होता प्राप्तिकर देण्यास पात्र अशा लोकांची संख्या ५० टक्के कमी झाली. पहिल्या महायुद्धाच्या वेळी चलनवृद्धीची लक्षणे दिसून येऊ लागली आणि म्हणून सुटीची मर्यादा १९१९ साली २,००० रुपयांपर्यंत वाढविण्यात आली त्यानंतर ही मर्यादा १९४७ साली वाढविण्यात येऊन २,५०० रुपये करण्यात आली. दुसऱ्या महायुद्धकाळात झालेल्या चलनवृद्धीचा हा परिणाम होता. १९४८ साली सुटीची मर्यादा ३,००० रुपये करण्यात आली. नंतर मर्यादा वाढवून ती १९५३ साली ४,२०० रुपये व १९५५ साली अविवाहितांसाठी ५,२०० आणि विवाहितांसाठी ६,२०० इतकी ठेवण्यात आली. ह्याचा अर्थ असा की १९७० साली घालण्यात आलेली ५,००० रुपयांची मर्यादा व्यवहारतः १९५५ सालापेक्षा कमीच आहे. पण १९५५ ते १९७० ह्या कालखंडात देशाच्या अर्थव्यवस्थेत बरीच ओढाताण उत्पन्न झाली आणि म्हणून व्यक्तीबाबत असलेल्या सुटीच्या मर्यादेचा पुनर्विचार करणे जरुरीचे झाले आहे.

### नव्या कालखंडाचे स्वरूप

देशाच्या अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने १९५५–६४ हा कालखंड आणीबाणीचा आहे. दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमात तुटीच्या अर्थसंकल्पाचा आधार फार मोठ्याप्रमाणावर घेण्यात आला. ( सुमारे ९५० रुपये तुटीचा. ) दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमात

*Deepawali Greetings to All...*

**Bank to Bank With**

# THE BELGAUM BANK LIMTED

**Scheduled Bank**

Registered Office : 659-60, Raviwar Peth,

**BELGAUM**

Invest in our "Family Benefit Deposit Scheme" and earn Monthly Interest as a Pension – Enquire at any of our Branches – Bombay office at Mandvi, Bombay-9.

**Tax advice available at the Head Office.**

**Our Motto Is : Service**

**S. Y. KAMAT** — General Manager.

**K. B. KIRTIKAR** — Chairman.

**......नम्र कोशीस करीत आहोत !**

कृषि औद्योगिक समाज रचना हा आजच्या युगातील परवलीचा शब्द झाला आहे. पण या कूट प्रश्नाचे निश्चित उत्तर काढण्याची नम्र कोशीस करीत आहोत !

● *बँकेची कृषि औद्योगिक संशोधन शाखा या कामी कार्यरत आहे.*


# कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., कोल्हापूर

गजाननराव शंकरराव भोगावकर
चेअरमन

जी. एम. जोशी — जनरल मॅनेजर

हिंदुराव बळवंतराव पाटील — व्हाईस चेअरमन

# Ogale



## रुंद तोंडाच्या कांचेच्या बरण्या

चहासाखर, मुरंबे इत्यादि नित्योपयोगी आणि साठवणाच्या वस्तु सुस्थितींत ठेवण्यासाठीं आकर्षक आकाराच्या 'ओगले' कांचेच्या बरण्या वापरा आणि स्वयंपाकघराच्या सजावटींत भर टाका.

औषधें, टॉफी, चॉकोलेट्स आदि विक्रीचे जिन्नस 'ओगले' कांच बरण्यांत ठेवा. त्यामुळें पदार्थ सुरक्षित राहून दुकानाची मांडणी मनोवेधक दिसेल.

सर्व बरण्यांना निरनिराळ्या आकर्षक रंगाची पत्र्याची बेकेलाईटची किंवा प्लॅस्टिकची हवाबंद झांकणें पुरविलीं जातात.

**ओगले ग्लास वर्क्स लि.** **पिंपरी युनिट, पिंपरी जि. पुणें.**

STUSA 1/64-3

सार्वजनिक विभागात गुंतविलेल्या भांडवलापैकी बराच मोठा भाग अशा रीतीने उभा करण्यात आला होता परंतु ह्या विभागाचे कार्य समाधानकारक रीतीने चालले नाही आणि त्यामुळे ज़ीवनावश्यक वस्तूंच्या किंमती एकसारख्या वाढत राहिल्या. त्यातच १९६० मध्ये सुरू झालेल्या दशकात भारतात राजकीय व आर्थिक क्षेत्रांत कधीही न घडलेल्या घटना घडून आल्या.त्यामुळे आगीत तेल ओतल्या सारखे झाले. १९६१ मध्ये गोव्याविरुद्ध लष्करी कारवाई करण्यात आली. हा जणू काही प्रारंभ होता. १९६२ साली भारतावर चीनच्या आक्रमणाचे अरिष्ट कोसळले. त्यामुळे भारताचा संरक्षणावरील खर्च पूर्वीपेक्षा तिप्पट ते चौपट वाढला. ह्याचा परिणाम असा झाला की तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमात फक्त आर्थिक विकासाच्या योजनांपेक्षा संरक्षण आणि विकास साधणाऱ्या कामावर अधिक जोर देण्यात आला. त्यानंतर १९६४ व ६५ साली ओळीने दुष्काळ ओढवला, व १९६५ साली पाकिस्तानने भारतावर आक्रमण केले. परिणामी, अन्नधान्य आणि लष्करी सामग्री ह्यांची मोठी आयात करावी लागली. अर्थातच आधीच तुटपुंज्या असलेल्या दुर्मिळ परदेशीय चलनाच्या साठ्याचा क्षय झपाट्याने झाला. ह्या सर्वांचा परिणाम दैनंदिन गरजांच्या वस्तूंच्या किमती भराभर चढण्यात झाला. १९६६ साली करण्यात आलेले रुपयाचे अवमूल्यन म्हणजे रुपयाची किंमत बरीच घसरल्याची सरकारने दिलेली कबुलीच म्हटली पाहिजे. १९५०–५१ ते १९५५–५६ पर्यंत किमती ७·८ टक्क्यांनीच वाढल्या होत्या. त्याच १९५५–५६ ते १९६०–६१ ह्या कालावधीत २१·७ टक्क्यांनी वाढल्या. हाच काळ देशाच्या अर्थव्यवस्थेतील आणीबाणीची परिस्थिती सुरू होण्याचा होता. १९६१–६२ ते १९६५–६६ ह्या अवधीत किमती वाढण्याची परमावधी झाली. त्या ६६ टक्क्यांनी वाढल्या. १९६० ह्या दशकात घाऊक किमतीच्या निर्देशांकात कशी वाढ होत गेली ते क्रमांक २ ह्या कोष्टकात दाखविले आहे.

### कोष्टक नं. २

#### १९६० ते १९७० च्या दरम्यान किमतीचा घाऊक निर्देशांक वाढण्याची दिशा

आधार : १९६१–६२=१००

| वर्ष | सर्व वस्तू | अन्नपदार्थ |
|---|---|---|
| १९६२–६३ | १०४·९ | १०४·८ |
| १९६३–६४ | ११३·३ | ११९·८ |
| १९६४–६५ | १२२·३ | १३२·३ |
| १९६५–६६ | १३७·५ | १५०·३ |
| १९६६–६७ | १५८·९ | १८७·९ |
| १९६७–६८ | १६०·३ | १९४·३ |
| १९६८–६९ | १६५·१ | १८६·५ |
| १९६९–७० | १६८·३ | १९०·६ |
| १९७० डिसेंबर | १८१·२ | २०७·६ |

१९६० ते ७० ह्या दशकात अन्नपदार्थांच्या घाऊक निर्देशांकांत १०८ टक्के वाढ झाली असून इतर वस्तूंच्या किंमतीत ८१ टक्के वाढ झाली आहे. १९६८–६९, १९६९–७० आणि १९७०–७१ ही वर्षे हरितक्रांती यशस्वी झाल्याची समजण्यात येतात. पण ह्या काळातही अन्नपदार्थांच्या किमती वाढत गेल्या. हा एक विरोधाभासच आहे. १९६८–६९ साली अन्नपदार्थांच्या घाऊक किंमतींचा निर्देशांक १८६·५ होता तो १९७०–७१ मध्ये २०·७६ पर्यंत उंचावला म्हणजेच तो तीन वर्षात २२ टक्क्यांनी चढला.

ह्या किंमतवाढीमुळे राहणीच्या खर्चात कितीतरी पटीने वाढ झाली आहे. ज्यांची उत्पन्ने ठराविक आहेत त्यांना हा चिमटा मुख्यतः बसला आहे. प्राप्तीवरील करासंबंधी ठेवण्यात आलेली रु. ५,००० ची मर्यादा त्यांच्या अडचणीत आणखीच भर घालणारी आहे. (१९५५–५६ पेक्षा ती कमी आहे.) चलनवृद्धी झाल्यामुळे एका बाजूने त्यांची खरेदीची शक्ती कमी झाली आहे आणि दुसऱ्या बाजूने प्राप्तीवरील कराने त्यांचे उत्पन्न घटले आहे. तेव्हा प्राप्तीवरील करासंबंधी असलेली सुटीची मर्यादा ५,००० रुपयांवरून ७,५०० रुपयांपर्यंत वाढविणे आर्थिक दृष्टीने पूर्ण न्यायाचे ठरणार आहे. भूतलिंगम् कमिशनने अशी शिफारस केली आहे. परंतु आर्थिक न्यायाचा मुद्दा सोडला तरी कारभाराच्या दृष्टीनेही ही मर्यादा सध्याच्या ५,००० रुपयांऐवजी ७,५०० रुपये ठेवण्यास सबळ कारणे दाखविता येतात. क्रमांक तीनच्या कोष्टकात ज्या करपात्र व्यक्तींचे एकूण उत्पन्न ७,५०० रुपयांहून अधिक नाही त्यांची संख्या व फोड करून दाखविण्यात आली आहे. १९५८–५९ आणि १९६४–६५ ह्या वर्षातील आकडे घेण्यात आले आहेत. त्यानंतरचे आकडे मिळत नाहीत. कोष्टकावरून असे दिसून येते की प्राप्तिकर देण्याच्या व्यक्तींपैकी ज्यांचे उत्पन्न ७,५०० रुपयांहून अधिक नाही त्यांचे प्राप्तिकर देणाऱ्या एकूण व्यक्तीशी प्रमाण मोठे आहे. त्यांचीच संख्या बरीच अधिक आहे. ह्या परिस्थितीत १९५८–५९ ते १९६४–६५ ह्या काळात फारसा फरक पडलेला नाही. १९५८-५९ साली त्यांची टक्केवारी ६३·२ होती ती १९६४-६५ साली ६५·४ टक्के झाली. परंतु करपात्र व्यक्तींकडून जमा झालेल्या एकूण उत्पन्नात त्यांच्या कडून मिळालेल्या उत्पन्नाची टक्केवारी अनुक्रमे अवघी ३१·५ व ३६ इतकीच आहे. ह्या करपात्र व्यक्तींकडून मिळालेल्या कराचे एकूण मिळालेल्या कराच्या उत्पन्नाशी प्रमाण ६·४ टक्के आणि ८·२ टक्के असे आहे. सरचार्जचे हेच आकडे अनुक्रमे ०·२ व ०·३ असे आहेत. ह्याचा अर्थ असा की, ७,५०० रुपयांपेक्षा कमी उत्पन्न असलेले ६६ टक्के करपात्र लोक करपात्र व्यक्तींकडून मिळालेल्या एकूण उत्पन्नाच्या ८·२ टक्के एवढेच उत्पन्न देतात आणि उरलेले ३४ टक्के करपात्र लोक व्यक्तींकडून मिळालेल्या एकूण उत्पन्नापैकी ९१·८ टक्के प्राप्तिकर आणि ९९·७ टक्के सरचार्ज देतात. ह्या परिस्थितीमुळे कराचे उत्पन्न फार मोठ्या प्रमाणावर कमी झाले आहे आणि काळ्या पैशाचा

## कोष्टक नं ३

### एकूण करपात्र व्यक्तींत, ज्यांचे उत्पन्न ७,५०० रुपयांहून अधिक नाही अशा व्यक्तींची संख्या

| | १९५८–५९ | | | १९६४–६५ | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | एकूण | ७,५०० रुपयांपेक्षा कमी उत्पन्नवाले | टक्केवारी | एकूण | ७,५०० रुपयांपेक्षा कमी उत्पन्नवाले | |
| करपात्र व्यक्तींची एकूण संख्या | ७,१७,३३९ | ४,५३,२३२ | ६३·२ | १२,२९,८५४ | ८,०३,७४५ | ६५·४ |
| एकूण उत्पन्न हजारांच्या आकड्यात | ६९२४२३६ | २१८०२५२ | ३१·५ | १०९१७९३५ | ३९३२८०१ | ३६·० |
| प्राप्तिकराचे उत्पन्न हजारांच्या आकड्यात | ५५,८६,०१ | ३५६५४ | ६·४ | ८०८३८१ | ६६२६७ | ८·२ |
| सरचार्जचे उत्पादन हजारांच्या आकड्यात | ३१८३२३ | ७०८ | ०·२ | ३७१४५५ | १२५९ | ०·३ |

उद्भवही तसाच होत राहिला आहे. शिवाय कर वसुली करणाऱ्या यंत्रणेवर निष्कारण जबर भार पडला आहे. आणि प्रकरणे हातावेगळी करण्यास विलंब लागत आहे.

१९६८–६९ साली एकूण प्रकरणांची संख्या ४९,९९,२३७ होती. त्यांपैकी फक्त ३४,२१,२८२ प्रकरणे संपविण्यात आली. बाकीची १५,१७,९५५ प्रकरणे तशीच पडून राहिली. शिवाय आकारणीसंबंधी घेण्यात येणाऱ्या कायदेशीर हरकतींची संख्याही वाढली. सध्या सरकारने लोकांना रोजगार पुरविण्याचा धडाक्याचा कार्यक्रम हाती घेतला आहे. त्यामुळे ज्यांचे उत्पन्न ७,५०० रुपयांपेक्षा कमी आहे, अशांच्या संख्येत बरीच वाढ होणार हे निश्चित. म्हणून प्राप्तिकर खात्याच्याच दृष्टीने व्यक्तींवरील करमुक्त रकमेची वाढ करून ती ७,५०० रुपये ठेवणे योग्य होईल. तिसऱ्या कोष्टकात दिलेल्या आकड्यावरून हे लक्षात येईल की (१९६४-६५ साल) त्यामुळे कराचे उत्पन्न सुमारे ६·६३ कोटी रुपयांनी कमी होईल. परंतु ज्या श्रीमंत करपात्र व्यक्तींकडे सध्या पुरेसे लक्ष दिले जात नाही त्यांच्याकडे ते अधिक देणे शक्य होईल आणि उत्पन्नातील सर्व घट भरून येईल. शिवाय कामाचा भार कमी होईल, करवसुली करण्यात अधिक कार्यक्षमता येईल आणि कर वसूल करण्याच्या खर्चात बरीच बचत होईल.

### करमुक्त रकमेची मर्यादा फार आहे काय?

काही तज्ज्ञांचे असे मत आहे की, इतर देशांशी तुलना करता भारतामधील सध्याची व्यक्तिगणिक प्राप्ती करमुक्त रकमेची मर्यादा फार आहे. ह्या आक्षेपकांचे म्हणणे असे आहे की भारतामधील दरडोई उत्पन्नाच्या जवळजवळ दहापट उत्पन्नाला करातून वगळणे हे अन्यायमूलक आहे. १९६४-६५ साली भारतामधील दरडोई उत्पन्न ४२१·५ रुपये होते. त्यांच्या मताने दरडोई उत्पन्नाच्या पटीच्या हिशेबात दुसऱ्या कोठल्याही देशात प्राप्तीवरील करमुक्त रकमेची मर्यादा इतकी मोठी नाही. ह्याला अपवाद फक्त ब्रह्मदेशाचा आहे. दर डोई उत्पन्नाच्या पटीच्या हिशेबात इतर काही देशांतील करमुक्त रकमेची पट पुढील प्रमाणे आहे. भारत दरडोई उत्पन्नाच्या ११·५ पट; ब्रिटन १·९ पट; अमेरिका १·३ पट आणि जपान ३·४ पट. त्या त्या देशातील दरडोई उत्पन्नाच्या पटीत हा हिशोब केलेला आहे. पण ही तुलना गैरसमज करणारी आहे. कारण ह्या देशांचे दरडोई उत्पन्न सारखे नसल्याने त्याची तुलना करता येत नाही. ४ क्रमांकाच्या कोष्टकात रुपयातील दरडोई तौलनिक उत्पन्न आणि इतर देशांतील दरडोई उत्पन्नाची, भारताच्या दरडोई उत्पन्नातील, पट दर्शविणारे आकडे दिले आहेत. ह्या आकडेवार माहितीवरून हे सिद्ध करता येईल की भारतामधील करमुक्त रकमेची मर्यादा मोठी नाही. उदा. अमेरिका घ्या. तेथे दरडोई उत्पन्नाच्या १·३ पट रक्कमच करमुक्त आहे. पण रुपयांच्या चलनात ही रक्कम ३३ हजार इतकी होईल. उलटपक्षी, भारतात करमुक्त रक्कम दरडोई उत्पन्नाच्या ११·५ पट असली तरी ती अवघी ४,२०० इतकीच होते. (१९६४-६५). इतर देशांतील करमुक्त रकमेचा मुद्दा सोडून दिला तरी तेथील कमी उत्पन्नाच्या गटातील लोकांवर बसणारा प्राप्तिकराचा बोजा, त्यांना उपलब्ध असणाऱ्या सामाजिक सुरक्षिततेच्या सवलतींनी बराच हलका होतो हे लक्षात ठेवले पाहिजे. भारतात सामाजिक सुरक्षिततेच्या सवलती अद्याप बाल्यावस्थेत आहेत. शिवाय संबंधित इतर देशांत नित्याच्या गरजांच्या वस्तूंच्या

किमती कमी-अधिक प्रमाणात स्थिर असतात. १९६३–६८ हा कालखंड घेतला (१९६३=१००) तर घाऊक किंमतीच्या-निर्देशांकात झालेली दरसाल टक्केवारी वाढ अशी होती. अमेरिका १·५ टक्के; पश्चिम जर्मनी ०·१ टक्के; जपान १·० टक्के; फ्रान्स १·४ टक्के; इटली १·९ टक्के. भारतात मात्र ती १२·७ टक्के दिसून येते. म्हणून देशोदेशींच्या करमुक्तीच्या सध्याच्या मर्यादांची तुलना करताना ह्या गोष्टींची दखल घेण्यात आली पाहिजे.

**कोष्टक नं. ४**

**काही देशांच्या दरडोई उत्पन्नाची रुपयांतील रक्कम आणि त्याचा हिंदमधील दरडोई उत्पनाच्या पटींत हिशेब**

| देश | रुपयांतील दरडोई उत्पन्न | हिंदमधील दरडोई उत्पन्नातील पट |
|---|---|---|
| भारतात | ५४३ | १ |
| ऑस्ट्रेलिआ | १३,६५० | १६ |
| फ्रान्स | १३,०३५ | २४ |
| पश्चिम जर्मनी | ११,३४० | २१ |
| इटली | ७,६५० | १४ |
| जपान | ६,९०८ | १३ |
| अमेरिका | २४,७७३ | ४६ |

ह्या ठिकाणी एक मुद्दा लक्षात घेतला पाहिजे. तो असा की देशा-देशांतील जीवनमान आणि राहणीचा खर्च वेगवेगळा असल्याने करमुक्त रकमेच्या मर्यादांची तुलना अवघड होऊन बसते. म्हणून व्यक्तिगत उत्पन्नाच्या बाबतीत करमुक्त रकमेची मर्यादा ठरविताना देशातील विशिष्ट परिस्थितीचा विचार करण्यात आला पाहिजे. ह्या परिस्थितीत कर देण्याची पात्रता, कारभाराचे सौकर्य आणि करवसुलीसाठी येणारा खर्च इत्यादी बाबींचा समावेश होतो. ह्या प्रश्नासंबंधी साचेबंद पद्धतीने विचार करण्याऐवजी सरकारने अधिक व्यावहारिक दृष्टीने विचार करण्याची वेळ आता आली आहे. लोकांत करासंबंधी जाणीव पसरविण्याच्या हेतूने जर करमुक्त रकमेची रक्कम खालच्या पातळीवर ठेवण्यात येत असेल तर हे साध्य करण्यासाठी द्यावयास लागणारी किंमत अवाढव्य आहे ह्याची कल्पना असणे आवश्यक आहे. शिवाय ह्या धोरणा-मुळे काळ्या पैशाचा साठा वाढत चालला आहे. प्राप्तिकर भरण्यास योग्य असे लोक अधिकाऱ्यांच्या नजरेतून निसटत असल्यामुळे हा परिणाम होत आहे. वांच्छू कमिटीच्या अहवालाप्रमाणे काळा पैसा सुमारे ३,००० ते ३,५०० रु. कोटी रु. असावा. पण व्यक्तिगत उत्पन्नासंबंधी करमुक्त रकमेची मर्यादा न वाढविण्याचा सरकारचा आग्रहच असेल तर कमी उत्पन्नाच्या गटांना-विशेषतः पगारदार लोकांना काही थोडी सवलत देणे सरकारला शक्य व्हावे. १९६१च्या प्राप्तीवरील कायद्यात दुरुस्ती करण्यात येऊन पगारात महागाईभत्ता मिळवून जे एकूण करपात्र उत्पन्न धरण्यात येते त्या ऐवजी एकूण उत्पन्नातून महागाईभत्ता वजा करून ते धरण्यात यावे. कारण, नित्याच्या गरजांच्या वस्तूंच्या किमती चलन-वृद्धीमुळे चढत चालल्याने जो परिणाम होतो त्याचा निरास करणे हा महागाईभत्ता देण्याचा उद्देश आहे. अशा रीतीने करपात्र उत्पन्न ठरविले गेल्यास ७,५०० रुपयांपेक्षा अधिक उत्पन्न असलेल्या लोकांची संख्या आपोआपच बरीच कमी होईल. ह्या सवलतीचा गैरफायदा घेण्यास वाव राहू नये म्हणून करपात्र व्यक्तींच्या पगाराच्या उत्पन्नातून फक्त सरकारी दराने देण्यात येणारा महागाईभत्ताच वगळण्यात यावा.


## दि राहुरी सहकारी साखर कारखाना लि.

**श्रीशिवाजीनगर, ता. राहुरी, जि. अहमदनगर**

तार-श्रीशुगर-राहुरी फॅक्टरी श्रीरामपूर — फोन नं ३०३ श्रीरामपूर ९५ राहुरी

स्थापना १९५४] [सभासद संख्या ४५१४

कारखान्याचे मान्यवर सभासद, कामगार व सेवक, हितचिंतक व असंख्य ग्राहकांचे जीवन दिपावलीच्या लाख लाख ज्योतींच्या शीतल व धवल प्रकाशाने उजाळून निघावे हीच दिपावलीच्या शुभसमयी आमची हार्दिक शुभेच्छा.

**सिझन १९७१–७२ ची उद्दिष्टये**

| उस गळीत टन | साखर उत्पादन पोती |
|---|---|
| ४,००,००० | ४,४०,००० |

**कारखान्याचे विद्यमान संचालक मंडळ**

(१) मा. लक्ष्मणराव बळवंतराव पाटील (कदम) चेअरमनसाहेब
(२) मा. रामदास विश्वनाथ धुमाळ (पाटील) व्हाईस चेअरमनसाहेब
(३) मा. मच्छींद्र दामोधर पाटील. संचालक बी. ए. एल्. एल्. बी.
(४) मा. बुवाजी बापूजी कढ्ढ (पाटील) संचालक एम्. एस्. सी.
(५) मा. कारभारी दामोधर भगत (पाटील), संचालक
(६) मा. भास्करराव पुंडलीक कोल्हे (पाटील), संचालक
(७) मा. रामदास नामदेव पवार (पाटील), संचालक
(८) मा. भिमराव रावजी हूस (पाटील), संचालक
(९) मा. बाबुराव बापुजी तनपुरे, संचालक
(१०) मा. यादवराव माधवराव तनपुरे, संचालक
(११) मा. जनार्दन दगडूजी गुरव, संचालक
(१२) सोन्याबापु यशवंतराव शेटे, संचालक
(१३) मा. सिताराम नारायण तमनर, संचालक
(१४) मा. सिताराम गुणाजी कढ्ढ (पाटील), संचालक
(१५) मा. पां. बा. पवार, कार्यकारी संचालक

पां. बा. पवार — मॅनेजिंग डायरेक्टर
रा. वि. धुमाळ, पाटील — व्हाईस चेअरमन

ल. ब. तथा अण्णासाहेब कदम पाटील
चेअरमन

# दि कागल को-ऑपरेटिव्ह बँक लि. कागल

स्थापना : १९१७

दीपावली व नूतन वर्षानिमित्त आपल्या सभासदांचे व ठेवीदारांचे शुभचिंतन

— आमचे कार्य —

| | |
|---|---|
| वसूल भाग भांडवल | रु. सव्वा लाख |
| गंगाजळी व इतर निधी | रु. दोन लाखांचे वर |
| सर्व प्रकारच्या ठेवी | रु. बारा लाखांचे वर |
| दिलेली कर्जे | रु. पावणे दहा लाख |
| खेळते भांडवल | रु. सोळा लाखांचे वर |

ऑडिट वर्ग-अ

ठेवीच्या निरनिराळ्या आकर्षक योजना व सेफ डिपॉझिटची सोय ही आमची वैशिष्ट्ये

जी. एच. शिंदे — मॅनेजर
ए. एच. जमादार — प्रेसिडेंट

# श्री महालक्ष्मी को-ऑप. बँक लि., कोल्हापूर

स्थापना : १९३३

मुख्य कार्यालय : १६७ बी, मंगळवार पेठ, कोल्हापूर.
फोन नं. २३७

शाखा : (१) शिवाजी उद्यमनगर, कोल्हापूर. फोन नंबर७०४
(२) शाहू मार्केटयार्ड, कोल्हापूर. फोन नंबर २१३५

- कोल्हापूरच्या औद्योगिक विकासास सढळ हाताने पत पुरवठा करणारी एकमेव नागरी सहकारी बँक.
- सभासदांच्या दैनंदिन गरजेकरता व व्यापार वृद्धीसाठी निरनिराळ्या प्रकारची कर्जे दिली जातात.
- ठेव खातेदारांना जास्तीत जास्त व्याज मिळवून देणाऱ्या अनेक योजना कार्यवाहीत आहेत.
- ठेव खातेदारांना पैशाची देवघेव करणेकरतां अत्यंत सोईस्कर कामकाजाच्या वेळा.
- ठेव खातेदारांना चेकचे पैसे एक मिनिटांत देणेची व्यवस्था असलेली कोल्हापुरातील एकमेव बँक.
- आपण आजच आमच्या बँकेत खाते उघडून वरील योजनेचा लाभ घ्यावा.

गो. का. पेंडसे — व्यवस्थापक
कृ. प. खासबारदार — उपाध्यक्ष
द. रा. उमराणीकर — अध्यक्ष

॥ श्री ॥

# दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लि., पुणे ३०

जेथ एक एकति पोखी । ऐसे बहुत पदार्थयेकीं ।
संपादिजती ते लोकीं । संपत्ति म्हणिजे ॥ —श्रीज्ञानेश्वरी.

मद्य निर्मितीच्या कारखान्याचे काम पूर्ण होऊन, उत्पादन सुरू झाले आहे.

साखरेचा नवीन हंगाम दिवाळीनंतर सुरू होईल.

आमचे भागीदार, ठेवीदार व हितचिंतक यांना ही दिवाळी व नूतन वर्ष सुखसमृद्धीचे व भरभराटीचे जावो.

ज. चं. आगाशे
ज्ञा. चं. आगाशे
जॉईंट मॅनेजिंग डायरेक्टर्स

# ग्राहक सहकारी सोसायट्यांची दुरवस्था

## नियंत्रित जिनसांच्या विक्रीचा पांगुळगाडा

**ग्राहक सहकारी संस्थांचा एकूण किरकोळ व्यापारातील अत्यल्प हिस्सा, त्यांच्या व्यापाराचा बहुतांश भाग नियंत्रित जिनसांच्या विक्रीचाच असणे, सरकार नियंत्रणे क्रमशः उठविणार असणे, स्टोअर्सची संख्या व त्यांचे सभासद कमी कमी होणे, ही सर्व लक्षात घेता ग्राहक सहकारी चळवळीचे भवितव्य उज्ज्वल दिसत नाही. महाराष्ट्र सरकारने ग्राहक सहकारी सोसायट्यांच्या कारभाराची पाहणी करून सुधारणा सुचविण्यासाठी एक तज्ज्ञ समिती नेमली आहे.**

भारत-चीन युद्धाच्या वेळी निर्माण झालेल्या परिस्थितीने सहकारी ग्राहक भांडाराना जोराची चालना दिली. जीवनोपयोगी जिनसांच्या किंमती चढू लागल्या. चलनवृद्धीचे दुष्परिणाम जाणवू लागले. सहकारी ग्राहक भांडारांचे जाळेच्या जाळेच पसरविण्याचे सरकारने ठरविले. तिसऱ्या पंचवार्षिक योजनेत त्याला महत्त्वाचे स्थान देण्यात आले.

तथापि, महाराष्ट्रात ह्या चळवळीची प्रगती फारशी झालीच नाही. मुंबईमधील घाऊक आणि प्राथमिक ग्राहक सहकारी भांडारांच्या कार्याची १९६७–७० मधील छाननी त्या दृष्टीने बोधप्रद होईल.

ह्या तीन वर्षांच्या काळात घाऊक मंडळांची परिस्थिती जैसे-थे राहिली. त्यांची संख्या तीनही वर्षी ८ च होती. त्यांच्या शाखांची संख्याही फारशी वाढली नाही.

तक्ता नं. १

**ग्राहक भांडारे—संख्या व सभासद**

| वर्ष | घाऊक स्टोअर्स | | | | प्राथमिक स्टोअर्स | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | स्टोअर्सची संख्या | शाखांची संख्या | वैयक्तिक सभासद | प्रत्येक शाखेचे सरासरी सभासद | स्टोअर्सची संख्या | वैयक्तिक सभासद | प्रत्येक स्टोअरचे सरासरी सभासद |
| १९६७–६८ | ८ | ५२ | ३७,२६६ | ७१७ | ३७० | १,३७,०४ | ३७० |
| १९६८–६९ | ८ | ५२ | ४१,०३७ | ७८९ | ३५७ | १,४१,०.०० | ३९५ |
| १९६९–७० | ८ | ५५ | ४३,१३९ | ७८४ | ३४५ | १,४१,४०० | ४१० |

१९६७–६८ मध्ये घाऊक मंडळांच्या शाखांची संख्या ५२ होती; १९६८–६९ मध्ये ती तेवढीच राहिली आणि १९६९–७० मध्ये ५५ झाली. प्राथमिक स्टोर्सच्या बाबतीत तर परिस्थिती अधिकच निराशाजनक होती. त्यांची संख्या ३७० वरून ३५७ आणि ३४५ वर उतरली. सहकारी घाऊक भांडारांची वैयक्तिक सभासद संख्या ३७,२६६ ची फक्त ४३,१३९ झाली. प्राथमिक स्टोअर्सची वैयक्तिक सभासद संख्या १,३७,०१४ ची फक्त १,४७,००० झाली. घाऊक भांडारांच्या शाखात भर पडली, तरी प्रत्येक शाखेच्या सभासदांच्या सरासरी संख्येत ७१७ ची ७८९ पर्यंत वाढ होऊन ती ७८४ वर घटली. प्राथमिक स्टोअर्सची हीच कहाणी आहे त्यांची दर स्टोअरची सरासरी सभासद संख्या ३७० ची ३९५ ची ४१० झाली.

प्राथमिक स्टोअरचे सुरवातीला कमीत कमी १०० सभासद असावेत आणि ही संख्या लवकरात लवकर ५०० पर्यंत पोचावी; तरच तो स्टोअर स्वतःच्या पायावर उभा राहू शकतो, असे त्याचे अर्थशास्त्र आहे. मुंबईमधील दर स्टोअरची सरासरी सभासद संख्या ४१० च्या पुढे गेलेलीच नाही. त्यामुळे त्या स्टोअर्सला पुरेसे भांडवल मिळत नाही; त्यांचा धंदाही नीट होत नाही. त्यांना वेगवेगळया जिनसा पुरेशा प्रमाणात विक्रीस ठेवता येत नाहीत. मुंबईमधील एकूण किरकोळ विक्रीत सहकारी स्टोअर्सचा वाटा अगदीच क्षुल्लक आहे. त्यामुळे त्यांचा बाजारभाव रोखण्याचे दृष्टीने काहीच उपयोग होत नाही.

सहकारी स्टोअर ही आर्थिक व्यवहार करणारी संस्था आहे. त्याने स्वतःचे सामर्थ्य निर्माण केल्याखेरीज, केवळ बाहेरील मदतीने ती टिकाव धरू शकणार नाही. ह्या दृष्टीने पाहिले, तर मुंबईमधील स्टोअर्स सरकारी मदतीमुळेच जगलेले आहेत, असे दिसून येते.

घाऊक भांडारांच्या खेळत्या भांडवलाचा प्रमुख भाग म्हणजे त्यांचे भाग भांडवल. भागभांडवलाचे खेळत्या भांडवलाशी प्रमाण १९६७–६८ मध्ये ५७% होते, ते १९६८–६९ मध्ये ६१·८५% झाले आणि पुढील वर्षी ते ६०% होते. एकूण भाग भांडवलात वैयक्तिक सभासदांचे भाग भांडवल अत्यल्प होते; बहुतेक सर्व भाग भांडवल सरकारचेच होते. (१९६७–६८ मध्ये ६१%, १९६८–६९ मध्ये, ७६% आणि १९६९–७० मध्येही ७६%). ह्याचा अर्थ, बहुतेक सर्व पैसा सरकारनेच पुरविला. भांडारांनी स्वतःच्या सभासदांकडून भांडवल उभारण्याचे पुरेसे प्रयत्न केले नाहीत. भाग भांडवलाच्या खालोखाल खेळत्या भांडवलात कर्जाचा समावेश होतो. (१९६७-६८ मध्ये २४%, १९६८-६९ मध्ये २६% आणि १९६९-७० मध्ये २७%). गंगाजळीने खेळत्या भांडवलाला फारच थोडा हातभार लावला.

प्राथमिक स्टोअर्सच्या बाबतीत भाग भांडवलापेक्षा गंगाजळीच जास्त महत्त्वाची आहे; त्यांच्याही भागभांडवलात वाढ झाली नाही. ते एकूणखेळत्या भांडवलाच्या सुमारे ३९ ते ४०% राहिले. वैयक्तिक भांडवल कमी होत गेले आणि सरकारचे भांडवल वाढत गेले.

Greetings For A Happy Diwali
And A Prosperous New Year

# UNITED COMMERCIAL BANK

Head Office : 10, Brabourne Road, Calcutta—1.

Branches in Poona | POONA CAMP, POONA CITY, SHIVAJINAGAR, YERAVDA AND PIMPRI

# लक्ष्मी विष्णु टेक्स्टाईल मिल्स लि., सोलापूर

( आपटे उद्योग समूह )

प्रमुख कार्यालय : १९१ चर्चगेट रेक्लमेशन, मुंबई-२०

भारतातील ख्यातनाम कापड निर्माते

♠ कापड उद्योगधंद्यातील अद्ययावत् प्रगतीचे मूर्तिमंत स्वरूप म्हणजे लक्ष्मी विष्णु मिल्सचे कापड
♠ भारतात एकमेव अशा प्रक्रियेने निर्माण केलेली फुलपांखरी रंगातील फुलासारखी हलकी १०० टक्के टेरीन साडी
♠ रुबाब वाढविणारे टेरीन । कॉटन शर्टिंग्ज् व सुटींग्ज्
♠ विविध रंगातील टसर
♠ अती तलम धोतरे आणि स्क्रीन प्रिंटेड फुल वाईल्स
♠ आकर्षक व चमकदार प्रिंटेड कापडाचे विविध प्रकार
♠ 'वेनी-विसि' नित्याच्या वापरातील ब्लाऊज, चुणीदार पायजमे, नाईट गाऊन्स, मुलांचे कपडे, इत्यादीं-करता खास निर्माण केलेले ३०० हून अधिक रंगछटांमधील कुसुमकोमल कापड
♠ भारतात आणि परदेशात देखील मान्यता पावलेले आकर्षक, मनमोहक आणि चैतन्यदायी लक्ष्मी विष्णु मिल्सचेच कापड नेहमी वापरा

## तक्ता नं. २

### ग्राहक भांडारे : भांडवल, कर्जे व गंगाजळी

( आंकडे हजार रुपयांचे )

| वर्ष | घाऊक भांडारे | | | | | | प्राथमिक स्टोअर्स | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | व्यक्तींचे | सरकारचे | एकूण | कर्ज | गंगाजळी | ३+४+५ | व्यक्तींचे | सरकारचे | एकूण | कर्ज | गंगाजळी | ३+४+५ |
| | (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| १९६७–६८ | १७,५३<br>(३८·९०) | २७,५३<br>(६१·१०) | ४५,०६<br>(५७·०८) | १८,८४<br>(२३·८६) | १५,०३<br>(१९·०४) | ७८,९३ | ३४,५३<br>(८८·२२) | ४,६१<br>(११·७९) | ३९,१४<br>(३९·११) | १९,०२<br>(१९·०५) | ४१,७०<br>(४१·७६) | ९९,८६ |
| १९६८–६९ | १९,३८<br>(२३·२९) | ६३,८२<br>(७६·३०) | ८३,२०<br>(६१·८५) | ३५,०६<br>(२६·०६) | १६,२५<br>(१२·०८) | १,३४,५१ | ३५,३१<br>(८६·१८) | ५,६६<br>(१३·८१) | ४०,९७<br>(३९·६७) | १९·४४<br>(१८·८२) | ४२,८५<br>(४१·५०) | १,०३,२६ |
| १९६९–७० | २०,१८<br>(२४·०२) | ६३,८२<br>(७५·९८) | ८४,००<br>(६०·४१) | ३७,३६<br>(२६·८७) | १७,६८<br>(१२·७१) | १,३९,०४ | ३५,४२<br>(८६·०१) | ५,७६<br>(१३·९९) | ४१,१८<br>(३९·७८) | १९,४४<br>(१८·७८) | ४२,८९<br>(४१·४३) | १,०३,५१ |

( १ ) आणि ( २ ) मधील कंसातील आकडे ( ३ ) शी % दर्शवितात आणि ( ३ ), ( ४ ) आणि ( ५ ) मधील कंसांतील आकडे ( ६ ) शी % दर्शवितात.

नियंत्रित जिनसांच्या व्यापारामुळेच सहकारी ग्राहक भांडारे तगून आहेत, हे काही खोटे नाही. सबंध भारतातील सबंध ग्राहक सहकारी चळवळीलाच हे लागू पडते. मुंबईतील ग्राहक सहकारी चळवळ त्याला अपवाद कशी ठरणार ?

## तक्ता नं. ३

### नियंत्रित जिनसांचा व्यापार

( आकडे हजार रुपयाचे )

| वर्ष | घाऊक भांडारे | | | प्राथमिक स्टोअर्स | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | घाऊक | | | किरकोळ | | |
| | अन्नधान्ये | इतर | एकूण | अन्नधान्ये | इतर | एकूण |
| १९६७–६८ | ५,७५,४७<br>(९५·७८) | २५,३७<br>(४·२२) | ६,००,८४ | ९,४६,९७<br>(६४·८१) | ५,१४,२१<br>(३५·१९) | १४,६१,१८ |
| १९६८–६९ | ७,१०,३४<br>(९१·८०) | ६३,४२<br>(८·२०) | ७,७३,७६ | ९,७८,००<br>(६५·१०) | ५,२४,२०<br>(३४·८९) | १५,०२,२० |
| १९६९–७० | ८,३८,९२<br>(८६·६०) | १,२९,७७<br>(१३·०४) | ९,६८,६९ | ९,७८,५०<br>(६५·११) | ५,२४,२५<br>(३४·८९) | १५,०२,७५ |

(१) आणि (२) मधील कंसातले आकडे (३) शी % दर्शवितात.

घाऊक भांडारांच्या एकूण व्यापारापैकी सुमारे ९० % व्यापार नियंत्रित अन्नधान्यांचा आहे. १९६७-६८ मध्ये तो ९६% आणि १९६८-६९ मध्ये ९२% होता. १९६९-७० मध्ये तो ८७% वर आला. घाऊक भांडारांनी आपले लक्ष इतर, नियंत्रित नसलेल्या जिनसांच्या व्यापाराकडे वळविल्याखेरीज त्यांना चांगले दिवस दिसणार नाहीत. प्राथमिक स्टोअर्सचीही अशीच परिस्थिती आहे. त्यांचा नियंत्रित अन्नधान्यांचा व्यापार ६५% च्या आसपास आहे. सरकारचे धोरण हळूहळू नियंत्रणे काढून टाकण्याचे असल्यामुळे त्यांनी नियंत्रित नसलेल्या जिनसांच्या व्यापाराकडे लक्ष वळविणे अगत्याचे आहे. खरोखर पाहिले असता, सहकारी स्टोअर्सचा उद्देश त्यांनी आपल्या सभासदांच्या आवश्यक गरजा भागवाव्या असाच आहे. त्या उलट मुंबईतील सहकारी स्टोअर्स ही नियंत्रित जिनसांची 'फेअर प्राईस' दुकाने बनली आहेत.

## दिपावली अभिनंदन

गोव्याला भेट देणाऱ्या समस्त हौशी पर्यटकांना आगामी दिवाळी व नूतन वर्ष उत्कर्षदायी व सुखसमृद्धीपूर्ण जावो ! जीवनातील चिरस्मरणीय कालाची अनुभूती घेण्यासाठी आपली दिवाळीची सुट्टी गोव्यात घालवा.

प्राकृतिक सौंदर्याची बरसात करणारे. ... मैलोगणती पसरलेले समुद्रकिनारे ... तेथील रूपेरी वाळूवर पडल्या पडल्या संध्यासमयी पश्चिम सागराची अनुपम शोभा पहा...

पर्यटन खात्याच्या अलिशान बसगाड्यांतून गगनचुंबी ख्रिस्त मंदिरे...प्राचीन देवालये यांना भेटी देऊन आपली अध्यात्मिक भूक भागवा.

पर्यटकांच्या सोयीसाठी पणजीत टोलेजंग टुरिस्ट हॉस्टेल बांधले आहे. कळगुट येथील टुरिस्ट रिझॉर्ट व मध्यमवर्गीयासाठी बांधलेले शय्यागृह (डॉर्मिटरी), कोलवा येथील टुरिस्ट कॉटेजीस, मये येथील सरोवराच्या काठी बांधण्यात आलेले लेक-रिझॉर्ट, अशी कितीतरी लहान मोठी निवास. स्थाने तुमच्या स्वागतासाठी तत्पर आहेत. ह्या सगळ्यांचा आगळा अनुभव घेण्यासाठी आजच गोव्याला भेट द्या.

अधिक माहितीसाठी लिहा अगर भेटा:- **टुरिस्ट ब्युरो, पणजी**
दूरध्वनी क्रमांक २५३५, २६७६,

**माहिती आणि पर्यटन खाते**
गोवा, दमण आणि दीव सरकारतर्फे प्रकाशित.



सर्वेऽत्र सुखिनः सन्तु सर्वे सन्तु निरामयाः ।
सर्वे भद्राणि पश्यन्तु मा कश्चिद् दुःखभाग भवेत् ॥

विटे नगरीच्या परिसरातील लोकांची
जिव्हाळ्याची एकमेव बँक

# दि विटा मर्चंटस्

## को-ऑप. बँक लि., विटा ( सांगली )

स्थापना : १४-१२-१९३६ फोन नं. ५६

| | | |
|---|---|---|
| भाग भांडवल | ... | रु १,७१,००० |
| रिझर्व्ह व इतर फंडस् | ... | रु. ३,४९,८०० |
| ठेवी | ... | रु. ३४,३३,००० |
| खेळते भांडवल | ... | रु. ४२,९६,४०० |
| ऑडिट वर्ग | ... | "अ" |

सेफ डिपॉझिट व्हॉल्ट व बँकेचे स्वतःचे मालकीची इमारत.
ठेवीवरील व्याजाचे आकर्षक दर.
बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

| | | |
|---|---|---|
| म शं. सगरे | म. ना. भंडारे | रु. पां. पुणेकर |
| प्रेसिडेंट | चेअरमन | व्हा. चेअरमन |



**ही दिवाळी आमचे हितचिंतकांस समृद्धीची जावो !**

## दि जमखंडी अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड, जमखंडी

शाखा : बनहट्टी ] स्थापना : १९४० [ फोन नं १७

**बत्तीसाव्या वर्षात यशस्वी पदार्पण !**

[ ३० जून, १९७१ अखेरचे बोलके आकडे ]

| | | |
|---|---|---|
| * वसूल भाग भांडवल | रु. | २,४२,५४० |
| * गंगाजळी व इतर निधी | रु. | ५,२४,९६४ |
| * सर्व प्रकारच्या ठेवी | रु. | ४९,५४,८०७ |
| * कर्जव्यवहारातील गुंतवणूक | रु. | ३५,०२,४८७ |
| * रोखे मुदत ठेवी वगैरेतील गुंतवणूक | रु. | १४,०२,१२५ |
| * ठेवीवरील व्याजाचे दर | रु. | १ ते ७ टक्के |
| * डिव्हिडंड ( नियोजित ) | रु. | ७½% |
| * ऑडिट वर्ग | | "अ" |

स्वतःच्या मालकीची कार्यालयाची इमारत ! मार्केट यार्डात स्वतःची नऊ गोडाऊन्स ! शाखेचे कार्यालयही मालकीचे इमारतीत ! सेफडिपॉझिट व्हॉल्टची सोय ! बँकेचे सर्व प्रकारचे व्यवहार केले जातात.

| | |
|---|---|
| म. द. खाडिलकर | एम. ए. शहा |
| मॅनेजर | चेअरमन |



# दि सांगली बँक लि.

राजिस्टर्ड ऑफिस : राजवाडा चौक, सांगली

—शेड्युल्ड बँक—

सांगली संस्थानच्या आश्रयाखाली १९१६ साली स्थापना

★ सतत ५५ वर्षे जनतेची अखंड सेवा
☆ महाराष्ट्र सरकारचे अर्धे-अधिक भांडवल
★ ग्राहकांच्या आर्थिक गरजा भागविण्यासाठी महाराष्ट्र व म्हैसूर राज्यभर शाखा

## बँकेच्या विविध ठेवी योजना

(१) दामदुप्पट योजना (२) मासिक वेतन योजना (३) संचित ठेव योजना (४) छोटी बचत योजना (५) बचत ठेव संलग्न आयुर्विमा योजना (६) कॅश सर्टिफिकेटस्.

वा. त्रिं. कोरके.
अध्यक्ष

# अल्पप्रगत नागरी सहकारी बँका : एक कैफियत

( खं. म. खंडागळे. )

सहकाराचा महिमा सांगण्यासाठीं पूर्वी जी एक गोष्ट सांगण्यात येत असे ती म्हणजे एक आंधळा आणि एक लंगडा यांची. दोघांनाही एकाच ठिकाणी पोचावयाचे होते. पण त्यासाठी ते एकएकटे असमर्थ होते. मग दोघांनी विचार केला. विचारातून आचार अवतरला, तोच सहकाराचा श्रीगणेशा. कार्यसिद्धीसाठी आंधळयाच्या खांद्यावर लंगडा बसला आणि त्याने आंधळयाला मार्गदर्शन केले. सहकाराचे क्षेत्र हळू हळू विस्तार पावू लागले.

भारतात सहकारी चळवळीचा जन्म शेतकी सहकारी सोसायट्यांच्या रूपाने झाला असे समजण्यात येते. पण हा समज हे 'कायदेशीर सत्य' होय. वस्तुस्थिति मात्र अशी आहे की, 'नागरी सहकारी संस्था' हाच सहकारी चळवळीचा पहिला अवतार, हे 'वास्तव सत्य' होय. दि. ५ फेब्रुवारी १८८९ रोजी बडोदे येथील ''नाहीरे लोकां'नी 'अन्योन्य सहकारी मंडळ' या नावाची एक सहकारी संस्था श्री. विठ्ठल लक्ष्मण कवठेकर यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू केली. अर्थात ही संस्था त्यावेळी रजिस्टर केलेली नसल्यामुळे तिच्यावर 'अधिकृत सहकारी संस्था' हे शिक्कामोर्तब तिचे जन्माच्या वेळी बसू शकले नाही. तो मान पुढे १९०४ साली पास झालेल्या को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायट्यांच्या कायद्यान्वये शेतकी सहकारी सोसायट्यांना मिळू लागला. १९०४ च्या कायद्यात शेतकी आणि बिगर शेतकी सोसायट्या काढण्याबद्दलची तरतूद होती. पण त्या काळच्या गरजेनुसार त्यावेळी शेतकी सोसायट्या स्थापन करण्यावर भर देण्यात येत असे. अधून मधून एखादी बिगर-शेतकी सोसायटी स्थापन होत असे. महाराष्ट्र आणि मद्रास (तामीळनाडू) या राज्यांच्या आजच्या शिखर बँका या, त्यावेळी स्थापन झालेल्या बिगर-शेतकी अर्बन बँकांचीच विकसित स्थित्यंतरे होत. थोडक्यात म्हणजे अर्बन बँका या कानामागून येऊन तिखट झालेल्या नाहीत. त्याही सहकारी अर्थव्यवस्थेतील एक महत्त्वाचा दुवाच नव्हे तर त्या व्यवस्थेचा अविभाज्य घटक आहेत. या घटकाची एक कैफियत आहे. ती येथे मांडावयाची आहे.

रूरल क्रेडीट सर्वे रिपोर्टाच्या शिफारशीनुसार, सहकारी संस्थामधून सरकारी भागीदारी असणे ही जवळ जवळ सिद्ध गोष्ट झाली आहे. शिखर बँकेपासून तो शेतकी सोसायटीपर्यंत अनेकांना याचा लाभ झाला आहे.

सरकारने ही कालोचित गोष्ट केली हेही योग्य झाले. भारताने सोव्हिएट रशियाशी जो मैत्रीचा करार केला त्याने आपल्या अलिप्तता वादाला जसा बाध आला नाही त्याचप्रमाणे सरकारच्या भागीदारीमुळेही सहकारी संस्थांच्या 'स्वावलंबन' या प्राणतत्त्वाला पोचा गेलेला नाही असे प्रायः सर्व सहकारीभक्तांचे म्हणणे आहे. असे असतांना, या भागीदारीच्या कक्षेत आतापर्यंत अर्बन बँकांना स्थान का नव्हते, हे कळण्यास मार्ग नाही. हा पंक्तीप्रपंच का करावा हे आकलन होत नाही. रिझर्व बँकेचे डेप्युटी गव्हर्नर श्री. डमरी यांचे अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीने उपरोक्त पंक्तीप्रपंचाचा दरवाजा थोडासा सैल केला आहे येवढेच. आमची मागणी मुक्तद्वाराची आहे.

महाराष्ट्रातील आजच्या नागरी सहकारी बँकांकडे दृष्टिक्षेप टाकला तर त्यामध्ये एक प्रकारचे 'चातुर्वर्ण्य' आहे असे दिसून येईल. भाग भांडवल, ठेवी, फंडस, गंतवणुक, कर्जवाटप, स्थावर मिळकत, नफा, लाभांश, इ. गोष्टींनी 'उच्च' असणाऱ्या पण मर्यादेत, परंपरा पाळीत व्यवहार करणाऱ्या नागरी बँका या 'ब्राह्मण' वाटतात. प्रसंगी मर्यादा बाजूला सारून, परंपरेला गवसणी घालून, वेळी दोन देऊन ज्या बँका चालू आहेत त्यांना 'क्षत्रिय' म्हणावेसे वाटते. बँकेचा 'व्यवहार' हा धंदा आहे. धंदा म्हणजे दरिया, त्यांत कधी लाटा उठतील तर कधी तो शांत राहील याची दखल घेऊन बोट वल्हवायची आणि यदा कदाचित वादळ झालेच तर कौशल्याने सर्वांनी सुखरूपपणे किनाऱ्याला लागायचे, अशा बँकाची गणना 'वैश्य' या सदराखाली करावी लागेल. आणि सर्वच दृष्टीने मागास आणि पिछ्या असलेल्या बँका या 'शुद्र'-'क्षुद्र नव्हे' असतात! हे बँकिंग चातुर्वर्ण्य आस्ते आस्ते कां होईना नाहीसे करणे आवश्यक आहे. सहकारी बँकांना लागू करण्यात आलेल्या सुधारित बँकिंग रेग्युलेशन ॲक्टमुळे ही गोष्ट घडून येण्याची शक्यता आहेच. समतेच्या या युगात कुठलेच चातुर्वर्ण्य टिकत नाही तेथे बँकिंगच्या (सहकारी बँकिंगच्या) क्षेत्रातच ते का असू यावे बरे? आपल्या घटनेने काहींना जसे 'राखीव' असे कांही दिलेले आहे, तसेच 'शुद्र' बँकांना सरकारने भाग भांडवलाचा पुरवठा करून देणे इष्ट आहे. महाराष्ट्र राज्य सहकारी सोसायट्यांचा कायदा १९६० च्या प्रास्ताविकांत म्हटलें आहे की, सहकारी चळवळीची वाढ यथायोग्य होण्यासाठीं समुचित उपाययोजना केली पाहिजे. आर्थिक दृष्ट्या असमर्थ आहेत, मागस आहेत त्यांना समर्थ आणि पुरोगामी होण्यास सरकारशिवाय अन्य कोण साहाय्य करणार आहे? इतर सहकारी घटकांना जे देता तेच आम्हालाही द्यावे हेच अर्बन बँकांचे मागणे आहे. कारण आम्ही आमच्या तुटपुंज्या भांडवलावरही 'जनसेवा' च करीत आहोत.

कार्यकर्त्यांच्या उत्साहामुळे नागरी सहकारी बँका स्थापन होतात. सुरुवातीला चांगल्या चालतात. पण पुढे त्या भांडवलाच्या कमरतरतेमुळे सर्वांच्या कर्जविषयक गरजा पुऱ्या करू शकत

नाहीत आणि याचा परिणाम सभासद आपल्या शेअर्सच्या रकमा परत मागण्यात होतो! ठेवीचा प्रवाह सतत वाहता राहतोच असे नाही. यामुळे नवजात बँकांची स्थिती चक्रव्यूहगत अभिमन्यू-सारखी अगतिक होते! याला काही भाग्यवान बँका अपवाद असतील, नव्हे आहेतच. अशाही परिस्थितीत उपरिनिर्दिष्ट बँकांपैकी काही बँका कालांतराने स्वतःच्या पायावर उभ्या राहण्याजोग्या असल्यामुळे तगून राहातात; प्राप्त परिस्थितीशी ध्येयवादाने टक्कर देतात. सरकारी कृष्णाने या द्रौपदीला वस्त्र पुरविली पाहिजेत. या बँकांना जर सरकारी भागभांडवलाचा हात मिळेल तर त्या आपली पाऊले (मंद पाउले) झपझप प्रगतीकडे टाकू शकतील. सरकारी भाग भांडवल प्राप्तीमुळे या बँकाबद्दल जनतेच्या मनात एक आगळाच विश्वास निर्माण होईल. तेव्हा अशा असमर्थ नागरी सहकारी बँकांना सरकारने मॅचिंग बेसिस वर भागभांडवल अविलंबेकरून पुरवठा करण्याची योजना आखावी अशी त्यास विनंती आहे. कृष्णाने सुदाम्याची, कुबेराची नव्हे, नगरी सोन्याची करावी.

---


# सोलापूर जिल्हा औद्योगिक सहकारी बँक नियमित

फोन: ऑफिस ३६०२ / मॅनेजर ४४३९ ‖ ऑडिट वर्ग-"अ" ‖ **सोलापूर** ‖ तारेचा पत्ता : उद्योग-बँक / स्थापना : सन १९४९ / पोस्ट बॉक्स नं. : १४०

: : मुख्य कचेरी : : २९।३० रविवार पेठ, सोलापूर

: : शाखा : : (१) नाथ चौक, पंढरपूर (२) सदर बझार, सोलापूर (३) नीला नगर, कस्तुरबा मार्केट, सोलापूर, (४) भावनाऋषी पेठ, सोलापूर. (५) सुभाष चौक, बार्शी.

३१-८-१९७१ ची बँकेची सांपत्तिक स्थिती

| | | | |
|---|---|---|---|
| अधिकृत भाग भांडवल | ... | ... | रु. ७५,००,००० |
| खपलेले भाग भांडवल | ... | ... | रु. ५५,१०,००० |
| राखीव व इतर निधी | ... | ... | रु. २२,१०,५०० |
| ठेवी | ... | ... | रु. ८०,७१,१०० |
| दिलेली कर्जे | ... | ... | रु. ३,१९,०५,५०० |
| एकूण खेळते भांडवल | ... | ... | रु. ३,७४,४९,००० |

आपल्या शाखानिशी विणकर सहकारी संस्था व औद्योगिक संस्था यांच्या सेवेत सदैव सिद्ध. ठेवीवरील आकर्षक दर, ड्राफ्टबद्दलच्या सोयी, आपल्या मौल्यवान जिनसा सुरक्षित ठेवण्यासाठी सेफ डिपॉझिट व्हॉल्टची सोय, यासाठी जरूर भेटा.

भी. वे. पप्पू, जी. डी. सी. ॲण्ड ए. जनरल मॅनेजर | रा. आ कुलकर्णी बी. ए., एलएल. बी. मॅनेजर | गं. सि. कुंचन चेअरमन

भारतातील सर्वप्रथम स्थापित व महाराष्ट्र राज्यातील एकमेव औद्योगिक सहकारी बँक



[ स्थापना १९२१ ]

# गरगट्टी ॲंड सन्स

शहापूर-बेळगाव

धोबी, फॅमिली व शिंपी पेटंट इस्त्रीचे कारखानदार

आमचे देशबांधवांस हे वर्ष सुखाचे जावो !

# कस्टम्सच्या कोंडाळ्यात विमान प्रवाशांचे हाल

## तपासणीची पद्धत सोपी केली पाहिजे.

**मुंबईत परदेशाहून येणाऱ्या प्रवाशांना कस्टम्स खात्याच्या तपासणीतून बाहेर पडणे म्हणजे एक दिव्यच वाटते. प्रवाशांची व त्यांच्या सामानांची तपासणी सुटसुटीत करण्याची जरुरी कशी आहे ते ह्या लेखात वाचा.**

हिंदुस्थानात आंतरराष्ट्रीय विमानांच्या वाहतुकीसाठी चार विमानतळ आहेत. ह्या विमानतळावर उतरणाऱ्या प्रवाशांना कस्टम्सच्या कोंडाळ्यातून बाहेर पडण्यापूर्वी फार मोठ्या कसोटीला तोंड द्यावे लागते. कस्टम्स अधिकाऱ्यांच्या तपासणीतून बाहेर पडताना त्यांना ज्या त्रासातून जावे लागते त्याबद्दल अलीकडे जोराच्या तक्रारी ऐकू येत आहेत. अर्थात, मुंबईमधील सांताक्रूझ तळही ह्याला अपवाद नाही. तसे पाहिले तर येथे उतरणारे प्रवासी हजारोंनी मोजण्याइतकेच असतात आणि कस्टम्स खात्यापुढे जे मोठे प्रश्न उभे आहेत त्यांच्या मानाने ह्या प्रवाशांची फार गैरसोय होते असेही मानता येणार नाही. परंतु एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे. सांताक्रूझचा विमानतळ हा भारतात येण्याच्या मार्गावरील हवाई तोरण समजले जाते. परदेशातून येणाऱ्या प्रवाशांना येथे ज्या प्रकारची वागणूक दिली जाते तीवरून त्यांचा हिंदविषयक प्राथमिक ग्रह बनण्यास प्रारंभ होतो हा महत्त्वाचा मुद्दा लक्षात घेतला पाहिजे. एखादा प्रवासी उतरल्यावर त्याला कस्टम्सचे कोंडाळे रिकामे असल्याचे दिसले तर त्याने स्वतःला नशिबवानच समजण्यास हरकत नाही. परंतु उतरलेल्या प्रवाशांची गर्दी असल्याच्या वेळी — विशेषतः पहाटेच्या सुमारास—तो उतरला असेल तर त्याला बराच काळ तिष्ठत काढावा लागतो. त्याशिवाय त्याची सुटकाच होत नाही. अगोदर प्रवास करताना तो विमानातील बंदी असतोच; पण विमान सोडून कस्टम्सच्या कोंडाळ्यात अडकल्यावर तर तो अधिकच दीनवाणा होतो. कोंडाळ्याच्या चार भिंतीत तो सापडलेला असतो. त्या अवधीत त्याला चहा, नास्ता, जेवण अगर पेये ह्यांचे दर्शनही होत नाही. इतकेच काय पण हवाई सुंदरीच्या सस्मित विचारणांनाही तो मुकतो. कारण, त्याच्या सामानाची तपासणी व्हावयाची असते. प्रवाशांजवळ करपात्र अशा काही वस्तू असतील तर मग विचारावयासच नको; त्याची एक तासापासून तीन तासांपर्यंत सुटका होण्याची आशाच नको. एअर इंडिआची ७४७ बोइंग जातीची विमाने आणि इतर विमानकंपन्यांची व्ही. सी.-१०, डी. सी.-८ जातीची प्रचंड जेट विमाने विमानतळावर एकामागून एक उतरत असतात आणि त्यातून शेकडोंनी प्रवासी अव्याहत बाहेर पडत असतात. त्यांची व त्यांच्या सामानाची तपासणी करण्याचे प्रचंड काम कस्टम्सच्या अधिकाऱ्यांना करावयाचे असते आणि तेही अतिशय जलदीने, जवळजवळ विमानाच्या वेगाने म्हणावयास हरकत नाही. ह्या अधिकाऱ्यांना एका आठवड्यात उतरणाऱ्या व उड्डाण करणाऱ्या २३४ विमानातील प्रवाशांकडे लक्ष द्यावे लागते. ह्या विमानात १७ आंतरराष्ट्रीय विमानकंपन्यांची विमाने असतात. कस्टम्सच्या इमारतीतील परिस्थिती अलीकडे फारच बिघडलेली दिसून येते. पहाटेच्या वेळी तर बोलावयासच नको. त्याची कारणे अशी सांगता येतील. (१) कस्टम्स खात्याचे कडक निर्बंध आणि नियम. (२) प्रवाशांचे सामानसुमान विमानातून उतरवून घेऊन कस्टम्सच्या इमारतीत आणण्याच्या कामात विमानकंपन्याकडून होत असलेली दिरंगाई आणि (३) उतरणाऱ्या विमानांची होणारी एकच भाऊगर्दी.

### वरिष्ठ अधिकाऱ्यांची वृत्ती

त्यातच अर्थखात्यातील वरिष्ठ अधिकारी आणि कस्टम्सच्या रेव्हेन्यू बोर्डातील वरिष्ठ अधिकारी ह्यांच्या गर्दीची भर पडते. कस्टम्सच्या अधिकाऱ्यांना आपले काम बजावताना ज्या व्यावहारिक अडचणींना तोंड द्यावे लागते त्यांची, आणि प्रवाशांची दुःखे ह्यांचा विचार न करताच हे वरिष्ठ अधिकारी निर्बंध आणि नियम बनवित असतात. त्यांना ह्या अडचणींची व दुःखाची क्षिती वाटत नाही. कस्टम्सच्या अधिकाऱ्यांना दिवसा अगर रात्री १२ तासांच्या पाळ्या कराव्या लागतात. त्यांचे काम ताण उत्पन्न करणारे असते. तरीही ते प्रवाशांना लवकर मोकळे करण्याची जास्तीत जास्त खटपट करीत असतात. त्यांना आळीपाळीने एकसारखे काम करावे लागते आणि आठवड्याची सुट्टीही मिळत नाही. गेल्या जूनपर्यंत कस्टम्सचे निर्बंध आणि नियम व प्रवाशांच्या सामानासंबंधीची मर्यादाही काहीशी सवलत देणारे व उदार होते. त्यामुळे प्रवासी तपासणीतून लवकर सुटण्यास मदत होत असे. परंतु त्यानंतर प्रवाशांजवळील पैशाच्या रकमेचे प्रमाण ८०० रुपयांवरून ५००रु. पर्यंत खाली आणण्यात आले. त्याच वेळी कर न देता आणण्याच्या यादीतील अनेक वस्तू काढून टाकण्यात आल्या, आणि आयात होऊ शकणाऱ्या वस्तू-बद्दल परस्पर-विरोधी निर्बंध जारी करण्यात आले. परिणाम असा झाला की तपासणी करणाऱ्या अधिकाऱ्यांना सर्वच प्रवाशांची पेटीन् पेटी उघडण्यास सांगितल्याशिवाय दुसरा मार्गच राहिला नाही. मग पुष्कळदा प्रवासी व अधिकारी ह्यांच्यात वाद उत्पन्न होतात आणि प्रवाशांची तपासणीतून सुटका होण्यास विलंब लागतो. प्रवाशांच्या संख्येत झालेली वाढ आणि तपासणी अधिकाऱ्यांची संख्या ह्यांतील प्रमाण

व्यस्त झाले आहे. सध्या असलेली तपासणी अधिकाऱ्यांची संख्या एक वर्षापूर्वी असावयास पाहिजे होती इतकीच आहे. आता त्यांची संख्या वाढविण्यात आली तरीही तपासणीस विलंब लागण्याचे टळू शकणार नाही. कारण तपासणीचे कडक निर्बंध आणि प्रवाशांना लवकर मोकळे करण्यासंबंधीची कालबाह्य चाकोरी. म्हणून निर्बंध-नियमांत बदल करण्यात आले पाहिजेत. ह्या बाबतीत परदेशांतील निर्बंध-नियमांचे मार्गदर्शन होऊ शकेल. त्याच प्रमाणे प्रवाशांबद्दल सरकारच्या वृत्तीतही मोठा बदल घडावयास हवा. पहिली गोष्ट अशी की प्रत्येक प्रवासी हा चोरून वस्तू आणणारा असलाच पाहिजे ह्या समजुतीला अधिकाऱ्यांनी थारा देता कामा नये. प्रवासी तसा असल्याचे सिद्ध झाल्यास गोष्ट वेगळी. मुंबईमधील विमानतळ हा चोरटा व्यापार करण्याचा तळ आहे असे मानण्याचे कारण नाही. अधिकाऱ्यांनी बिनचूक माहिती मिळविली आणि त्यांना मनुष्यस्वभावाची पारख करण्याचे अधिक चांगले शिक्षण दिले तर प्रवाशांशी सौजन्यपूर्ण वागणे त्यांना अधिक शक्य होईल. मग अर्थातच प्रवाशांना मोकळे करण्याचा वेळ बराच कमी लागू लागेल. सध्या प्रवाशांची वर्गवारी करून तीन रांगा बनविण्यात येतात. हौशी प्रवाशांची रांग पांढरी असते. ज्यांच्याजवळ करमुक्त वस्तू असतील पण जे हौशी प्रवासी नसतील त्यांची रांग हिरवी असते. आणि करपात्र वस्तू जवळ असणाऱ्या इतर प्रवाशांची रांग तांबडी असते. ज्या पद्धतीने ही व्यवस्था अमलात आणण्यात येते तीमुळे तिचा उपयोग होत नाही. खरे म्हणजे मुंबई विमानतळावर आणखी एक चवथी रांग बनविण्यात येत असते. कस्टम्सचे अधिकारी ह्या रांगेला आपआपसात काळसर लाल रंगाची रांग असे म्हणतात.

### तपासणीची परदेशांतील व्यवस्था

ह्या चौथ्या रांगेत कुवेत, दुबई, हाँगकाँग, सिंगापूर आणि टोकिओ ह्या 'नाजूक' भागांतून आलेल्या प्रवाशांना जावे लागते, आणि त्यांची रवानगी कस्टम्सच्या इमारतीमधील एका वेगळया भागाकडे केली जाते. तेथे त्यांच्या सामानसुमानाची विशेष कसोशीने तपासणी करण्यात येते. पश्चिम युरोपात व अमेरिकेत अशा तऱ्हेच्या रांगा लावण्याची पद्धत नाही. त्याऐवजी तेथे 'मुक्तभाग' ह्या नावाची व्यवस्था असते. प्रवाशांच्या फक्त दोनच रांगा करण्यात येतात. एक हिरवी आणि दुसरी लाल. हिरवी हौशी प्रवाशांची आणि लाल बिगरहौशी प्रवाशांची. इंग्लंडमध्ये ह्या व्यवस्थेची माहिती वृत्तपत्रांत मुद्दाम देण्यात आली होती. लाल रांगेतील प्रवाशांना सुद्धा आपल्या जवळील सामानासंबंधी एक तोंडी जबाबच फक्त द्यावा लागतो. त्यांची ताबडतोब सुटका करण्यात येते; पण मधूनच गैरप्रकार उघडकीस आणण्यासाठी एखाद्या प्रवाशाच्या सामानाची तपासणी करण्यात येते. अलीकडे काही हिंदी अधिकारी पाश्चिमात्य देशांना भेट देऊन परतले. त्यांचा अनुभव असा की लंडन, रोम, पॅरिस, आणि वॉशिंग्टन येथे एका ७४७ बोइंग विमानातून उतरणाऱ्या प्रवाशांची सुटका एका तासाच्याही आत होते. ह विमानतळ गर्दीचे म्हणून प्रख्यात आहेत. हिंदमधील कस्टम्सच्या अधिकाऱ्यांना परदेशातील गर्दीच्या विमानतळावरील तपासणीची व्यवस्था कशी असते ते अभ्यासण्याची संधी मिळावी म्हणून एअर इंडिआने काही अधिकाऱ्यांना ७४७ बोइंग विमानाने मुद्दाम परदेशी धाडले होते. परदेशांतील विमानतळावरील कस्टम्सच्या अधिकाऱ्यांना अमली पदार्थ जवळ बाळगणाऱ्या प्रवाशावरही नजर ठेवावयाची असते. परंतु त्यांचे तंत्र वेगळे असते. प्रत्येक प्रवाशाची झडती घेण्याचे त्यांना कारण पडत नाही. त्यांचे प्रशिक्षण उत्तम तऱ्हेने झालेले असते. त्यामुळे त्यांची माहिती अचूक असते. शिवाय मनुष्य स्वभावाचे त्यांचे ज्ञानही चोख असते. म्हणून चोरून वस्तू आणणाऱ्या प्रवाशांना उघडकीस आणण्याचे त्यांचे प्रयत्न बरेच यशस्वी होतात. मुंबईत हिरव्या रांगेतील प्रवाशांची सुद्धा कडक तपासणी होते. अचानक तपासणीचे तंत्र वापरण्यात येत नाही. कस्टम्सच्या अधिकाऱ्यावर नजर ठेवण्यासाठी कोंडाळ्याबाहेर कस्टम्स माहिती खात्याचे साध्या पोषाखातील अधिकारी ठेवलेले असतात. एखाद्या प्रवाशाजवळ करपात्र वस्तू असूनही याला सोडण्यात आले आहे, अशी जर त्यांना शंका आली तर ते त्या प्रवाशाला फेरतपासणीसाठी कस्टम्सच्या चक्रात परत आणतात. ह्या प्रवाशाने परवानगी असलेल्या वस्तूपेक्षा अधिक वस्तू आणल्या आहेत असे आढळून आले तर त्याच्यावर तसा आरोप ठेवण्यात येतो आणि त्यात तपासणी अधिकाऱ्याला गोवण्यात येऊन कामावरून तात्पुरते काढून टाकण्यात येते. अलीकडेच अशी काही प्रकरणे झाली आहेत. त्यामुळे तपासणी अधिकारी कसलाही धोका न पत्करता प्रत्येक प्रवाशाच्या सामानाची तपासणी करतात. मोठ्या विमानांनी प्रवासी सतत येत असतात. अशा काळात प्रवाशांची त्वरित सुटका व्हावी असा जर उद्देश असेल तर ह्या पद्धतीने अडथळेच अधिक निर्माण होतील. म्हणून सरकारने काही नियम करून प्रवाशांची सोय होईल आणि कस्टम्सच्या अधिकाऱ्यांचे काम सोपे होईल असे पाहावे. सामानासंबंधीची मर्यादा ५०० रुपयांवरून १ हजार रुपयांपर्यंत वाढविण्यात यावी. मुक्त यादीत अधिक वस्तूंचा समावेश करण्यात यावा. त्यामुळे वादात पडलेल्या प्रकरणांची संख्या खूपच कमी होईल. सध्याच दरमहा अशी ८०० प्रकरणे उपस्थित होत असतात.

### दंड वसूल करण्याची पद्धत

जे प्रवासी व्यापार करण्याइतक्या वस्तू आणतील त्यांना जबरदस्त दंड ठोठावण्यात यावा. सध्या अशा वस्तूंच्या किमतीवर १०० टक्के कर आणि १०० टक्के दंड वसूल करण्यात येतो. परंतु त्यामुळे प्रवाशांना अशी वागणूक पुन्हा करण्याविरुद्ध जरब बसणार नाही. कारण इतका दंड आणि इतका कर देऊनही अशा वस्तू विकून मोठा नफा मिळविणे शक्य असते. परदेशाहून आणलेल्या चोरबाजारातील वस्तूंचे लोकांना वेडच लागलेले आहे,

हे लक्षात घेतले पाहिजे. परवानगी असलेल्या वस्तूंपेक्षा जितक्या वस्तू अधिक असतील त्यांच्या प्रत्येक १,००० रुपये किंमतीवरही दंड व कर म्हणून प्रत्येकी १०० टक्क्यांची वसुली करण्यात यावी किंवा अशा वस्तू एकदम जप्तच करण्यात याव्यात व्यापारी प्रमाण वाटण्या इतक्या वस्तू आणणे वेगळे आणि काही थोड्या साड्या, खेळणी, अत्तरे अगर इतर वस्तू वापरण्यासाठी आणणे वेगळे. ह्या दोन्हीतील फरक कस्टम्सच्या अधिकाऱ्यांना कळावयास हरकत नसावी. दुसऱ्या बाबतीत कस्टम्सच्या वरिष्ठांनी निर्बंधांचा व नियमांचा अर्थ लावताना अधिक तारतम्य वापरावे आणि कधिकाळी परदेशप्रवासाला जाणाऱ्या खऱ्या प्रवाशांची अनावश्यक कुचंबणा थांबवावी. प्रवासी जे जडजवाहिर अथवा दागिने आणतात त्याबाबतही विचार झाला पाहिजे. एखादी स्त्री परदेशी एका वर्षापेक्षा अधिक वास्तव्य करून परत आली तर तिला १,००० रुपयापर्यंतचे दागिने बरोबर आणता येतात परंतु दोन वर्षानंतर येणाऱ्या स्त्रीला मात्र काहीच आणण्याची परवानगी नाही. आता बहुतेक प्रवाशांना दर दोन वर्षांनी परदेशाला जाणे शक्य होत नाही. ह्याचा अर्थ असा होतो की, दर दोन वर्षांनी जे परदेशाला जात नाहीत आणि त्या अवधित दागिने आणण्याची सवलत घेत नाहीत त्यांना एक प्रकारे शिक्षाच होते. कायद्याचा असा काटेकोर अर्थ लावणे चमत्कारिकच म्हटले पाहिजे. कितीही कल्पनाशक्ती चालविली तरी ह्या अर्थामागे तर्कशुद्ध युक्तिवाद आहे असे म्हणता यावयाचे नाही. अशा प्रकारचे तर्कदुष्ट नियम घड्याळे, टेलिव्हिजनसेट्स व इतर काही वस्तू-बाबत अमलात आहेत. जादा वस्तूवरील दंडांची व कराची आकारणी वसुली करण्याची पद्धतही सोपी करण्यात आली पाहिजे.

आपल्याकडील कस्टम्सच्या अधिकाऱ्यांनी परदेशातील विमानतळावर ह्या बाबतीत अमलात असलेली पद्धत पाळली तर उतारूंना होणारा त्रास आणि कुचंबणा बऱ्याच प्रमाणात कमी होण्यासारखी आहेत. परदेशातील विमानतळावर कस्टम्स अधिकाऱ्यांना वस्तूंच्या व त्यांच्या चालू किमतीच्या यादीचे एक पुस्तक दिलेले असते. त्यांच्याजवळ रोखीचे पावतीपुस्तकही असते. परवानगीपेक्षा अधिक असलेल्या वस्तूंवरील आकारणी ताबडतोब केली जाते आणि प्रवाशांकडून घेतलेल्या पैशाची त्याला लगेच पावती दिली जाते, व त्याला मोकळा करण्यात येते. मुंबईच्या विमानतळावर असिस्टंट कलेक्टर हा सर्वांत वरिष्ठ कस्टम्स अधिकारी असतो. त्याच्या खालोखाल इन्स्पेक्टर्स असतात. परंतु सर्वच प्रकरणात कलेक्टरच्या निर्णयावर अवलंबून राहाण्याचे कारण नसते. शिवाय अ. कलेक्टर चोवीस तास हजर असतात असे नाही. म्हणून इन्स्पेक्टर्सना २ हजार रुपयांपर्यंतच्या प्रकरणात ताबडतोब निर्णय घेऊन निकाल देण्याचे अधिकार देण्यात यावेत. त्यापुढील रकमेची प्रकरणे तेवढीच अ. कलेक्टरकडे सोपवावीत. असे केल्यास ॲडज्युडिकेशनची बरीच प्रकरणे कमी होतील आणि उतारूंची खूपच सोय होईल. कारण, बऱ्याच उतारूंची अंतर्गत विमानावरील तिकिटे आधीच काढलेली असल्याने त्यांच्या कडक तपासणीची येथे जरूर नसते. सध्या अशा प्रवाशांना मुंबईच्या विमानतळावर तपासणीसाठी अनेक खेपा घालाव्या लागतात. अर्थातच त्यांना मुंबईला अनिश्चित कालपर्यंत थांबावे लागते. कस्टम्सच्या इन्स्पेक्टर्सना व अधिकाऱ्यांना काही अधिकार दिल्याने प्रवाशांची गर्दी तुंबून न राहाण्यास बरीच मदत होईल. वरिष्ठ अधिकाऱ्यांनी हाताखालील अधिकाऱ्यांवर विश्वास टाकावा आणि कनिष्ठ अधिकाऱ्यांनीही उतारूंच्या सांगण्यावर विश्वास ठेवावा. उतारू चोरटा व्यापार करणारे आहेत असे समजून चालू नये. विमानतळावर संशयित प्रवाशांच्या दोन याद्या ठेवलेल्या असतात. एक कस्टम्सच्या अधिकाऱ्याजवळ व दुसरी इमिग्रेशन अधिकाऱ्याजवळ. पुष्कळदा एका यादीप्रमाणे तपासणी झाल्यावरही दुसऱ्या यादीप्रमाणे पुन्हा तपासणी होते. परदेशात अशा दोन याद्या नसतात. दोन्ही अधिकाऱ्यांची एकच यादी असते. एकदा इमिग्रेशन अधिकाऱ्यांनी यादीप्रमाणे तपासणी केली की कस्टम्सचे अधिकारी तसेच कारण असल्याशिवाय पुन्हा तपासणी करीत नाहीत.

## कामाचा पडणारा ताण

तपासणी करणाऱ्या अधिकाऱ्यावर कामाचा अतिशय ताण पडतो. १२ तासांची पाळी असल्याने त्यांच्या मनावर व शरीरावर प्रमाणाबाहेर ताण पडणे साहजिकच असते. अर्थात ह्याचा परिणाम त्यांच्या प्रवाशांशी होणाऱ्या वागणुकीत प्रतिबिंबित झाल्याशिवाय राहात नाही. कामाचे तास कमी केल्यास आणि आठवड्याची सुटी दिल्यास त्यांची कार्यक्षमता व वागणूक सुधारण्यास मदत होईल. शिवाय त्यांना खास भत्ताही देण्यात यावा; म्हणजे त्यांना मोहाला बळी पडण्याची जरूर भासणार नाही. प्रवाशांची मोकळीक लवकर करण्याच्या बाबतीत विमान कंपन्यांचीही काही जबाबदारी आहे. सध्या विमानातून सामान बाहेर काढून ते कस्टम्सच्या इमारतीत आणण्यास पाऊण तास ते तास इतका अवधी लागतो. हे काम अनेक परदेशी विमान कंपन्यांसाठी एअर इंडिआ व इंडिअन एअर लाइन्सचे आंतरराष्ट्रीय पथक करते. पुष्कळदा चार-पाच परदेशी विमान कंपन्यांची विमाने थोड्याफार फरकाने सांताक्रूझला उतरतात. अशा वेळी सामान बाहेर काढण्यास फारच विलंब लागतो. अनेकदा कस्टम्सच्या अधिकाऱ्यांनी प्रवाशांचा जबाब खरा मानून त्यांना मोकळे केले असले तरीसुद्धा त्यांना सामानासाठी वाट पाहात बसावे लागते. विमान कंपन्यांनी सामान त्वरित बाहेर काढण्याची यंत्रणा अधिक कार्यक्षम केली तर हे टळू शकेल, आणि विमान कंपन्यांचा दोष असताना कस्टम्स खात्यावर विनाकारण चिखल उडणार नाही. चोरट्या व्यापाराविषयी मशहूर असलेल्या जगाच्या ज्या भागातून प्रवासी येतात त्यांच्यापैकी जे अनेक प्रकारच्या वस्तू पेट्या भरभरून बेकायदा आणतात ते स्वतःच त्रास ओढवून घेतात.

सोलापूर शहरातील जेष्ठ व श्रेष्ठ नागरी सहकारी बँक

## दि लक्ष्मी को-ऑपरेटिव्ह बँक लि. सोलापूर.

( स्थापना : ६-६-१९२९ )

हेड ऑफिस – ३६९ द. कसबा, सोलापूर. फोन नं. ४३७४
शाखा ( १ ) साखरपेठ, सोलापूर. फोन नं. ३९४२
( २ ) अक्कलकोट, फोन नं. ६३

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. ४,०७,७८० |
| रिझर्व्ह व इतर फंडस् | रु. २,९१,७०२ |
| ठेवी | रु. ५०,७३,५३० |
| एकूण खेळते भांडवल | रु. ५९,०७,००० |
| डिव्हिडंड सन १९७०–७१ | रु. ८ टक्के. |
| ऑडिट वर्ग | अ. |

आकर्षक दराने ठेवी स्वीकारल्या जातात

सोने-चांदीच्या जिनसांच्या, व्यापारी मालाच्या व मुदत ठेव इत्यादी तारणावर सभासदांना कर्जे देण्याची सोय केली आहे.

लघुउद्योगांना हायपॉथीकेशनची कर्जे देण्याची खास सोय केली आहे.

कृ. ल. सिद्रम, मॅनेजर.

## परभणी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. परभणी

तारेचा पत्ता: शेतकी बँक, मुख्य कार्यालय, परभणी.
फोन नं. ६४ व १४९

परभणी जिल्ह्यात सहकारी चळवळीचा अविरत प्रचार करणारी व ग्रामीण विभागातील शेतकऱ्यांच्या व ठेवीदारांच्या विश्वासपात्र झालेली एकमेव सहकारी संस्था.

जिल्ह्यात सर्वत्र विखुरलेल्या ठेव विमा योजनेखाली सुरक्षित ३० शाखांमार्फत ठेवीदारांना व ग्राहकांना बँकिंगची सोय उपलब्ध करून देते.

आपल्या संभाव्य व नियोजित ठेवी या बँकेत ठेवून सहकारी चळवळीस यशस्वी करा. अधिक माहितीसाठी नजिकच्या शाखेत चौकशी करावी.

बँकेचे सभासद, ठेवीदार, ग्राहक व हितचिंतकांना नवीन वर्ष उत्कर्षाचे व आनंदाचे जावे, हीच शुभेच्छा.

शा. शे. ताडलिंबेकर.
व्यवस्थापक

लिं. ना. दुधगावकर.
चेअरमन

## दीपावली अभीष्टचिंतन

वारणा नदीत पाणी नसतानाही निसर्गावर मात करून ऊसकरी शेतकऱ्यांचा ऊस गळीत करणारा

## श्री वारणा सहकारी साखर कारखाना लि.,

— वारणानगर —

पोस्ट : वारणानगर, तालुका पन्हाळा,
जिल्हा कोल्हापूर.

तार : वारणासाकर : वारणानगर ] [ फोन नं. कोल्हापूर २२४६

श्री. विश्वनाथ आणणा कोरे,
चेअरमन

## रत्नागिरी अर्बन को-ऑप. बँक लि.

मुख्य कार्यालय – सुभाष रोड, रत्नागिरी

शाखा संख्या : ६

दूरध्वनी क्रमांक : ९३ तार : अर्बन बँक

आर्थिक अप्रगत समाजाच्या उत्कर्षासाठी साह्य करणारी रत्नागिरी जिल्ह्यातील प्रमुख सहकारी बँक.
आपली बचत बँकेमधील बचत ठेवींमध्ये, मुदतीचे ठेवींमध्ये, स्वल्प बचत अगर संचयी ठेवीमध्ये गुंतवा
व
आकर्षक व्याजाचा लाभ घ्या.

– अप्रगत समाजाचे उन्नतीसाठी साह्य करा –

| | |
|---|---|
| खेळते भांडवल | रु. ७२ लक्ष |
| ठेवी | रु. ५६ लक्ष |
| भाग भांडवल निधी | रु. ६ लक्ष |

बँकिंगचे सर्व व्यवसाय केले जातात.

वि. वि. भाटवडेकर
मॅनेजर

# हॉटेल व्यवसायाचा राष्ट्राच्या आर्थिक विकासाला हातभार

( श्री. अजित केरकर, इंडिन हॉटेल्स कं. चे कार्यकारी संचालक )

आंतरराष्ट्रीय प्रवास आणि प्रवासी यांना गेल्या शतकात एक आगळे महत्त्व आलेले आहे. असे दिसून आलेले आहे की, राष्ट्रीय उत्पन्नात ५ ते ६ टक्के वाढ झाली, तर परदेशातील प्रवाशांपासून मिळणाऱ्या उत्पन्नांत ९·५ टक्के इतकी वाढ होते. दरडोई उत्पन्नात एक टक्का वाढ झाली तर परदेशातील प्रवास खर्चात १·५ टक्के इतकी वाढ होते. याची जाणीव असल्यानेच अधिकाधिक परदेशी प्रवाशी भारतात कसे येतील, याकडे लक्ष पुरविणे भागच होते. १९७३ अखेर ४ लाख, १६ हजार परकीय प्रवासी येतील अशी आमची योजना आहे. हीच संख्या १९८० सालअखेर दहा लाख व्हावी अशी अपेक्षा आहे.

### व्यवसायाच्या विकासाची रूपरेषा

आता परदेशातून येणाऱ्या या इतक्या प्रवाशांची व्यवस्था करावयाची म्हणजे त्यांच्या गरजा भागतील अशा ४० हजार खोल्यांची जरुरी आहे. सांप्रत आमच्याजवळ १० हजारच खोल्या आहेत. म्हणजे १ ते ५ स्टार्स हॅटेलांना अद्याप ३० हजार खोल्यांची गरज आहे. प्रत्येक खोली उभारण्याचा कमीत कमी काटकसरी खर्च रु. एक लाख धरला तरी ३० हजार खोल्यांसाठी ३०० कोटी रुपयांच्या भांडवली खर्चाची गरज आहे.

तसे पाहिले तर १९६६–६७ पर्यंत कोळसा, वीज, लोखंड व पोलाद या व्यवसायांत गुंतलेले भांडवल विचारात घेता आमच्या हॅटेल आणि रेस्टॉरंट व्यवसायात गुंतलेले भांडवल अगदीच अल्प म्हणजे केवळ रु. १३·३१ कोटी एवढेच आहे. या व्यवसायामुळे राष्ट्राच्या आर्थिक विकासावर किती उपयुक्त परिणाम घडून येतात, याकडे सरकारने द्यावे तितके लक्ष दिलेले नाही. याबाबत आम्ही सातत्याने सांगत आहोत. त्या दृष्टीने १९६७ सालच्या अंदाजपत्रकात केंद्र सरकारने या व्यवसायाचे महत्त्व ओळखून कराबाबत बऱ्याचशा सवलती दिल्या. पण आश्चर्य म्हणजे १९७१–७२ च्या अंदाजपत्रकात त्यात फिरून बरीच कपात करण्यात आली.

### उपलब्ध होणारे रोजगार

या व्यवसायाची उपयुक्तता सुरुवातीपासूनच लक्षात येणारी आहे. हॅटेलसाठी नवीन खोल्या उभारावयाच्या म्हणजे बिनकसबी, अर्धकसबी व कसबी कारागिरांना नोकरीची संधी. ३० हजार नव्या खोल्या म्हणजे ९० हजार माणसांना सरळ सरळ काम. त्याशिवाय पूरक म्हणून ९ लाख व्यक्तींना अप्रत्यक्ष काम म्हणजे जवळ जवळ दहा लाख व्यक्तींच्या रोजगाराची सोय. अगदी कमीत कमी हिशेब केला तरी ९० हजार सेवकांना मासिक सरासरी ४०० रुपये मिळू शकतील.

वरील सरळ हिशेब सोडला तरी या व्यवसायातील वाढीने येणाऱ्या-जाणाऱ्या प्रवाशांची वाहतूक म्हणून टॅक्सी व बसेस यांना भाडे मिळेल. विविध वस्तू विक्रीची दालने, हातमाग व्यवसाय, लोहमार्ग, हवाईमार्ग, यांवरील प्रवासामुळेही पैसा मिळू शकेल. प्रवासाची व प्रवाशांची व्यवस्था पाहणारे एजंटस् यांनाही चांगलाच अर्थलाभ होईल. म्हणजे प्रथम निर्देश केल्याप्रमाणे ३०० कोटी रुपये भांडवलावर १९८० अखेर ३० हजार खोल्या तयार झाल्या तर त्यांमुळे प्रतिवर्षी १५० कोटी रुपये मिळू शकतील. त्यांपैकी ७५ कोटी खोल्यांच्या भाड्यापोटी, ६६ कोटी खाद्यपेये व ९ कोटी अन्य प्रकाराने एकूण उत्पन्न वरीलप्रमाणे होईल.

### देशांतर्गत फायदा

या उत्पन्नाचा फायदा पुढीलप्रमाणे होऊ शकेल.

मांस, मासे, भाज्या, अंडी, पेये, आदी वस्तूंच्या खरेदीमुळे २५·५ कोटी; आवश्यक ते गरजेचे सामान, विद्युत् उपकरणे, बिछाने, सतरंज्या, लिनन, पडद्यांचे साहित्य, काच सामान, चिनी मातीची भांडी, मेजावरील चांदीची उपकरणी, स्वयंपाक घरातील उपकरणी, वगैरे माल ७·५ कोटी, असे ३३ कोटी रुपये त्या त्या व्यवसायिकांना मिळतील. यामुळे देशातील विविध उद्योग-व्यवसायास सातत्याने काम मिळेल.

तसेच पाणीपुरवठा व अन्य स्थानिक कर यांमुळे स्थानिक नगरपालिका व महानगरपालिका यांना प्रतिवर्षी २ ते ३ कोटी रुपये मिळू शकतील.

अनेक राज्यांतून खाद्यपेयांवर निरनिराळा विक्रीकर आहे. त्याशिवाय हॅटेल्समधून वापर केल्या जाणाऱ्या विजेवरही कर घेतला जातो. तसेच हॅटेलांना लीजवर जी जागा देण्यात येते त्यावरही भाडे द्यावे लागतेच. असे उत्पन्न दरवर्षी ११ कोटींच्या आसपास राहील.

प्रवाशांची सोय करणाऱ्या एजंटसना कमिशन मिळते ते २५ टक्के धरले तरी त्यांचे उत्पन्न प्रतिवर्षी २ ते ३ कोटी रुपये होईल.

प्राप्तिकर, फोन, टपाल व तार यांमुळे केंद्र सरकारलाही खालीलप्रमाणे उत्पन्न मिळू शकेल.

प्राप्तिकरापोटी १२ कोटी, फोन व टपाल खर्च दीड कोटी असे साडेतेरा कोटींच्या आसपास मिळून परदेशातून आणल्या जाणाऱ्या वस्तूंवरील आयात करही मिळेल.

म्हणजे वरील सर्व मिळून प्रतिवर्षी ६२ कोटी रुपयांची उलाढाल होईल.

### परकीय चलनात वाढ

त्याशिवाय परदेशातील प्रवाशांकडून परकीय चलनाद्वारे राष्ट्राचा फायदा होईलच. १९७१ सालात परकीय प्रवाशांकडून ४५ कोटींचे चलन मिळावे अशी अपेक्षा आहे. मात्र परदेशी प्रवाशांच्या संख्येत १९७० सालापेक्षा १८ टक्क्यांनी वाढ झाली पाहिजे. म्हणजे १९८० अखेर दहा लाख परदेशीय प्रवासी आले तर १३५ कोटींचे परकीय चलन मिळू शकेल. या रकमेपैकी ४६ टक्के हॅटिलमधील वास्तव्य व करमणूक आणि उर्वरित ५४ टक्के आपल्या देशातला प्रवास, खरेदी व अन्य बाबी यांवर खर्च होईल. म्हणजे, वरील रकमेतील ७२ कोटी रुपये देशातच राहतात.

इतर सर्व व्यवसायांपेक्षा हॅटिल व्यवसायाचे स्थान वैशिष्ट्यपूर्ण आहे, ते अशा दृष्टीने की त्यामुळे राष्ट्रातील विविध उद्योगधंद्यांचा विकास होऊ शकतो. तसेच लोखंड व पोलाद, रसायने, वीजनिर्मिती या व्यवसायांपेक्षा हॅटिल व्यवसायातले आर्थिक फायदे २ ते ३ वर्षांच्या मुदतीनंतर उपलब्ध होऊ लागतात. सरकारसुद्धा आपणा सर्वांना ही वस्तुस्थिती ज्ञात आहे, पण नव्या अंदाजपत्रकात "प्रवास व्यवसाय हा प्रत्येकाला लाभदायक आहे." या सत्यवचनाचा विसर पडलेला दिसतो

हॅटिलच्या व्यवसायाच्या प्रारंभीची पाच वर्षे, अनेक बाबतीत सिलोनसारख्या देशात करमाफी मिळते, त्यांच्या विकासास मदत करण्यात येते. याउलट भारतात त्या दृष्टीने काहीच सोयी नाहीत.

### सरकारी साहाय्याची गरज

सर्व गोष्टींचा साकल्याने विचार करता हॅटिल व्यवसायाचा राष्ट्राच्या आर्थिक विकासात केवढा मोठा वाटा आहे याची जाणीव सरकारला पूर्णतया झालेली आहे असे वाटत नाही. ज्या काही करविषयक सवलती होत्या, त्याही या व्यवसायाचा सर्वांगीण विकास होण्याआधीच रद्द करण्यात आल्या आहेत. ही वस्तुस्थिती आशादायक वाटत नाही. पण आशा आहे की, या व्यवसायातून राष्ट्राच्या आर्थिक विकासाला जो हातभार लागतो तो विचारात घेता केंद्र व राज्य सरकार या व्यवसायाच्या विकासास हातभार लावण्यास हात आखडता घेणार नाहीत.


शेती सुधारण्याकरिता व पर्यायाने आर्थिक पातळी उंचावण्याकरिता सोलापूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे आशास्थान असलेली

## सोलापूर जिल्हा सहकारी भू-विकास बँक मर्यादित, सोलापूर

र. नं. :— २४९३० ◆ दिनांक :— १-१-१९५९ ◆ दूरध्वनी क्र. :— ३८६५

शाखा :—द. सोलापूर, उ. सोलापूर, सांगोला, करमाळा, माढा, पंढरपूर, बार्शी, मोहोळ, अकलूज, मंगळवेढा आणि अक्कलकोट,

| | | | |
|---|---|---|---|
| (१) वसूल भाग भांडवल | रु. ९९लाख ४१हजार | नवीन विहिरी :— | १५,८०७ |
| (१) खेळते भांडवल | रु. ७कोटी ९३लाख ७९हजार | जुन्या विहिरी :— | ४६९१ |
| (३) सभासद संख्या | ३८,३८७ | तेलयंत्रे | |
| (४) आतापर्यंत वाटलेली कर्जे | रु. १०कोटी ५३लाख | व पंपिंग सेटस् :— | ८,४९१ |

वरील तगाई योजनेशिवाय जमीन सुधारणा, जमीन खरेदी, जुने कर्ज निवारण, ट्रॅक्टर खरेदी, उपसा जलसिंचन योजना, विशाल विहीर योजना, सलग विभाग विकास योजना आणि ग्रामीण विद्युतीकरण योजना वगैरेंसाठीं अल्प दराच्या व्याजात दीर्घ मुदतीची कर्जे देते.

बँकेच्या आर्थिक मदतीने सोलापूर जिल्ह्यातील सुमारे ६६ हजार एकर जिराईत जमिनीचे बागायत जमिनीत रूपांतर होऊन शेतकऱ्यांच्या आर्थिक उत्पादनात सुमारे ६६ लाख रुपयांची वाढ झालेली आहे.

महाराष्ट्र सरकारकडून मंजूर झालेली "विशेष भू-संवर्धन योजना" बँकेने यशस्वीरीत्या कार्यान्वित केलेली असून या योजनेखाली बँकेने सुमारे ५३ लाख, ७८ हजार रुपयांचे कर्ज मंजूर केलेले आहे.

रा. बा. टोणपे, बी. कॉम. व्यवस्थापक

किसनलाल रामचंद्र मारवाडी, बी. ए., एलएल. बी., एम. एल. ए. उपाध्यक्ष

शंकरराव नारायणराव मोहिते-पाटील, एम. एल. ए., (अकलूज) अध्यक्ष

# डिझेल एंजिनांच्या धंद्यांतील मंदी

## श्री. शंतनुराव किर्लोस्कर ह्यांनी गैरसमजांचे केलेले निराकरण

विजेच्या साह्याने चालणारे पंप वाढत चालल्यामुळे डिझेल एंजिनांच्या धंद्याला मंदी आली आहे असा एक समज अलीकडे पसरला आहे. त्याचे निराकरण व मर्यादा किर्लोस्कर ऑइल एंजिन्स कंपनीचे अध्यक्ष श्री. शंतनुराव किर्लोस्कर ह्यांनी कंपनीच्या २५ व्या वार्षिक साधारण सभेत स्पष्ट केली.

कंपनीच्या लहान अश्वशक्तीच्या डिझेल एंजिनांना अपेक्षेप्रमाणे मागणी आली नाही हे मी गेल्या वर्षी निर्देशलेले आहेच. त्यामुळे कंपनीला कठीण परिस्थितीला तोंड द्यावे लागले. गेल्या वर्षी लहान अश्वशक्तीच्या एंजिनांनाच मंदीची झळ लागली होती. मोठ्या अश्वशक्तीच्या एंजिनांची मागणी सामान्यपणे बरी होती. म्हणून ही मोठी एंजिने तयार करण्यावर लक्ष केंद्रित करण्यात आले. ही एंजिने मुख्यत: ट्रॅक्टर्स ओढण्यासाठी वापरण्यात येतात. तथापि, चालू वर्षी ट्रॅक्टर्सची विक्रीही कमी झाली; अर्थातच मोठ्या अश्वशक्तीच्या एंजिनांची विक्रीही बरीच घटली आणि आता हा सर्वच उद्योगधंदा मंदीला तोंड देत आहे. चालू वर्षी ह्या धंद्याला काही बाबतींत अनुकूल परिस्थिती आहे तर काही बाबतींत प्रतिकूल परिस्थिती आहे. देशाच्या काही भागात पाऊस चांगला झाला आहे तर इतर भागात तो अपुरा आहे. त्यामुळे एंजिनांना येणाऱ्या मागणीसंबंधी अंदाज बांधणे कठीण झाले आहे. शेतकऱ्यांना कर्जे देण्यासंबंधी व्यापारी बँकांनी संमिश्र धोरण स्वीकारले आहे. काही भागात कर्जे देण्याबाबत सवलतीचे धोरण स्वीकारण्यात आले आहे तर काही भागात त्यावर अधिकाधिक निर्बंध घालण्यात येत आहेत. असे असले तरी एक गोष्ट आशादायक आहे. ऊस, कापूस आणि इतर नगदी पिकांच्या किमती वाढण्याची चिन्हे दिसत आहेत. लहान अश्वशक्तीच्या एंजिनांची मागणी वाढण्याच्या दृष्टीने ही परिस्थिती अनुकूल आहे. शेतकऱ्यांना पैशाचा पुरवठा व्हावा म्हणून किर्लोस्कर ऑइल एंजिन्स कंपनीने आपल्यापरीने बँकांबरोबर विचारविनिमय करून काही खास व्यवस्था केली आहे.


### कालव्यांमुळे विहीरींना पाणी


आता विजेवर चालणारे पाणी उपसण्याचे पंप आणि डिझेल एंजिनांच्या साह्याने चालणारे पंप ह्यांना येणाऱ्या मागणीसंबंधी ज्या दोन गैरसमजुती आहेत त्यांचा विचार करू. विजेचा प्रसार जसजसा होत जाईल तसतशी विजेच्या पंपांची मागणी वाढत जाईल आणि डिझेलवर चालणाऱ्या पंपांची मागणी कमी होईल अशी समजूत सर्वसामान्यपणे प्रचलित आहे. वरवर विचार केला तर हे खरे वाटते; परंतु अधिक खोल गेल्यास असे आढळून येते की डिझेल एंजिनांच्या मागणीत घट झाल्यामुळे त्याच प्रमाणात विजेवर चालणाऱ्या पंपांच्या मागणीत वाढ झालेली नाही. गेल्या वर्षी दोन्ही प्रकारच्या पंपांची मागणी घटली, ह्यावरून हे उघड होते की धंद्यात एकंदरीने मंदी आहे, आणि विजेवर चालणाऱ्या पंपांची मागणी व डिझेलवर चालणाऱ्या पंपांची मागणी ह्यांचा प्रत्यक्ष संबंध नाही. दुसरा गैरसमज असा आहे की ज्या ठिकाणी कालव्याच्या साह्याने पाणीपुरवठा करण्यात येतो त्या ठिकाणी पाणी उपसून जमीन भिजविण्याची जरूर पडत नाही, आणि म्हणूनच अशा भागात विजेच्या अगर तेलाच्या, कोठल्याच प्रकारच्या पंपांची गरज राहात नाही. परंतु हा विचार अंशत:च बरोबर म्हणता येईल. कालव्याच्या दोन्ही बाजूंच्या उतारावर पाट काढून पाणी घेता येईल हे खरे; तेव्हा कालव्याच्या दोन्ही बाजूंना थोड्याफार अंतरापर्यंतच्या चिंचोळ्या पट्टींत कोणत्याच प्रकारच्या पंपांची जरूर लागणार नाही हे खरेच. परंतु कालव्याच्या पाण्याने भिजू शकणाऱ्या जमिनीच्या पट्ट्यापुरतेच हे बरोबर आहे. आणखी विचार करता असे दिसून येते की ज्या भागातून कालव्याचे पाणी वाहते त्या भागातील विहिरींचे पाणी कालव्यांतून जमिनीत झिरपणाऱ्या पाण्यामुळे वाढते. भूमिगत पाझरामुळे ह्या विहिरींच्या पाण्याची पातळी टिकूनही राहते. कारण सर्वच भागातील भूमिगत पाण्याची पातळी कालव्यामुळे वाढत असते. मुख्य कालव्यापासून आणखी फाटे काढणे नेहमीच आर्थिक दृष्ट्या परवडणारे नसते. म्हणूनच कालवा गेलेल्या भागातील दूरवरच्या क्षेत्रात विजेच्या व तेलांच्या पंपांची मोठी मागणी येते. विहिरींना कालव्यामुळे आलेल्या पाण्याचा उपसा करण्यासाठी त्यांची जरूरी लागते. तेव्हा कालव्याच्या पाणीपुरवठ्याच्या सोयी जसजशा वाढत जातील तसतशी पाणी उपसणाऱ्या पंपांची मागणी कमी होत जाईल हे म्हणणे बरोबर नाही. उलट, त्यामुळे सतत टिकून राहणारी मागणी येत राहील.

### मग एंजिनांना मागणी का नाही ?

असे जर आहे तर एंजिनांच्या व पंपांच्या मागणीत घट का झाली आहे असा प्रश्न साहजिकच उपस्थित होतो. एंजिनांच्या विक्रीची कंपनीची संघटना सर्व देशभर पसरलेली असल्याने ह्या बाबतची खरी परिस्थिती सहज समजू शकते. मागणी घटण्याचे मुख्य कारण एकच आहे. ग्रामीण भागात विजेचे अगर तेलाचे पाणी उपसण्याचे पंप घेण्यासाठी पुरेसा पैसा नाही हे ते कारण आहे. माझ्या मताप्रमाणे दुसरे काही कारण नाही. वृत्तपत्रांत प्रसिद्ध झाल्याप्रमाणे सहकारी व व्यापारी बँकांना शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणावर पैशाचा पुरवठा केलेला आहे. परंतु ह्या कर्जपुरवठ्यापैकी बराच मोठा भाग शेतकऱ्यांनी वेळेवर परत केलेला नाही. दुर्दैवाने कोणत्या तरी कारणाने कर्जवसुलीचे काम नीट झालेले नाही. व्यापारी उलाढाली चालू राहण्यासाठी पैशाचा प्रवाह फिरता असल्याशिवाय चालणार नाही. शेतीच्या व्यवसायाचा विस्तार होत चालल्यामुळे त्याला पैशाचा पुरवठा अधिक प्रमाणात करण्यात आला पाहिजे ह्याबद्दल वाद होण्याचे कारण नाही.

---





इंजिन असो अगर इलेक्ट्रिक मोटार असो त्यांस "विजय" पंपाची आवश्यकता आहेच. विजय पंप विनातक्रार अखंड पाणीपुरवठा करतात.

कारखानदार—

**न्यू विजय इंडस्ट्रीज लि.**

विश्रामबाग—सांगली ( महाराष्ट्र )

फोन : २३१ तार : Vijayplow



चवदार पिठासाठी

**पिठाच्या चक्क्या**

- बॉल बेअरिंग्ज बसविलेल्या
- मजबूत बांधणी
- अद्यावत् यंत्र योजना
- साईज १४", १६", १८"

फोन नं. १६९



उत्पादक—

**भिडे अॅन्ड सन्स, प्रा. लि. सांगली**

महाराष्ट्र राज्य.






सोल सेलींग एजन्टस्

**नोगी सेल्स् कॉर्पोरेशन**

१७७ जगन्नाथ शंकरशेठ रोड, मुंबई २. बी आर.

# सहकारी हाउसिंग सोसायट्यांच्या व्यवहारावर विदारक प्रकाश

## महाराष्ट्र को-ऑपरेटिव्ह ट्रिब्युनलचा निवाडा

मॅनेजर हा मॅनेजिंग कमेटीचा सभासद नसतो, मॅनेजिंग कमेटीने पास केलेल्या ठरावांत त्याचे अंग नसते, मॅनेजिंग कमेटीच्या कृत्याबद्दल त्याला जबाबदार धरता येत नाही. [ महाराष्ट्राचा सहकारी कायदा, कलम ८८. ]

मॅनेजिंग कमेटीच्या ज्या कृत्यामुळे सोसायटीचे नुकसान झाले त्या कृत्यात मॅनेजिंग कमेटीच्या ज्या सभासदांनी भाग घेतला नाही त्यांच्यापासून नुकसान भरून मागता येत नाही. [ महाराष्ट्राचा सहकारी कायदा, कलम ८८. ]

१. वर्धेला मिडल क्लास को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी ह्या नावाची एक सोसायटी होती. श्री भाके हे त्या सोसायटीचे अध्यक्ष होते. सोसायटीच्या मॅनेजिंग कमेटीत एकूण ७ सभासद होते. सभासदांना प्लॉटस् विकत घेण्यासाठी व घरे बांधण्यासाठी कर्ज देण्याच्या उद्देशाने ती सोसायटी काढण्यात आली होती.

२. चंदूलाल शहा नावाच्या एका इसमाच्या मालकीची बरीच जमीन होती. त्या जमिनीपैकी २ एकर जमीन विकत घेऊन तिचे प्लॉटस् पाडावे व सभासदांना घरे बांधण्यासाठी ते प्लॉटस् द्यावे अशी योजना सोसायटीने आखली होती. चंदूलाल जमीन विकण्यास तयार होता परंतु सोसायटीने म्हणजे तिचे अध्यक्ष श्री. भाके यांनी प्रत्यक्ष चंदूलालपासून जमीन विकत न घेता कान्नव नावाच्या एका इसमाला सोसायटीतून १५ हजार रुपये कर्ज देवविले. कान्नवने ती रक्कम घेऊन चंदूलालपासून १५ हजार रुपयांस २ एकर जमीन विकत घेतली व ४ च दिवसांनंतर ती जमीन सोसायटीला २५,९३५ रुपयाला विकली.

३. सोसायटीने अशारीतीने जमीन विकत घेतल्यानंतर त्या जमिनीचे लहान लहान प्लॉटस् पाडण्यात आले. सोसायटीचे अध्यक्ष श्री. भाके व मॅनेजिंग कमेटीचे एक सभासद श्री. भूत यांचेकडे त्या प्लॉटसवर बांधल्या जाणाऱ्या इमारतींची देखरेख सोपविण्यात आली. त्या दोघांनी संगनमत करून आपल्या आश्रयाखालील १२ इसमांना त्या प्लॉटसवर घरे बांधण्यासाठी कर्ज मंजूर केले. त्या १२ इसमांना सभासद करून घेण्यापूर्वीच त्यांचे कर्ज मंजूर करण्यात आले. त्या इसमांना स्वतःसाठी घरे बांधावयाची नव्हती व त्यांची तशी ऐपतही नव्हती. घराच्या बांधकामात त्या १२ इसमांनी मुळीच भाग घेतला नाही. भाके व भूत ह्या दोघांनीच सर्व देखरेख केली. त्या घरांशी अथवा कर्जाशी त्या १२ इसमांचा व्यक्तिशः संबंध नव्हता. भाके व भूत ह्या दोघांच्या सांगण्यावरून कागदपत्रावर त्यांनी फक्त सह्या केल्या होत्या. घरे बांधून तयार झाल्यानंतर जबर फायदा घेवून ती दुसऱ्या कोणाला देता यावी ह्या उद्देशाने भाके व भूत ह्या दोघांनी त्या १२ इसमांना नावापुरते पुढे केले होते. त्या १२ इसमांनी कर्जाची फेड केली नाही कारण कर्जाशी त्यांचा फक्त नावापुरता संबंध आला होता. त्यांना घर नको असल्यामुळे कर्ज फेडण्याचे त्यांना काही कारण नव्हते. कर्जाच्या फेडीत प्लॉट व त्यावर बांधलेले घर आपण सोसायटीला परत करण्यास तयार आहोत असे सोसायटीला कळविण्यास त्या १२ इसमांना मॅनेजिंग कमेटीने सांगितले. त्याप्रमाणे १२ इसमांपैकी १० इसमांनी आपआपली घरे कर्जाच्या फेडीत सोसायटीला परत केली. ( सरेंडर केली. )

४. भाके, भूत व मॅनेजिंग कमेटीचे इतर सभासद यांनी प्लॉटस् व त्यांवर बांधलेली घरे यांच्या बाबतीत जे अप्रामाणिक वर्तन केले त्याबाबत बराच गवगवा झाला. त्यामुळे सोसायटीच्या कारभाराची चौकशी करण्यासाठी रजिस्ट्रारने एका अधिकाऱ्याची नेमणूक केली. त्या अधिकाऱ्याने चौकशी करून आपला रिपोर्ट दिला. त्या रिपोर्टाच्या आधारावर सोसायटीच्या पदाधिकाऱ्यां-विरुद्ध 'सहकारी कायद्याच्या क. ८८ अन्वये कारवाई करण्या-साठी ऑथराईज्ड ऑफिसरची नेमणूक करण्यात आली.

५. ऑथराईज्ड ऑफिसरसमोर क. ८८ अन्वये कारवाई सुरू झाली. त्याने प्लॉटसच्या खरेदीच्या बाबतीत एकट्या भाकेला जबाबदार धरले व १० सभासदांनी आपआपली घरे कर्जाच्या फेडीत सोसायटीला परत केल्यामुळे ( सरेंडर केल्यामुळे ) सोसायटीचे जे नुकसान झाले त्या नुकसानीबद्दल भाके, मॅनेजिंग कमेटीचे सर्व सभासद व सोसायटीचे मॅनेजर ह्या सर्वांना जबाब-दार धरले. ऑथराईज्ड ऑफिसरने दिलेल्या निकालाविरुद्ध त्या सर्वांनी अपिले दाखल केली. त्या सर्व अपिलांची एकत्र सुनावणी झाली व पुढीलप्रमाणे निकाल देण्यात आला.

६. ऑथराईज्ड ऑफिसरने मॅनेजिंग कमेटीच्या ज्या सभासदांना दोषी ठरविले आहे त्यांपैकी ३ सभासदांनी कोणत्याही कारवाईत प्रत्यक्ष भाग घेतला नसल्यामुळे त्या ३ सभासदांना दोषी ठरविण्यात ऑथराईज्ड ऑफिसरने चूक केली आहे हे उघड आहे.

७. सोसायटीचे मॅनेजर शेंडे यांना ऑथराईज्ड ऑफिसरने दोषी ठरविले आहे. ते देखील चूक आहे. याचे कारण असे की, मॅनेजर हा मॅनेजिंग कमेटीचा सभासद नसतो. मॅनेजिंग कमेटी जे ठराव पास करील ते अमलात आणणे एवढेच त्याचे कर्तव्य असते. मॅनेजर हा केवळ पगारी नोकर असतो व मॅनेजिंग कमेटीने दिलेले हुकूम त्याला पाळावे लागतात व म्हणून मॅनेजिंग कमेटीच्या कृत्याबद्दल मॅनेजरला व्यक्तिशः जबाबदार धरता येत नाही.

८. कान्नवला मध्ये घालून भाके यांनी १०,९३५ रुपये त्या

व्यवहारात उकळले असे अनुमान ऑथराईज्ड ऑफिसरने काढले आहे; मात्र त्याबद्दल कोणताही पुरावा उपलब्ध नाही. कान्नव व चंदूलाल ह्या दोघांचीही साक्ष घेण्यात आली नाही. त्यामुळे चंदूलालने कान्नवला कमी किंमतीला म्हणजे १५ हजार रुपयाला जमीन का विकली व कान्नवने १५ हजार रुपये कोठून आणले हे कळण्यास मार्ग नाही. त्याचप्रमाणे वादातील जमिनीची बाजारभावाच्या दृष्टीने रास्त किंमत किती होती याबद्दलचा पुरावाही देण्यात आलेला नाही. त्यामुळे त्या जमिनीच्या खरेदीच्या व्यवहारात सोसायटीचे नुकसान झाले की फायदा झाला व नुकसान झाले असल्यास किती झाले हे ठरविता येणे शक्य नाही. सबब वरील मुद्यांच्या बाबतीत परत चौकशीचा हुकूम देणे क्रमप्राप्त ठरते.


९. भाके, भूत व त्यांच्या आश्रयाखालील काही इसम यांनी सोसायटीला फसविण्याच्या दृष्टीने संगनमत करून वादातील व्यवहार घडवून आणले हे सिद्ध करण्यासाठी ज्या पुराव्याची आवश्यकता होती तो पुरावा सादर करण्यात आलेला नाही. तो पुरावा जर समोर आला तर एकंदर व्यवहारावर विदारक प्रकाश पडेल व निकाल देण्याचे काम सोपे होईल. परंतु चौकशीचा हुकूम दिल्याखेरीज आवश्यक असलेला पुरावा सादर करता येणार नाही म्हणून परत चौकशीचा हुकूम देणे आम्हांला भाग आहे.

१०. सोसायटीतर्फे आम्हांला अशी विनंती करण्यात आली आहे की, परत चौकशीमुळे निकालाचे काम लांबणीवर पडणार आहे व परत चौकशी आटोपल्यानंतर जर पदाधिकाऱ्यांना जबाबदार धरण्यात आले तर त्यांच्यापासून वादातील रक्कम निश्चितपणे वसूल करता यावी ह्या दृष्टीने आवश्यक असलेला हुकूम आम्ही द्यावा. ही विनंती आम्हांला रास्त वाटते. ज्या ४ इसमांविरुद्ध परत चौकशी करण्यात येवू नये व ऑथराईज्ड ऑफिसरने त्यांच्या बाबतीत दिलेला हुकूम रद्द करण्यात यावा असे आम्ही ठरविले आहे, ते ४ इसम वगळल्यास उरलेल्या पदाधिकाऱ्यांना प्रत्येकी ६ हजार रुपयांबद्दल व भाके यांना १६ हजार रुपयांबद्दल ऑथराईज्ड ऑफिसरने जबाबदार धरले आहे. सबब ज्या पदाधिकाऱ्यांविरुद्ध परत चौकशी व्हावयाची आहे त्या पदाधिकाऱ्यांनी प्रत्येकी ६ हजार रुपयांचा व भाके यांनी १६ हजार रुपयांचा जामीन जर दिला नाही तर त्यांची इस्टेट डिस्ट्रिक्ट डेप्युटी रजिस्ट्रारने जप्त करून ठेवावी असा हुकूम आम्ही देतो.

---

**फॅशनेबल खुशालचेंडूंच्या क्लबचे सभासद मुली निवडणार**

कराची येथे एक ' प्लेबॉय क्लब ' स्थापन होत आहे. खुशालचेंडूंच्या ह्या क्लबाचे सभासद निवडण्याचे काम ५० मुलींची समिती करणार आहे. उमेदवारांना कराचीमधील मान्यवर नागरिकांची चांगल्या नीतीबद्दलची प्रशस्तिपत्रे दाखल करावी लागतील. त्यांना प्रथम काही काळ प्रोबेशनर म्हणून राहून त्यांची वर्तणूक समाधानकारक आढळल्यावर त्यांचे सभासदत्व पक्के केले जाईल.


GADRE BROTHERS
ENGINEERS & FOUNDERS
MADHAVNAGAR (S. Rly.)
Phone: 318 ● Sangli
Gram: 'SEWA Madhavnagar

your kitchenware is incomplete without...
VARSHA
Aluminium TAWA (pan) & KADHAI





■ LESS FUEL CONSUMPTION
■ GETS HEATED EQUALLY FROM ALL SIDES
■ LIGHT WEIGHT ■ NON RUSTABLE
■ RETURN VALUE 35% LESS.

Mfgd. by
VARSHA INDUSTRIES
64/23, ERANDWANA, LAW COLLEGE RD POONA 4
PHONE: 55435

# माझ्या यशातील भलेबुरे

( श्री. शंकरराव थत्ते )

'उद्यान-प्रासाद' ही टोलेजंग इमारत आता सर्वांचेच 'आदरस्थान' झाली आहे.



या प्रकल्पाच्या सिद्धीचा किस्सा फारच मजेदार आहे, तसाच तो कटु सत्यकथन करणाराही आहे.


अकिंचनावस्थेत; लिमिटेड, सहकारी, अशा भरपूर पाठबळ असलेल्या योजना हाताशी नसतांना; एकट्या, केवळ एकट्या व्यक्तींने लाखो रुपयांच्या मोलाचा प्रकल्प केवळ स्वार्थाकरिता उभा करताना काटेकुटे, खाचखळगे यांची रेलचेल नसली तरच नवल! पण या काटेरी झुडुपांतून सुद्धा कधी कधी लपलेले गुलाबाचे ताटवेही दृष्टीस पडत आणि त्या ताटव्यांतील मनोहारी गुलाबपुष्पांच्या सुवासावरच 'उद्यान-प्रासाद' हा व्यक्तिगत प्रचंड प्रकल्प आज पुण्यात दिमाखाने उभा असून जनमनाची पकड घेत आहे.

स्वतःच्या आयुष्याचाच विचार करू लागलो म्हणजे गेल्या पंचावन्न वर्षातील मी केलेल्या निरनिराळ्या व्यवसायांची कशी परवड झाली हे डोळ्यापुढे नाचू लागले की प्रसिद्धीस आलेला, पूर्णत्व गाठलेला हा 'प्रासाद' हे केवळ प्रत्यक्षात न उतरणारे स्वप्न होते. पण त्याच्या सिद्धीकरिता एक मामुली कारण घडले आणि ते म्हणजे माझी भाड्याची जागा माझ्या हातून गेली. वरिष्ठ न्यायालयात विरुद्ध निकाल लागलेला, जागा त्वरित मोकळी करून मालकाच्या स्वाधीन करणे, हाच पर्याय. अशा मनाच्या बेचैनीतून या प्रकल्पाचा निश्चय झाला, आणि त्या मानसिक सामर्थ्यानेच पहिला दणका दिला तो मालक मंडळींना. 'लॉ इज ॲन ॲस' अशी म्हण आहे ती खरी ठरली आणि कायद्याच्या जोरावर 'उद्यान-प्रासाद' पूर्ण उभा राहीपर्यंत मूळच्याच जागेत वास्तव्य करून प्रकल्पाच्या प्रयत्नांना सुरुवात झाली. पंचावन्न वर्षाच्या आयुष्यात कमाई करून राखून ठेवलेले वीस सहस्र रुपये हे मूळ भांडवल! व्यवसाय सुद्धा अगदी मामुली. त्या वेळी मी १०१ रुपयांत संपूर्ण कार्य—मंगल कार्य—करीत असे, त्यातून द्रव्य ते काय मिळणार व प्रकल्पाच्या सिद्धीकरिता फलप्रद अशा ओळखी तरी काय होणार! गत आयुष्यात अनेक व्यायवसायिक कोलांट्या खाल्या तशी ही आणखी एक कोलांटी खावी, पैलतीरी लागलो तर यश आणि कीर्ती! नाही तर......संपलोच! पाऊण लाख किमतीच्या जागेचे जवळचे वीस सहस्र रुपये देऊन साठेखत पूर्ण झाले. जागेला मालक आठ, पैकी पाच मला जागा द्यावी या मताचे व देऊ नये या मताचे तीन. या रस्सीखेचीत प्राथमिक बोलण्यापासून साठेखत करीपर्यंत एक वर्षाचा काळ लोटला. खरेदीला पैसे नाहीत. ठेवीच्या स्वरूपात द्रव्यनिर्मितीचे आवाहन केले पण त्यातही फारसे यश मिळत नव्हते. एका बँकेकडे द्रव्यसाहाय्याकरिता अर्ज केला परंतु माझ्या विरुद्ध असलेले एक मालक त्या बँकेत पदाधिकारी असल्याने त्यांच्या वजनाने मला कर्जप्राप्ती झाली नाही. विसाराची रक्कम नष्ट होते की काय ही भिती वाटू लागली आणि त्यावेळी माझे एक—दोन मित्र माझ्या पाठीशी उभे राहिले आणि खरेदीखत पूर्ण झाले.

ज्या काही चांगल्या व्यक्तींच्या कुटुंबातील कार्ये माझ्याकडे झाली, ज्या व्यक्ती माझ्याबद्दल नितांत आदराने बाहेर बोलतात त्यातील बऱ्याच व्यक्ती केवळ बोलक्या ठरल्या प्रत्यक्ष अनुभवात!

एका व्यक्तीने सांगितले, "मी कुणाला कर्ज देत नाही, मला कर्ज काढून कार्य आवडत नाही.........वगैरे वगैरे". पण शेवटी या महाभागांनी त्यांच्या कार्यातील आमची कर्तबगारी आठवून "खरेदीच्या दिवशी सकाळी एक सहस्र रुपये द्यावयाचे" आश्वासन दिले. माझ्या मानी मनाने ते द्रव्य न घेतांच खरेदीचा निश्चय केला. खरेदी झाली, प्रासादही झाला, पण या महाभागांनी त्यांच्या आश्वासनाची आठवण सुद्धां दिली नाही, दाखविली नाही. नक्की आश्वासने व मुदत देऊन ती न पाळलेले असे कितीतरी सद्गृहस्थ माझ्या दप्तरी आहेत. एकाने सल्ला दिला की मी करीत असलेला हा व्यवसाय वृथा आहे; मी तो सोडून द्यावा.

माझ्या हातून हा प्रकल्प पुरा होणार नाही, पुरा झाला तरी कर्ज फिटणार नाहीं, चालणार नाहीं, असे सांगणारी, बोलणारी



मंडळी आज मोठ्या आपुलकीने, कोरड्या आपुलकीने माझी पाठ थोपटीत आहेत. मोटार घेण्याकरिता द्रव्यसंचय आहे पण माझ्या योजनेत ठेव ठेवण्यास द्रव्य नाही, लग्न समारंभात मला पाचदहा सहस्र देणारी मंडळी ठेव रूपाने पाचशे देण्यास राजीखुषी नव्हती.

पण त्याचबरोबर थोडे-फार लोक माझे चहाते होते, त्यांनी मला फार जवळून पाहिला होता. 'कर्तबगार मनुष्य' म्हणून ते माझी गणना करीत होते आणि प्राथमिक साहाय्य त्यांच्याच-कडून मला झाले. प्रकल्प जसा वर येऊ लागला, साकार होऊ लागला, तसे विरोधी वारे थड होऊ लागले.

पण मध्यंतरातच कोणा महाभागाने माझी ही इमारत रेशन ऑफिसकरिता प्रशंसिली आणि इमारत स्वाधीन करण्याची सरकारी आज्ञा पण हातात पडली. दैव पाठीशी असले म्हणजे त्यातूनही मार्ग निघतो तसा तो निघाला. देवावर विश्वास असो वा नसो, देव त्या महान व्यक्तीच्या रूपात भेटला, सरकारी संकट दूर झाले!

एक महत्त्वपूर्ण उल्लेख करावयाचा राहून गेला. हजार-पाचशे रुपयांची ठेव मागण्याकरितां मी किती उंबरठे झिजविले याचा आढावा घेऊ लागलो तर त्या वेळी माझ्या मनात आणि शरीरात कर्तव्यपूर्तीचा केवढा जोम वाढला होता याची साक्ष पटते.

मला माहीत आहे की मी ज्या घरी जात आहे त्या घरातून हजार-पाचशे रुपये सहजरीत्या मिळतील. पण उत्तर साचेबंद असे. "तुम्ही करीत असलेले कार्य फारच चांगले आहे व त्याला माझी मदत करण्याची तीव्र इच्छा आहे. पण तूर्त ते शक्य नाही, पुढे पाहू."

असाच एक दिवस "आ" ने सुरू होणाऱ्या ओळखीच्या सद्गृहस्थाकडे गेलो. योजना दिली. याचना केली हजार-दोन हजारांची, पण उत्तर तेच मिळाले "पुढे पाहू." पण या गृहस्थांनी 'पुढे पाहिले' आणि केव्हा तरी मला बोलावून प्रचंड आर्थिक मदत मला दिली. त्या मदतीत सावकारी दृष्टी नव्हती, मनाचा कंजुषपणा नव्हता, माझ्या कार्याबद्दल आदर होता, माझ्या कर्तव्यनिष्ठेवर श्रद्धा होती आणि माझ्या सचोटीवर विश्वास होता. ह्या प्रकल्प इतक्या लवकर उभा राहिला तो केवळ या परमेश्वर स्वरूप व्यक्तीच्या सक्रिय साहाय्यानेच.

आप्तेष्टांनी विरोध दर्शविला तेव्हा त्या महाभागाने उत्तर दिले ते कळल्यावर परमेश्वर वा अधिष्ठात्री देवता दृष्टांत देते, दर्शन देते ते प्रत्यक्षात नसून अशा या थोर हृदयाच्या मानवी देहातून व मनातून, हे सत्य पटते! त्यांचे उत्तर असे होते—

"मला माणसाची पारख आहे. हे लक्षावधी रुपये बुडले तर मी गाजरपारखी ठरेन. माझी मनोदेवता सांगते की हा पैसा सज्जनाच्या हाती आहे."

आणि खरच सांगतो की जसा म्हातारीच्या बुडकुलीभर दुधाने (श्रद्धेने) महादेवाचा गाभारा भरला तसा या सहृदय, संतोषी, समाधानी व्यक्तीच्या पर्वतप्राय द्रव्यसाहाय्याने 'उद्यान–प्रासाद' इंद्र–प्रासादाची स्वप्ने साकार करण्याच्या ईर्षेने यशस्वी भरारी मारीत आहे.





दूरध्वनी : ५४५१९

**श्री सुवर्ण सहकारी बँक लि.**

मुख्य कचेरी : ७५९/५१ डेक्कन जिमखाना, फर्ग्युसन कॉलेज रोड, पुणे ४

दर रविवारी आपल्या सेवेस सज्ज

**: आमच्या नवीन दोन शाखा :**

जोगेश्वरी शाखा : ३१ बुधवार पेठ, जोगेश्वरी मंदिराजवळ, पुणे २.

टिळक रोड शाखा : २०३५/२ सदाशिव पेठ, टिळक रोड, पुणे ३०. सेफ डिपॉझिट व्हॉल्टची सोय उपलब्ध आहे.

दूरध्वनी ५८६४८

| मुख्य कचेरी | कामाच्या वेळा | शाखा |
| --- | --- | --- |
| ९ ते १०-३० | रोज सकाळी | ९ ते ११ |
| ५-३० ते ७-३० | संध्याकाळी | ५ ते ७ |
| ९ते ११ | रविवारी सकाळी | ९ ते ११ |

साप्ताहिक सुट्टी : बुधवार

| ज्ञानेश्वर आगाशे | विलास एकबोटे | बी. बी. पुरोहित |
| --- | --- | --- |
| चेअरमन | व्हा. चेअरमन | मॅनेजर |

# लठ्ठपणा टाळण्यासाठी काय करावे?

## अन्नामधून मिळणारी शक्ती आणि तिचा व्यय

### ह्यांचे गणित समजावून घ्या

आहारशास्त्रातील आधुनिक संशोधनामुळे माणसाच्या विविध हालचालींसाठी लागणाऱ्या कॅलरीज अथवा शक्ती बऱ्याच अंशाने निश्चित सांगता येते. ह्या ज्ञानाचा उपयोग करून मेदवृद्धी टाळता येईल आणि झाली असल्यास ती कमीही करता येईन.

माणसाच्या अंगावर वाजवीपेक्षा अधिक मेद असेल तर त्याचे कारण जरुरीपेक्षा अधिक कॅलरीज देणाऱ्या अन्नाचे सेवन हे होय. लठ्ठपणाही ह्याच कारणामुळे उत्पन्न होतो. तथापि एखादा माणूस फाजील लठ्ठ आहे की नाही हे तो स्त्री का पुरुष आहे, त्याचा बांधा आणि वय, ह्यांचा विचार केल्याशिवाय सांगता येणार नाही. लठ्ठपणा आणि मेदोवृद्धी हे समानार्थक शब्द मात्र नाहीत. लठ्ठ शब्दात प्रमाणित वजनापेक्षा अधिक वजन असणे इतकाच अर्थ आहे. एखादा माणूस वजनाने अधिक असला तरी मेदजड असतोच असे नाही. उलटपक्षी काही लोक मेदवृद्धी झालेले असूनही वजनाने फार जड असतात असे नाही. श्रीमंत देशातून मेदवृद्धी हा एक मोठाच सार्वजनिक प्रश्न होऊन बसला आहे. अमेरिका हे ह्याबाबतीतील एक ठळक उदाहरण आहे. मेदवृद्धी झालेल्या माणसापैकी ९० टक्के लोक अती खाणारे असतात. त्याशिवाय दुसरे कारण दिसत नाही. मेद वाढण्याचे मूलभूत कारण असे आहे की अन्न व पेये ह्यांच्या रूपाने शरीरात घेतली जाणारी शक्ती आणि रोजच्या व्यवहारात होणारा त्या शक्तीचा व्यय ह्यांच्यांतील विषम प्रमाणामुळे शरीरात मेद वाढीस लागतो. गरजेपेक्षा अधिक शक्ती देणारे अन्न घेतल्यामुळे जादा अन्नाचे मेदात रूपांतर होते. आधुनिक जीवनाची घडण ह्या प्रवृत्तीला पोषक अशीच झालेली आहे. म्हणजे शक्तीच्या व्ययापेक्षा ती आंत घेण्याचे प्रमाण अधिक असते. शक्तीच्या व्ययाची बाजू नेहमीच लंगडी असते. घरीदारी श्रम वाचविण्याची साधने उपलब्ध असतात. मनुष्य चालण्याऐवजी मोटार वापरतो. करमणुकीच्या कार्यक्रमांत स्वतः भाग न घेता स्वस्थ बसून ते पाहतो—सिनेमा, टेलिव्हिजन, इत्यादी. लोक शारीरिक दृष्टीने अधिकाधिक ऐदी झाले आहेत व होत आहेत. सुखवस्तू लोक जणू काही खाण्यासाठीच जगतात. आपल्या समाजात आतिथ्यशीलतेचे लक्षण म्हणून आल्या-गेल्याला काही तरी खाण्यास अगर पिण्यास देण्याची प्रथा आहे. संमेलने, विवाह, सण, इत्यादी खास प्रसंगाविषयी तर बोलावयासच नको.

आपल्या बहुतेक करमणुकी स्वास्थ्य प्रधान असतात. म्हणजे करमणुकीत प्रत्यक्ष भाग न घेता शिवाय त्याच वेळी कसदार पदार्थ चवीने खाण्याची पद्धत आहे. अत्यंत स्पर्धामय अशा जीवनात आपण जगत आहोत. ह्या जीवनात काळज्या भरपूर आहेत पण मनोविनोदन मात्र फारसे अगर मुळीच नाही. अशा स्थितीत खाण्यापिण्याचाच काय तो विरंगुळा राहिल्यासारखा दिसतो. मेदजड असणे हे काही आरोग्याचे लक्षण नव्हे. उलट ती धोक्याची खूण असून आयुष्याचा क्षय करणारी आहे. वाजवीपेक्षा अधिक वजन असणे हे आरोग्याचे लक्षण आहे ही कल्पना चुकीची आहे. विमाकंपन्या मेदवृद्धी झालेल्या माणसाची जोखीम पत्करीत नाहीत. मेदवृद्धीमुळे अनेक रोगांचा उद्भव होऊ शकतो. उदा. रक्तवाहिन्या कठीण बनणे, रक्तदाब वाढणे, धाप लागणे, घसा येणे, इत्यादी. त्याशिवाय सांध्याचे रोग, मलावरोध, पायांना सूज येणे, अती झोप येणे, इत्यादी विकारही अशा लोकांना होण्याचा संभव असतो. अशा लोकांवर शस्त्रक्रिया करण्याचा प्रसंग आल्यास शस्त्रवैद्य ती करण्यास फारसा उत्सुक नसतो. लठ्ठ माणसे मधुमेहाला आवाहन करतात हे तर प्रसिद्धच आहे. ज्याचे वजन वाजवीपेक्षा अधिक आहे अशा लोकांपैकी ५० टक्के लोकांना उघड अगर सुप्त मधुमेह झालेला दिसून येतो. मधुमेह झालेल्या ज्या लोकांची वजने प्रमाणित वजनापेक्षा २५ टक्के अगर त्यापेक्षा अधिक होती, त्यांच्यांतील मृत्यूचे प्रमाण एरव्ही असावे त्यापेक्षा साडेआठ पटीने अधिक असल्याचे आढळून आले आहे.

आहारावर नियंत्रण ठेऊन वजन कमी केले तरीसुद्धा हा रोग पुष्कळ वेळा आटोक्यात आणता येतो.

वजन जास्त झाले म्हणून रोगी सहसा डॉक्टरकडे येत नाही. दुसरी काही तरी लक्षणे दिसू लागल्यावर मात्र तो दवाखान्यात येतो. साध्या हालचालींमुळे धाप लागली, थकवा वाटू लागला, धमन्या जाड झाल्या, पाय सुजले अगर घोटे दुखू लागले की त्याला डॉक्टरची आठवण होते. स्त्रिया आपल्या डौलदार बांध्याला फार जपतात. वजन वाजवीपेक्षा जास्त झाल्यास त्यांना वरील लक्षणे जाणवू लागतात व मग त्या फार अस्वस्थ होतात. कधी एखाद्या लठ्ठ मुलाचे आईबाप त्याला डॉक्टरकडे घेऊन येतात. वाजवीपेक्षा फाजील जाडजूड मुलाला शाळेत त्याचे सवंगडी त्रास देतात. त्याचा मनावर परिणाम होऊन असा मुलगा अगर मुलगी शाळा टाळू लागतात. बाळंतपणात पौष्टिक खुराकाचा अतिरेक झाल्यामुळे काही स्त्रिया भलत्याच सुटतात आणि मग वजन वाढल्याचे दुष्परिणाम त्यांना भोवू लागतात. तात्पर्य, फाजील वजनवाढीचे परिणाम एकंदरीने वाईट होतात. अशा बहुतेक माणसांनी आहारावर नियंत्रण ठेवून आपले वजन इष्ट त्या पातळीवर आणले तर काम भागते. मानसिक अवस्थेचाही वजनावर परिणाम होतो.

## दि कॉसमॉस को-ऑपरेटिव्ह अर्बन बँक लि., पुणे ३०

ऑडिट 'अ' वर्गामध्ये सतत असणारी पुण्यातील एक अग्रेसर
—सहकारी बँक— रु.

(१) अधिकृत भाग भांडवल ... ६ लाख
(२) वसूल भाग भांडवल ... ४ लाखाचे वर
(३) खेळते भाग भांडवल ... ९० लाखाचे वर
(४) कर्जे ... ५६ लाखाचे वर
(५) ठेवी ... ७५ लाखाचे वर
(६) गंगाजळी ... २ लाखाचे वर

| वर्षे | १ | २ | ३ | ५ | ७ |
|---|---|---|---|---|---|
| व्याज दर | ६॥% | ७॥% | ७॥% | ८% | ८॥% |

सेव्हिंग्ज ठेव ४%, चालू ठेव १/४%, हप्तेबंद ५ ते ६॥%

(अ) सभासद, नाममात्र सभासदास जामिनकी, मशिनचे तारणावर, नजरगहाणावर कर्जे मिळण्याची सोय तसेच लघुउद्योग धंद्यासाठी कर्जाची सोय.
(ब) भाडेकरार योजनेखाली रेडिओ, ट्रान्झिस्टर, पंखा, कपाट, स्कुटर, मो. सायकल, सायकल, इत्यादी वस्तू खरेदी योजना...
(क) महाराष्ट्रातील प्रमुख सहकारी बँकांवर डि. ड्राफ्ट मिळण्याची सोय...
(ड) ठेवींच्या सुरक्षिततेसाठी डिपॉझिट इन्शुरन्स स्कीम...
(इ) बँकिंगचे सर्व प्रकारचे व्यवहार केले जातात...

अ. बा. देहाडराय, कार्याध्यक्ष — व. गं बर्वे, व्यवस्थापक — शं. वि. दिवाकर, अध्यक्ष

मुख्य कार्यालय : कॉसमॉस बँक बिल्डिंग, कुंटे चौक, लक्ष्मीरोड, पुणे ३० दूरध्वनी : ५६२८३

शाखा : ४८९-अ-२, पर्वतीदर्शन. पर्वतीदर्शन, पुणे ९. दूरध्वनी : २७३८६

## दि मराठा को. ऑपरेटिव्ह क्रेडिट बँक लि., बेळगांव

स्थापना १९४२ — फोन नं ५३५

| | |
|---|---|
| वसूल शेअर भांडवल | रु. ३,५१,४०० |
| रिझर्व व इतर फंडस | रु. ६,१०,००० |
| इन्व्हेस्टमेंटस | रु. २७,४७,००० |
| ठेवी | रु. ६०,६८,००० |
| खेळते भांडवल | रु. ७४,००,००० |
| निव्वळ नफा (१९७०-७१) | रु. १,९५,५०० |
| एकूण उलाढाल (१९७०-७१) | रु. १० कोटींचे वर |

बँकेची खास वैशिष्ट्ये

विविध प्रकारच्या बचत ठेवीवर आकर्षक व्याज, निरनिराळ्या कर्ज रूपाने लहान उद्योगधंदे, व्यापार व सामान्य माणसांच्या गरजा भागविण्यासाठी कर्ज योजना.

इतर सर्व प्रकारच्या बँकिंग व्यवहाराची सोय. अधिक माहितीसाठी बँकेच्या कार्यालयात भेटा अगर चौकशी करा.

श्री. जी. एम. दळवी — अर्जुनराव गोविंदराव घोरपडे
श्री. एस. वाय. काकतकर — चेअरमन
एस. के. देसूरकर — श्रीकांत केदारजी कणवरकर
बी. जी. भातकांडे — व्हा. चेअरमन
एस. एम. कुडे — आर ए. पाटील
बी. व्ही. जाधव — बी. ए., बी. कॉम., एलएल. बी.
एस. बी. हंगीरकर — मॅनेजर
डायरेक्टर्स

विविध प्रकारच्या कापडाच्या 'क्वालिटी' व 'गॅरंटी' मुळे,
सर्व ग्राहकांच्या विश्वासास पात्र झालेले पुण्यातील अग्रेसर कापडदुकान

## ★★★ ब्यूटी क्लॉथ स्टोअर्स ★★★

'होम ऑफ क्वालिटी ॲण्ड व्हरायटी'

पेरूगेट रोड, पुणे ३०. (फोन नं. ५७३१८)

मानसशास्त्रज्ञांचे असे म्हणणे आहे की मनावर फार ताण पडला अगर त्याची कुचंबणा झाली तरीही वजन वाढण्यास मदत होते. अतिशय दुःख अगर तीव्र विषण्णता ह्यांचा असा परिणाम होतो. शरीर तुंदिलतनू होण्याच्या प्रक्रियेत आनुवंशिकतेने लाभलेली प्रकृतीही आपले कार्य करते. आईबाप योग्य वजनाचे असले तरी त्यांची प्रजा गलेलठ्ठ निपजण्याचा संभव ९ टक्के असतो. दोहोंपैकी एकजण भारी वजनाचा व दुसरा सामान्य वजनाचा असेल तर हा संभव ५० टक्क्यांपर्यंत वाढतो आणि दोघेही भारदस्त असतील तर मुले लठ्ठ होण्याचा संभव ७३ टक्के इतका वाढतो. लठ्ठपणाचा उद्‌भव होण्याला सामाजिक स्थितीही कारणीभूत होते.

न्यूयॉर्कमधील एका भागातील १,६६० व्यक्तींची ह्या दृष्टीने पाहणी करण्यात आली. पाहणीत असे आढळून आले की व्यक्तीच्या सामाजिक-आर्थिक पार्श्वभूमीचा आणि वजनाचा संबंध असतो. माणसाचे वजन आणि त्याला जरूर असणाऱ्या कॅलरीजमधील संबंध साधारणपणे असे आहेत. माणूस विश्रांती घेत असेल तर त्याला शरीराच्या वजनाच्या दर किलोग्रॅम मागे ३० कॅलरीजची आवश्यकता असते. तो विद्यार्थी असेल आणि मामुली शरीरव्यापार करीत असेल तर ४० कॅलरीज लागतात. तो जर बैठे काम करणारा असेल तर त्याला ३५ कॅलरीज लागतील. स्त्रियांना कमी कॅलरीज पुरतात; पण गरोदरपणांत त्यांना दररोज ३०० कॅलरीज अधिक लागतात. अंगावर पाजणाऱ्या स्त्रीला तर ह्याहूनही अधिक लागतात. २४ तासांत माणसाला किती कॅलरीज लागतात, त्याचे गणित असे आहे. माणसाच्या प्रमाणित वजनाला दर किलोग्रॅममागे लागणाऱ्या कॅलरीजने गुणावे; म्हणजे जरूर त्या कॅलरीज मिळतील. अर्थात् माणसाच्या धंदाव्यवसायाचाही विचार करावा लागतोच. खाण्याच्या बाबतीत एकदम एका वेळी खाण्या-पेक्षा तेच अन्न ४ वेळी खावे; म्हणजे एका वेळी फार खाऊ नये. खाण्याची ही पद्धत सुरू केली की लठ्ठ माणसे पुष्कळदा अपुऱ्या आहाराची तक्रार करतात व भूक भूक करतात. अशा वेळी कॅलरीजच्या दृष्टीने बेताचा पण आकारमानाने मोठा असा आहार द्यावा.

आठवड्यातून एखादुसरा उपवास फार उपयुक्त ठरतो. उपवासात चहा, कॉफी अगर लिंबाचे पाणी साखर न घालता घ्यावे. उपवास सोडतांना एकदम जड अन्न खाऊ नये. माणसाचा आहार आणि तो करीत असलेल्या अनेकविध क्रियांना किती कॅलरीज लागतात ह्याचे मोजमाप करता येते. ते साधारणपणे असे.

दर तासाला खपणाऱ्या विविध क्रियांतील कॅलरीज

| | |
|---|---|
| सावकाश चालणे | २०० कॅलरीज |
| भरभर चालणे | ३०० ,, |
| सावकाश पळणे | ६०० ,, |
| जोराने पळणे | ९०० ,, |
| सावकाश सायकल चालविणे | ३०० कॅलरीज |
| जोराने ,, ,, | ६०० ,, |
| बॅडमिन्टन | ४०० ,, |
| बागकाम | २५० ,, |
| जिना चढणे व उतरणे | ८०० ,, |
| हलका व्यायाम | ५०० ,, |
| सावकाश पोहणे | ४०० ,, |
| भरभर ,, | ८०० ,, |
| टेनिस ( एकेरी ) | ४५० ,, |
| ,, ( दुहेरी ) | ३५० ,, |

आग्रहाला बळी न पडणे हा वजन वाढू न देण्याचा सर्वात चांगला उपाय आहे. व्यायाम करण्यास वेळ अगर जागा नाही असे पुष्कळजण म्हणतात. पण योगासनासारखा व्यायाम १५-२० मिनिटांत होतो व तो अंथरुणातही करता येतो. जलद चालणे हाही चांगला व्यायाम आहे. दोरीवरील उड्याही दिवसातून दोनदा मारणे हितावह ठरते. लठ्ठ माणसांनी शक्य तो चालावे, जिने चढावे, लिफ्टचा मोह टाळावा. मेद झडण्यासाठी भूक मारणारी औषधेही आहेत. पण आहारनियंत्रण आणि व्यायाम ह्या मात्रा लागू पडल्या नाहीत तरच ती घ्यावी. निश्चयाने प्रयत्न केल्यास ह्या मात्रा लागू पडतातच. लठ्ठ माणसाला मेद झडण्यासाठी शरीराच्या प्रत्येक किलोग्रॅममागे ३० पेक्षाही कमी कॅलरीज देणारे अन्न पुरते. कधी कधी तर २० कॅलरीज देणारे अन्नही चालू शकते.

---

## विश्वस्त संस्थांच्या शिलकीवर प्राप्तिकर

वेगवेगळ्या सार्वजनिक विश्वस्त संस्थांच्या शिलकी उत्पन्नावर यापुढे प्राप्तिकर बसविण्यात येणार असून त्याप्रमाणे आपले उत्पन्न व शिल्लक या बाबतची माहिती जमा करण्याचे काम सुरू करण्यात आले आहे. याचा अर्थ, सार्वजनिक विश्वस्त संस्थांना प्राप्तिकरातून सूट मिळावी असे वाटत असेल तर त्यांना आपले सर्व उत्पन्न खर्च करावे लागेल.

गेल्या वर्षीच कायद्यामध्ये या संदर्भात दुरुस्ती करण्यात आली आहे. त्याचे नियम तयार करण्याचे काम चालू असून ते पूर्ण होताच ही दुरुस्ती कार्यवाहीत येईल.

विश्वस्त संस्थांना एखाद्या विशिष्ट कामासाठी निधी राखून ठेवायचा असेल तर त्यासाठी प्राप्तिकर खात्याची परवानगी घ्यावी लागेल. अशी परवानगी न घेता ठेवलेला राखीव निधीही शिल्लक म्हणून समजला जाऊन करपात्र ठरेल.

अर्थात रक्कम खर्च कशी करावी यावरही काही बंधने आहेतच. सर्व उत्पन्न खर्च करून टाकावयाचे ते वाटेल त्या बाबींवर खर्च करता येत नाही. त्यासाठी चॅरिटी कमिशनरांची किंवा न्यायालयांची परवानगी घेऊन विश्वस्त संस्थेच्या घटनेशी सुसंगत अशा उद्दिष्टांसाठीच हा खर्च करता येईल.

SCO-1 HIN

# नहीं –
# यह कोई
# साधारण कार्य नहीं !

# सरदार
## सोडा वाटर
## यंत्रसामग्री

यह यंत्रसामग्री ६० वर्ष पहिले प्रस्तुत की गयी है और आजभी इसकी कोई तुलना नहीं। भारत और पूरबी देशों में हजारों की संख्या में ये यंत्र उपयोगमें हैं और सैनिकी भोजनशाला, क्लब, अस्पताल, उपाहारगृह और खायालय आदि में ये कितने ही यंत्र गत २० वर्षोंसे काम देते आये हैं।

हर दिन ५० से ४०० दर्जनों तक शीतल पेयों की बोतलें निर्माण करनेवाले इन यंत्रों की कीमत का थोडे ही काल में कई गुना मुबदला मिल जाता है।

हमारे दूसरे निर्माण हैं: १. रंगहीन द्रव कार्बन डायआक्साईड वायु जो कार्बोनेशन में तथा आग बुझाने में उपयोगी है, २. सोडा वाटर यंत्रों के कलपुर्जे, ३. सूखा बरफ

**यंत्रों और कलपुर्जोंकी नकल से सावधान रहिये**



कमर्शल सोडा वाटर यंत्र

घरेलू सोडा वाटर यंत्र

## दि सरदार कार्बोनिक गैस कंपनी लिमिटेड

सर विठ्ठलदास चेम्बर्स, १६, अपोलो स्ट्रीट, बम्बई १.

फोन: कार्यालय: २५३३७१ कारखाना: ३७६१०२

# ग्राहकांच्या बदलत्या वृत्तीचे सामाजिक परिणाम

## ट्रॅन्झिस्टर ऐकणारा कामगार व शेतकरी

विकसनशील देशात घडून येत असलेल्या सामाजिक स्थित्यंतराची ही कारणमीमांसा उद्बोधक तर आहेच पण ते घडवून आणण्यात ग्राहकांच्या मनोवृत्तीत झालेला बदल अर्थपूर्ण म्हणावा लागेल.

ग्राहकांच्या वृत्तीत हळूहळू पण सतत बदल घडून येत असतो. १९३० सालांतील ग्राहक हा १९७० मधील ग्राहकापेक्षा खूपच निराळा होता. केवळ पोषाख आणि खाण्यापिण्याच्या आवडी ह्यापुरताच नाही, तर एकंदर दृष्टिकोनात हा फरक दिसून येतो. तथापि, गेल्या १० वर्षांच्या अवधींत ह्या बदलाचा वेग खूप वाढण्यास बऱ्याच गोष्टी कारणीभूत झाल्या आहेत भूतकालात इतक्या वेगाने बदल घडून आलेला नाही. अर्थव्यवस्थेचा नियोजित विकास, शेतीत घडून आलेली हरित क्रांति, उधोगधंद्यांची झालेली वाढ आणि त्यासाठी लागणाऱ्या आधारभूत पायाचा विकास, तांत्रिक प्रगती आणि सरकारने अंगीकारलेल्या समाजकल्याण योजनांमुळे भिन्न भिन्न सामाजिक थरांतील दुरावा मोडकळीस येण्याची प्रक्रिया, इत्यादी कारणे ह्या संदर्भात लक्षात येतात. लोकांची भरभराट झालेली आहे. त्यामुळे बदल घडून येत आहे. गेल्या दहा वर्षांत लोकांच्या दरडोई उत्पन्नात थोडीफार वाढ झाली आहे ह्यात शंका नाही; पण असे कागदी आकडे काही वेळा दिशाभूल करणारे ठरतात. दरडोई उत्पन्नामध्ये जी फारच अल्प वाढ झालेली आहे तिचे एक मुख्य कारण म्हणजे लोकसंख्येत झालेली अभूतपूर्व वाढ. तरी पण ग्रामीण भागात काही भरभराटलेली ठिकाणे मधून मधून दिसून येतात. उघड्या डोळ्याने पाहणाराला ती सहज दिसतात. शहरांतील दुकानांतून नवनवीन प्रकारचा माल भरपूर दिसून येतो. त्यातील सजावट गिऱ्हाइकांना आकर्षून घेण्याच्या दृष्टीने अगदी आधुनिक पद्धतीची केलेली असते, इतकेच काय पण ही दुकाने सदासर्वकाळ ग्राहकांनी गजबजलेली असतात. ही घटना पूर्वी महिन्याचा पगार झाल्यावर पहिल्या आठवड्यातच फक्त दिसून येत असे. सिनेमागृहावर 'हाऊस फुल' अशा पाट्या जवळ जवळ नेहमीच झळकत असतात. चित्रगृहात गर्दी करणारा वर्ग बहुतांश मध्यम व बेताच्या उत्पन्नाच्या लोकांचा असतो. झोपडपट्टीत राहणाऱ्या कुटुंबातून कधीकधी दोन अगर तीन मिळवती माणसे असतात. त्यांचे कपडे आता बरे असतात. रेडिओ आणि ट्रॅन्झिस्टर्स त्यांना चैनीच्या वस्तू वाटेनाशा झालेल्या आहेत. वरच्या थराच्या मध्यम वर्गीय लोकात वाहतुकीसाठी सायकल वापरण्याची परंपरा नष्ट झाली आहे. शहरात सायकलींची जागा आता स्कूटरने घेतली आहे. राहणीच्या दर्जात घडून आलेला हा बदल ग्रामीण भागातही दिसून येतो.

भरभराटीच्या ह्या खुणा काही विभागात इतक्या दिसून येतात की त्यांच्यावर विरोधी टीकाही करण्यात येते. गुजरात राज्यात पूर्वी दिसणाऱ्या चिखलाच्या लिंपणाच्या घरांची जागा आता मंगलोरी कौलाची घरे घेत आहेत. तामीळ नाडूमधील खेड्यात अनेक ठिकाणी नलिका विहिरी आढळून येतात. विजेच्या प्रसाराचा हा परिणाम आहे. पंजाबमध्ये आता बैलगाडी दिसणे कठीण झाले आहे. त्यांची जागा ट्रॅक्टरने घेतली आहे. प्रत्येक हिंदी खेड्यात हा बदल होईल अशी आशा सहजच होते. पण अफाट पसरलेल्या दारिद्र्यात भरभराटीची बेटे फारच तुरळक आढळून येतात. तरी पण बदलाला प्रारंभ झाला आहे ह्यात शंका नाही. तो सर्व ठिकाणी दिसून येण्यास काळ लागणारच. शिक्षण-प्रसार हे बदलाचे आणखी एक मोठे कारण आहे. सरकार शिक्षणासाठी अधिकाधिक खर्च करीत आहे. पूर्वीच्या मानाने आता शाळांची, कॉलेजांची आणि विद्यापीठांची संख्या वाढली आहे आणि पूर्वी ज्या लोकांना बदलाचा वारा लागला नव्हता त्यांना आता तो लागू लागेल ह्यात शंका नाही. व्यावसायिक कौशल्यांचा लोकात प्रसार होत आहे. त्यामुळे लोकांना रोजगाराच्या नव्या संधी प्राप्त होत आहेत. स्त्रिया ह्या केवळ घरकाम करणाऱ्या राहिल्या नसून नागरीक बनल्या आहेत. त्यांच्या ह्या नव्या भूमिकेमुळे स्त्रीशिक्षणाला निराळे आणि फार मोठे महत्त्व प्राप्त झाले आहे. त्या स्वयंपाकघराच्या बाहेर पडून पुरुषांच्या बरोबरीने नोकऱ्या-चाकऱ्या करीत आहेत.

साक्षरता वाढल्यामुळे साहजिकच लोकांच्या मनापर्यंत पोचणे अधिक सुलभ होते. दैनिके, साप्ताहिके, मासिके, इत्यादींचा खप कल्पनातीत प्रमाणात वाढतो. स्त्री वाचकांची संख्या खूप वाढली आहे. त्यामुळे त्यांचे क्षितिज घराबाहेर विस्तारले आहे. लोकांना आवडणाऱ्या व सहज समजणाऱ्या वाङ्मयाची, त्याचप्रमाणे शास्त्रीय आणि तांत्रिक वाङ्मयाचीही खूप वाढ झाली आहे. अर्थातच वाचक वर्ग केवळ वाढला नसून त्यात विविधताही आली आहे. रेडिओच्या साधनाबाबत ट्रॅन्झिस्टरने क्रांति केली आहे. सामान्य माणसाला परवडतील असे स्वस्त सेटस् त्यामुळे उपलब्ध झाले आहेत. नभोवाणी स्त्रियांसाठी, शाळकरी मुलांसाठी, शेतकऱ्यांसाठी, कामगारांसाठी खास कार्यक्रम प्रक्षेपित करीत असते. ह्या माध्यमाने त्यांना माहिती मिळून शिवाय करमणूकही होते. सिनेमा हे जनमानसापर्यंत पोचण्याचे एक मोठे साधन आहे. आता छोट्या गावातूनही सिनेमागृहे आहेत. त्यांतील काही कायमची व काही प्रवासी असतात. सिनेमाने मनोरंजन तर होतेच, पण शिवाय शिक्षणही मिळते. वार्ताचित्रे, अनुबोधपट, व्यापारी जाहिराती ह्यांच्यामुळे ग्रामीण भागात बदलाचे वारे

इचलकरंजीच्या होतकरू व कर्तबगार कारखानदार-
व्यापारी बंधूंच्या उत्कर्षास साहाय्यभूत झालेली
इचलकरंजीतील एकमेव नागरी बँक

## दि इचलकरंजी अर्बन को-ऑप. बँक लि.,

स्थापना : १९३० ] इचलकरंजी [ फोन नं. २२३६

| | | |
|---|---|---|
| अधिकृत शेअर्स भांडवल | रु. | २०,००,००० |
| भरलेले भांडवल | रु. | ११,१७,००० |
| रिझर्व्ह फंड | रु. | ४,४८,००० |
| इतर फंडस् | रु. | ७,५८,००० |
| खेळते भांडवल | रु. | १,५४,४४,००० |

| ठेवीचे दर :- | | |
|---|---|---|
| | चालू | १ टक्का |
| | सेव्हिंग्ज | ४ टक्के |
| | मुदत ठेव | ६.५० ते ८.५० टक्के |
| | कॉल डिपॉझिट | ५.५० ते ६.५० टक्के |
| | कर्जाचा दर | ९ ते १२ टक्के |

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

श्री. ज. दांडेकर
मॅनेजर

स. मा. मुरदंडे
चेअरमन

अल्पावधीत आम जनतेच्या विश्वासास पात्र ठरलेली
आणि उत्तरोत्तर प्रगतीपथावर राहून
जनतेच्या गरजा सातत्याने भागविण्या-
साठी अहर्निश झटत असलेली

## जनता सहकारी बँक लि.,

## —सांगली—

( कराळे बिल्डिंग, हायस्कूल रोड, सांगली )
ऑडीट वर्ग—"अ"

—प्रगतीपथावरील बोलके आकडे—

| | | |
|---|---|---|
| (ज) | सभासद-संख्या | ...१,८८१ |
| (न) | शेअर-भांडवल | ...सव्वा चार लाखांचे वर |
| (ता) | रिझर्व्ह व इतर फंडस | ...साडेचार लाखांचे वर |
| (बँ) | ठेवी | ...पन्नास लाखांचे वर |
| (क) | खेळते भांडवल | ...सत्तर लाखांचे वर |
| (लि.) | वार्षिक उलाढाल | ...एकोणीस कोटींचे वर |

मा. रा. घुवडे
व्हा. चेअरमन

म. सा. कराळे
चेअरमन

बा. आ. कबाडे, बी.ए., बी. कॉम.
मॅनेजर




## होय!

आर्थिक बाबींचा प्रश्न उभा राहीला
तर लघुउद्योग धंद्याचा पुरोगामी
चालक नक्की तेंच करील

बँक ऑफ इंडिया लघुउद्योग धंद्यानां
खास सवलतीच्या ८ टक्के दराने वाजवी अनामत
रक्कम घेऊन कर्ज देते.

■ अधिक माहितीसाठी
आमच्या नजीकच्या शाखेशी संपर्क साधा.

**बँक ऑफ इंडिया**

RAAS/B/112 B MAR

वाहण्यास मदत होते. ह्या माध्यमाच्या द्वारे कुटुंबनियोजन, आरोग्य व आहार आणि शेतीचे आधुनिक तंत्र ह्याची माहिती ग्रामीण भागात पसरत चालली आहे. राज्य सरकारने चालविलेल्या रस्तावाहतुकीच्या मोटारींनी शहरे व खेडी ह्यांच्यातील अंतर अगदी कमी केले आहे. खेडी आता तुटक राहिलेली नाहीत. जवळच्या बाजारपेठेच्या कक्षेत ती आली आहेत. बाजारपेठेत जाऊन शेतकरी आपल्या गरजेच्या वस्तू विकत घेऊ शकतात. दिल्ली जवळचा काही भाग सोडला तर टेलिव्हिजन अद्याप उपलब्ध झालेला नाही. पण आता लवकरच मुंबई–पुणे विभाग दूरदर्शनाच्या परिघात येईल. पाठोपाठ इतर ठिकाणीही तो सुरू होईल. शिक्षणाचे हे दृक्‌श्राव्य साधन बदल घडवून आणणारे एक सुप्तावस्थेतील साधन आहे.

ग्रामीण भाग आता बराच भरभराटला आहे. शेती हा केवळ व्यवसाय राहिला नसून अनेक शेतकऱ्यांचा धंदा झाला आहे. रासायनिक खतांचा अधिक वापर, पाणी व इतर साधने ह्यांचा वाढता उपयोग ह्यामुळे ही भरभराट झाली आहे. औद्योगिक क्रांतीमुळे औद्योगिक वसाहती स्थापन झाल्या आहेत. त्यात काम करण्यासाठी जवळच्या ग्रामीण भागातून कामगार येत आहेत. नेहमी कार्यरत असलेल्या ह्या गांवांनी अनेक ग्राहकोपयोगी वस्तूंसाठी एक सुप्त बाजारपेठ निर्माण केली आहे. कामगाराच्या खिशात अधिक पैसा खुळखुळत आहे. त्यामुळे त्याला आपल्या राहणीचा दर्जा सुधारण्याची ईर्षा उत्पन्न झाली आहे. नाना प्रकारच्या ग्राहकोपयोगी वस्तू खरेदी करण्यात तो आपला पैसा वेचीत आहे. हाताने काम करणारा आणि डोक्याने काम करणारा ह्यांच्यामधील सामाजिक फरक हळूहळू लोपत चालला आहे. कुशल कामगार आणि कारकून ह्यांच्या उत्पन्नातील तफावत नाहीशी होत चालली आहे. त्यांना सारखेच उत्पन्न व सारखेच शिक्षण मिळत आहे. कधीकधी एकाच गृहनिर्माण मंडळाने बांधलेल्या बिऱ्हाडात ते राहात असतात. खेड्यांतून शहरात येण्याची प्रवृत्ती आणि नव्या औद्योगिक वसाहती ह्यांच्या प्रभावामुळे एकत्र कुटुंबपद्धती मोडून गेली आहे. तरुण पति–पत्नी आपल्या वडीलधाऱ्या मंडळींना न मानता जीवनाची मनपसंत घडी बसविण्यास आता स्वतंत्र झालेले आहेत. शहरी स्त्रियांना प्रसाधने वापरण्यात आता काही गैर वाटत नाही. त्या मोकळेपणाने सिनेमाला जातात अथवा पतीसह जेवण बाहेर घेतात.

भोवतालच्या परिस्थितीमुळे स्त्री ही नव्या वाटेने जाण्यास अधिक उत्सुक झाली आहे. आयुष्यातील आपल्या कार्याविषयी तिच्या कल्पना बदलल्या आहेत. फक्त घरकाम करून स्वस्थ बसण्याऐवजी इतर मनपसंत गोष्टींत लक्ष घालण्यास तिला आता अवसर मिळाला आहे. कुटुंब लहान झाले असल्याने तिला दोन अगर तीन मुलांचीच जोपासना करावी लागते आणि तरुणपणी सामाजिक जीवनाचा आस्वाद घेण्यास ती पूर्वीपेक्षा अधिक


## दि वाई अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि., वाई


### सुवर्ण महोत्सवी वर्ष

स्थापना : १९२१ ] [ ऑडिट वर्ग : अ

| | |
|---|---|
| भाग भांडवल | रु. ९७,२०० |
| गंगाजळी व इतर निधी | रु. २,२०,४०० |
| ठेवी | रु. २१,५१,३०० |
| कर्जे | रु. १६,२०,५०० |
| खेळते भांडवल | रु. २५,५१,४०० |

* ठेवीदारांसाठी विविध आकर्षक योजना
* वस्तुभाडे करारनामा ( हायर परचेस )
* सुरक्षित कप्प्यांची तालुक्यातील एकमेव सोय
* बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात

| | | |
|---|---|---|
| अ. स. भट | पां. रा. देशपांडे | प. कृ. अभ्यंकर |
| B. A., LL. B. | B. A., B. T. | B. Com., LL. B. |
| चेअरमन | सेक्रेटरी | मॅनेजर |




## दीपावली शुभचिंतन

# दि युनायटेड वेस्टर्न बँक लि.

मुख्य कचेरी: चिरमुले निकेतन, राजपथ, सातारा शहर.

स्थापना: १९३६. महाराष्ट्रांत सर्वत्र शाखा शेड्युल्ड बँक.

# बार्शी सेंट्रल अर्बन
## को-ऑपरेटिव्ह बँक लि., बार्शी

घोडे गल्ली, सोमवार पेठ, बार्शी (जि. सोलापूर)

दूरध्वनी बार्शी : २०२ वैराग : ४२ | स्थापना – १९०६ | शाखा वैराग ता. बार्शी

३० जून, १९७१ अखेरची स्थिती

| | |
|---|---|
| भाग भांडवल | रु. २,३६,२८० |
| गंगाजळी | रु. ४,४७,१४४ |
| ठेवी | रु. २९,६९,३०७ |
| गुंतवणूक | रु. ११,१८,४८२ |
| खेळते भांडवल | रु. ४०,३१,३२५ |

सर्व बँकिंगचे व्यवहार केले जातात.

ही दीपावली आमचे सभासद, खातेदार व हितचिंतकांस सुखाची व समृद्धीची जावो.

व. ह. उटगीकर
B. Com.
मॅनेजर

मा. वि. विश्वरूपे
B. Sc., L.L. B.
चेअरमन



★ नूतन दीपावली वर्ष सर्वांना सुखाचे, भरघोस यशाचे व समृद्धीचे जावो ! ★

# सांगली अर्बन
## को-ऑपरेटिव्ह बँक लि., सांगली

आपल्या माधवनगर, खणभाग, गावभाग, विश्रामबाग, बुधगाव, कसबेडिग्रज, भिलवडी व मराठवाड्यातील बीड व परभणी येथील शाखांसह, समाजातील लहानसहान घटकांपर्यंत आपली सेवा गेली पस्तीस वर्षे अखंडपणे रुजू करीत आहे.

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | रु. ९,००,००० |
| वसूल भांडवल | ... | रु. ७,२७,१३० |
| ठेवी | ... | रु. १ कोटी ४८ लाखांवर |
| कर्जे | ... | रु. २ कोटी २ लाखांवर |

—बँकिंगचे सर्व प्रकारचे व्यवहार केले जातात—

वि. ह. माईणकर
बी. एस्सी., एलएल्. बी.
कार्याध्यक्ष

ल. य. लागू
बी. ए., एलएल्. बी.
व्यवस्थापक



# पूना डिस्ट्रिक्ट सेंट्रल को ऑपरेटिव्ह बँक, लि. पुणे

(डिपॉझिट इन्शुअरन्स कॉर्पोरेशनचा कायदा, १९६१, कलम १३ अ अन्वये इन्शुअर्ड बँक)

## दिपावलीच्या मंगलप्रसंगी खालील दोन नूतन ठेवयोजना सादर करीत आहोत--

★ १. पुन्हा पुन्हा नूतनीकरणाचा त्रास चुकविण्यासाठी ऑटोमॅटिक एक्स्टेन्शन डिपॉझिट योजना.

या योजनेद्वारे पूर्वसूचना न देताही मुदत ठेवीचे १२ महिन्यांच्या मुदतीने नूतनीकरण केले जाते, त्यामुळे व्याजाचे नुकसान होत नाही.

★ २. ठेवीवर मासिक व्याजाचे उत्पन्न उपलब्ध करून देणारी सोशल सिक्युरिटी डिपॉझिट योजना.

या योजनेद्वारे प्रत्येकी रु. ५,००० च्या ५ वर्षापर्यंतच्या मुदत ठेवीवर दरमहा प्रत्येकी रु. २९ प्रमाणे व्याज देण्यात येते.

शिवाय नेहमीच्या चालू ठेव, बचत ठेव, कायम ठेव, रिकरिंग डिपॉझिट या आकर्षक योजना.

### या योजनेत आजच सक्रिय भाग घेऊन बँकेचे ठेवीदार व्हा.

बँकेच्या ठेवीदारांस व हितचिंतकास नूतन वर्ष सुखाचे व समृद्धीचे जावो.

डॉ. डी. बी. कदम
कार्यकारी संचालक

सा. मा. सातकर
एम. एल. ए.
अध्यक्ष

मोकळी आहे. दरम्यान, कुटुंबप्रमुखाच्या सत्तेला बऱ्याच मर्यादा पडलेल्या आहेत. पती पत्नीला आणि आईबाप मुलांना समानतेने वागवितात. निर्णय घेण्याचे काम सर्व कुटुंब करते. एक काळ असा होता की रेडिओसारखी एखादी गोष्ट कुटुंबातील कर्ता माणूस इतर कुटुंबियांना न विचारता घेत असे. आता कोणता रेडिओ घ्यावयाचा ते मुलेच सांगतात. आपले कपडेही तेच पसंत करतात. मोठ्या माणसांना अभिजात संगीत आवडत असले तरी मुलांना ठेक्यावरील गाणी आवडत असतात. खरे तर पिढ्यांमधील अंतर वाढत चालले आहे. मुलांना आपले आईबाप जुनाट वृत्तीचे वाटतात, तर आईबापांना आपली मुले फाजील स्वतंत्र अगर कधीकधी बंडखोर वाटतात. पूर्वीप्रमाणे विद्यार्थ्यांना गुरुजनां-विषयी तितकासा आदर वाटत नाही. विद्यार्थ्यांमधील असंतोष सर्व जगभर पसरलेला आहे. मग कारणे निराळी असोतही. अमेरिकेत भौतिक संपन्नता हे कारण असले तर भारतात बेकारीची शक्यता हे कारण असेल. औद्योगीकरण वाढत जाईल तसतसा लोकांना अधिकाधिक रिकामा वेळ मिळू लागतो. भारतात अजून ही परिस्थिती आलेली नाही. तरीपण रिकामा वेळ कसा घालवावा ह्यासंबंधी लोकांना अधिक समज आलेली आहे. आठवड्याच्या शेवटी कुटुंबासह सहलीसाठी जाणे आता अधिक रूढ झाले आहे. मध्यम वर्गात सुद्धा वार्षिक सुट्टी अगर रजा थंड हवेच्या ठिकाणी घालविणे लोकप्रिय होत चालले आहे. एका काळी ही चैन समजली जात असे आणि फक्त श्रीमंतच ती करीत असत. शिक्षण आणि राहणीचा दर्जा सुधारण्याच्या तीव्र इच्छेने व महागाईने स्त्रिया घराबाहेर पडून कामे करू लागल्या आहेत. पुष्कळदा स्त्रिया विवाहापूर्वी मिळविल्या झालेल्या असतात पण विवाहानंतरही त्या आपले अर्थार्जन चालूच ठेवतात. त्यांच्या आज्या-पणज्यांशी तुलना करता त्या बाह्य परिस्थितीने अधिक गुरफटलेल्या आहेत.

आता ह्या सर्व परिस्थितीचा ग्राहकांच्या खरेदी करण्याच्या वृत्तीवर काय परिणाम झाला आहे ते पाहू. एकतर कपड्यांची शैली बदलली आहे. साडी हे वस्त्र अजूनही भारतीय स्त्रीचे फार आवडते वस्त्र आहे आणि बराच काळ ते तसेच राहील असे दिसते. तरीसुद्धा साडीची जागा तुरळक प्रमाणात इतर पद्धतीची वस्त्रे घेऊ लागली आहेत. सलवार-खमीज, बेल बॉटम लुंगी, इत्यादी पोषाक स्त्रिया परिधान करू लागल्या आहेत. हे पोषाख साडीपेक्षाही अधिक रंगीबेरंगी आहेत. स्त्रियांचे पोषाख पिढ्यापिढ्यांतून बदललेले आहेत ही गोष्ट खरी. पण आता पुरुषांचे पोशाखही पुरुष परंपरेला अधिक चिकटणारा असूनही क्रांतीच्या तडाख्यात सापडले आहेत. त्यांच्या पोषाखातही अनेकरंगी विविधता दृष्टीस पडू लागली आहे, इतकी की एका ग्रंथकाराने ह्या क्रांतीचे वर्णन 'मयूरपंखी' क्रांती असे केले आहे. सुती कापड हे आतापर्यंत कापडांचा राजा मानले जात असे पण त्याची जागा कृत्रिम धाग्याच्या कापडाने घेऊ केली आहे. हे कापड शोभिवंत तर असतेच, पण त्याची धुलाई व इस्त्री


वैयक्तिक ममता व सामाजिक समता यांचा मेळ घालण्याचे महान कार्य सहकारी चळवळीमुळेच होऊ शकेल. सहकारी चळवळ म्हणजे समता व क्षमता यांचा समन्वय होय. याचेच प्रतिक म्हणजेच—

**दि डेक्कन को-ऑप. स्पिनिंग मिल्स लिमिटेड.,**

इचलकरंजी, जिल्हा : कोल्हापूर

चात्यांची संख्या — ५४,५२०

| | | |
|---|---|---|
| रा. द. गोवंडे | ग. कृ. कांवळे | अ. रा. भिडे |
| मॅनेजर | व्हाइस चेअरमन | चेअरमन |

**पेपको-मिल्स्, खोपोली**

...महाराष्ट्रातील एक अग्रेसर कागद कारखाना....

आमचे खोपोली येथील कारखान्यात औद्योगिक वेष्टणासाठी लागणारे विविध प्रकारचे कागद व पुठ्ठे तयार होतात.

**पेपर अँड पल्प कन्व्हर्शन्स् लिमिटेड, पुणे-५**

| | |
|---|---|
| रजिस्टर्ड ऑफिस : | मिल्स् : |
| ११८३, शिवाजीनगर, फर्ग्युसन कॉलेज रोड, पुणे-५ | खोपोली, जि. कुलाबा (महाराष्ट्र राज्य) |

दोन्ही सोपी आहेत. घरकाम करणारा मुंबईतील गडीसुद्धा काम संपल्यावर टेरेलिनचा शर्ट आणि पँट घालून सिनेमाला जाताना दिसतो. आहाराच्या सवयीसुद्धा बदलत आहेत.

गुलाबजाम आणि रसगुल्ले केवळ बंगालीच खातात असे नाही. डोसा व इडली सर्व भारताचे खाद्यपदार्थ झाले आहेत. तंदुरी चिकन सर्वत्र आवडीने खातात. आहार राष्ट्रीय स्वरूपाचा होत आहे. संस्कारित व डब्यातील अन्नपदार्थ, सुकविलेली भाजी, मोरंबे व जेली, फळांची सरबते, ब्रेड, इत्यादी पदार्थ आता मध्यमवर्गात सुद्धा लोकप्रिय झाले आहेत. पापड व लोणची बहुधा घरी केली जात नाहीत; बाहेरूनच आणली जातात. स्त्रियांना घराबाहेरील जगात लक्ष घालावेसे वाटू लागले आहे त्यामुळे त्यांना घराच्या भिंतीबाहेर पडणे शक्य असेल तर त्यातच कोंडले राहणे आवडत नाही. घरकामी नोकर मिळणे अवघड झाले आहे. टिकवून धरणेही कठीण झाले आहे. म्हणूनच सोयिस्कर तयार अन्नपदार्थांना तेजी आली आहे. शाकाहारी मांसाहारी होत आहेत. अंडी, मांस आणि मासे ह्यांचा खप वाढत आहे. बाहेर जेवणाची पद्धत पसरत आहे. कामासाठी घराबाहेर जाणारे स्त्रीपुरुष व शाळाकॉलेजांत जाणारी मुले आपले खाणे व भोजन बाहेर घेण्यास शिकली आहेत. अर्थातच घरात त्यांना लागणारे अन्न कमी झाले आहे. स्नानाच्या वेळी सुवासिक साबण वापरण्याची पद्धत सार्वत्रिक होत आहे. कमी उत्पन्न असणारे लोक आंघोळीसाठी सनलाईट साबणच वापरीत असत. आता मात्र ते सुवासिक साबण वापरू लागले आहेत. वरच्या उत्पन्नाच्या गटातील लोक भारी किंमतीच्या साबणाच्या वड्या जास्त जास्त वापरू लागले आहेत. रोजच्या धुण्यासाठी साबणाच्या जागी धुलाईच्या पावडरी वापरण्यात येऊ लागल्या आहेत. ही धुलाईची नवी पद्धत सोयीची तर आहेच, पण कृत्रिम धाग्याच्या कापडांना लागणारी नाजूक धुलाई त्यामुळे शक्य होते. नोकर मिळणे अवघड असल्यामुळे कपडे धुण्याची ही पद्धत अधिक सोपी आढळून आली आहे. भांडी घासण्यासाठी राख अगर माती अलीकडे कमी कमी वापरण्यात येत आहे. काचेची व चिनीमातीची भांडी साफ करण्यासाठी आणि मोऱ्या धुण्यासाठी घासण्या अधिक वापरल्या जाऊ लागल्या आहेत. ह्या कामासाठी काही द्रावणे मिळू लागली आहेत. सौंदर्यप्रसाधनाचा धंदा जोराने वाढीला लागला आहे. परदेशातून आयात केलेली प्रसाधने सहज मिळत नाहीत किंवा फार महाग असतात. म्हणून हिंदी स्त्रिया, विशेषत: तरुणी, हिंदी बनावटीच्या पावडरी, ओष्ठशलाका, रंग, भुवयांची व कातडीची प्रसाधने, शँपू इत्यादी गोष्टी वापरू लागल्या आहेत. इतकेच काय, पण पुरुषांना उपयुक्त अशी प्रसाधानेही आता मिळू लागली आहेत. घरे सुशोभित करण्याच्या नव्या कल्पना लोक बाळगू लागले आहेत. सहकारी गृहरचना सुरू झाल्यापासून अनेक कुटुंबांना स्वत:ची निवासस्थाने लाभली आहेत. त्यांची शोभा ते मनाप्रमाणे करून घेत आहेत. घरबांधणी योजनाद्वारे झोपडपट्टी दूर करण्यात येत आहे. ह्या योजनांतून कमी उत्पन्नाच्या गटातील लोकांनाही स्वतंत्र जागा मिळत आहेत. जेवणाचे टेबल, गॅस, प्रेशर कुकर ही साधने सामाजिक प्रतिष्ठा मिळवून देणारी झाली आहेत. कमी उत्पन्नाचे शहरांतील लोकही ती वापरू लागले आहेत. पंजाबमधील खेडेगावात तर सोफा सेटही दिसू लागला आहे. शहरांतून आणि ग्रामीण भागांतून टिकाऊ स्वरूपाच्या मालाची मागणी वाढू लागली आहे. ज्या ज्या भागांची एकदम भरभराट झाली आहे त्या त्या भागांतून सायकली, रेडिओ, शिवणाची यंत्रे, विजेचे पंखे, घड्याळे इत्यादी वस्तू दिसू लागल्या आहेत. शहरांतील रस्त्यावर फळे अगर भाजीपाला विकणारा व्यापारी काम करता करता विविध भारतीवरील संगीत ऐकू लागला आहे. दूरवर पसरलेल्या ग्रामीण भागातील शेतकरी नांगरट चालू असताना आपल्या ट्रॅन्झिस्टरवर हेच संगीत ऐकत असण्याची शक्यता आहे. नव्याने घेतलेल्या ट्रॅन्झिस्टरचा तोही उपभोग घेत आहे. मोटारी, वातानुकूल यंत्रे, टेलिफोन इत्यादी गोष्टी अजूनही वरिष्ठ मध्यमवर्गाच्या घरांतूनच दृष्टीस पडतात. तथापि, मध्यम उत्पन्न असलेल्या लोकांच्या घरांतून शीतपेटिका, स्कूटर्स, रेकॉर्ड चेंबर्स, टेपरेकॉर्डर्स इत्यादी वस्तूंनी प्रवेश केलेला आहे.

तात्पर्य; ग्राहक बदलत आहे, आणि तोही झपाट्याने. समाजातील पुढारलेला आणि पाश्चिमात्य वृत्तीचा वर्ग ह्या बदलाचा वेग नेहमीच ठरवीत आला आहे. हा वर्ग मधून मधून परदेशप्रवास करतो आणि भारतात बदल घडवून आणतो. त्याची सामाजिक प्रतिष्ठेची काही प्रतीके आहेत. आयात केलेली परदेशी मोटारगाडी, आधुनिक सुखसोयींनी सज्ज असा राहण्याचा फ्लॅट, फॅशन शोज, स्त्रियांचे कॉफी क्लब, मुलांना कॉन्व्हेंटमधील शिक्षण देणे, इत्यादी. त्याच्या मागोमाग जाण्याची व त्याचे अनुकरण करण्याची वरिष्ठ मध्यम वर्गाला फार हौस वाटते. ह्या वर्गात बहुधा पतिपत्नी दोघेही मिळवत असतात. कुटुंब लहान असते. त्यामुळे काही बचत होऊ शकते. ही बचत गुंतवून राहणीचे मान सुधारण्याच्या शर्यतीत धावण्याची त्यांची धडपड चालू असते. सामाजिक क्षितिजावर आणखी दोन वर्ग स्पष्टपणे दिसू लागले आहेत. एक कुशल अगर अकुशल औद्योगिक कामगारांचा आणि दुसरा ग्रामीण भागांतील शेतकऱ्यांचा. नवीन कामगारवर्ग बहुधा काही वर्षांपूर्वी खेड्यांतून शहरात आलेला असतो. तेथे त्याला अगदी नवीन परिस्थिती आढळून येते. आवतीभोवती होत असलेला बदल तो पाहात असतो. मोहक जाहिराती त्याच्यावर प्रभाव पाडत असतात; त्याच्याजवळ थोडाफार रोख पैसाही असतो. तो चांगले कपडे वापरतो. बिड्यांच्या ऐवजी सिगारेट्स ओढतो, सिनेमाला जातो आणि ट्रॅन्झिस्टर ऐकतो. ह्या गोष्टी त्याला नवीन असतात. हीच गोष्ट शेतकऱ्याची. शेजारचा संपन्न शेतकरी अनेक तऱ्हेच्या चैनीच्या वस्तू वापरत असल्याचे त्याला दिसते. तो जवळच्या बाजारात गेल्यावर तेथे त्याला अनेक आकर्षक वस्तू दिसतात. त्यांपैकी काही विकत घेण्याची त्याची ऐपतही असते. तो स्वतः शिकलेला नसला तरी तो आपल्या मुलाला जवळच्या शहरात अधिक शिकण्यासाठी पाठवितो. हा मुलगा सुट्टीत घरी आला की अनेक नव्या कल्पना घेऊनच येतो. हा बदल खरोखरच स्वागतार्ह आणि आधीच व्हावयास पाहिजे होता, ह्यात शंका नाही.

# सहकारी बँकातले कर्मचारी आणि त्यांच्या व्यथा

## आर्थिक, सामाजिक आणि मानसिक कुचंबणा

( शशिकान्त कुलकर्णी )

सर्वसाधारणपणे बँकेत नोकरी करणारा माणूस हा " जगी सर्व सुखी " असतो असे बऱ्याच वेळेला म्हटले जाते. या विधानात खूपच 'सत्यांश' आहे. 'सत्यांश' शब्द मुद्दाम वापरला. कारण हे विधान संपूर्ण सत्य नाही. म्हणजे असे की बँकांत व्यापारी बँका, नागरी बँका आणि सहकारी बँका असे काही मुख्य प्रकार आहेत आणि या भिन्न प्रकारच्या बँकांतल्या कर्मचाऱ्यांची परिस्थितीही एकमेकांहून भिन्न आहे.

यांपैकी सहकारी बँकातल्या कर्मचाऱ्यांची परिस्थिती ही जास्त विचारार्ह आहे. विशेषतः व्यापारी बँकातले कर्मचारी ( राष्ट्रीयीकरण होण्यापूर्वी सुद्धा ) आणि सहकारी बँकातले कर्मचारी यांच्या परिस्थितीत खूपच तफावत आहे. ही तफावत आर्थिक, सामाजिक आणि मानसिक या तिन्ही बाबतींत आहे.

सहकारी बँकांची वेतणश्रेणी ही तुलनेने व्यापारी बँकांपेक्षा तर कमी आहेच पण सध्याच्या महागाईच्या मानानेही कमीच आहे. सेवकांच्या वेतनश्रेणीत सुधारणा करणे हे सहकारी बँकांना अगदीच परवडण्यासारखे नाही असे नाही. पण त्या बाबतीत सहकारी बँकांच्या व्यवस्थापनाकडून जेवढे लक्ष देणे आवश्यक आहे तेवढे दिले जात नाही हे मात्र खरे ! आपल्या वेतनश्रेणी सुधारून घेण्यासाठी सहकारी बँकांच्या सेवकांमध्ये जी संघटना आवश्यक आहे तिचाही अभाव प्रकर्षाने आढळतो, आणि मुख्य म्हणजे ही संघटना एखाद्या बँकेपुरतीच मर्यादित असून भागणार नाही. व्यापारी बँकांमधील अखिल भारतीय ( ए. आय. बी. ई. ए. ) संघटनेसारखी एखादी प्रबळ संघटना देशाच्या सर्वच सहकारी बँकांतल्या कर्मचाऱ्यांसाठी असणे आवश्यक किंबहुना अपरिहार्य ठरावे.

सामाजिक परिस्थितीचा विचार करतानाही सहकारी बँकातले कर्मचारी हे फारसे सुखी नाहीत. या परिस्थितीमुळे केवळ सहकारी बँकेतच नव्हे तर सहकारी क्षेत्रात काम करणाऱ्या व्यक्तींबद्दल समाजात तुलनेने तितकासा जिव्हाळा आढळत नाही. सहकारी बँकेत किंवा सहकारी क्षेत्रात अपरिहार्यपणे का होईना पण नोकरी करतो हे सांगताना यत्किंचितही अभिमान न वाटणारी माणसे माझ्या माहितीत आहेत. वास्तविक आपण ज्या संस्थेत नोकरी करून उदरनिर्वाह करतो त्या संस्थेबद्दल अभिमान बाळगणे हे कर्तव्य आहे, यात शंकाच नाही. पण कर्तव्यामागे सुद्धा जी एक प्रेमाची आणि आदराची भावना असते ती सहकारी क्षेत्राच्या बाबतीत शून्य होते.

या आर्थिक आणि सामाजिक परिस्थितीत सापडलेला सहकारी बँकेतला कर्मचारी नोकरी करताना मानसिकरीत्या तरी संतुष्ट असतो का ? या प्रश्नाचेही उत्तर अनुकूल देणे अवघड आहे. नोकरीतल्या मर्यादित क्षेत्रातही त्या कर्मचाऱ्यांवर अनेक दडपणे असतात. एक तर या कर्मचाऱ्यांचे आणि व्यवस्थापक वर्गाचे संबंध क्वचितच सहानुभूतीचे असतात. सेवकांची दुःखे, त्यांच्या अडीअडचणी समजावून घेण्याची तयारी व्यवस्थापनाच्या बाजूने फारच थोडी असते. इतकेच काय पण एखादा व्यवस्थापकीय अधिकारी आणि इतर सेवक वर्ग यांच्यात ज्येष्ठ-कनिष्ठ या नित्य संबंधाखेरीज मानवी संबंध असू शकतो किंवा असायला हरकत नाही, ही जाण अभावानेच आढळते.

सहानुभूतिशून्य व्यवस्थापकीय यंत्रणा आणि प्रसंगी बँकेच्या संचालकांचे दडपण या कात्रीत सहकारी बँकेचा कर्मचारी अधिकाधिक जखडत चाललेला आहे.

सहकारी बँकातल्या कर्मचाऱ्यांना काही संरक्षण आहे का ? त्यांना शासन करण्याचा निर्णय हा पूर्ण विचारांती घेतला जातो का ? त्यामागे काही अंतर्गत राजकारण असते का ? आणि महत्त्वाचा प्रश्न असा की, ज्या चुकासाठी सेवकांना शासन करतात त्या चुकीला तो सेवक एकटाच जबाबदार असतो का ? प्रत्यक्षात परिस्थितीचे अवलोकन केले तर सगळ्याच प्रश्नांची उत्तरे असमाधानकारक मिळतात.

एखाद्या गंभीर चुकीबद्दल संबंधित सेवकाला शासन मिळणे, प्रसंगी कामावरून कायमचे दूर करणे, हे अगदी रास्तच आहे. एखादा कर्मचारी स्वार्थासाठी म्हणजे अफरातफरीच्या उद्देशाने गंभीर चूक करीलही. पण सर्वसाधारणपणे शासन करण्याचा प्रसंग हा अयोग्य कर्जव्यवहाराचे बाबतीत ओढवतो असा इतिहास आहे. मंजुरीपेक्षा जास्त कर्जवाटप होणे, मंजुरीपूर्वी कर्जवाटप होणे किंवा कर्जप्रकरणांची खऱ्या अर्थाने पूर्ण छाननी न करता खोट्या माहितीच्या आधाराने कर्जप्रकरण मंजूर करून घेणे, अशी अनेक कारणे सस्पेंड करण्यामागे संभवतात. जरा विचार केला तर अशा प्रकारच्या ज्या चुका होतात त्यामागे एकाच सेवकाला जबाबदार धरणे हे खरोखरच अन्यायाचे आहे.

जिल्ह्यातल्या प्रत्येक तालुक्याला मध्यवर्ती बँकेच्या संचालक मंडळात प्रतिनिधित्व मिळावे आणि आपापल्या तालुक्याच्या अडीअडचणी, गरजा, सनदशीर मार्गाने सोडवणे आणि प्रत्येक व्यक्तीसह तालुक्याचा आणि पर्यायाने जिल्ह्याचा विकास साधणे इतका प्राथमिक पण अतिशय चांगला हेतू आजकाल क्वचितच सापडतो. निवडून गेलेला तालुक्यातला प्रतिनिधी हा स्वतःची तथाकथित प्रतिष्ठा सांभाळण्याच्या आणि वाढवण्याच्या नादात सहकाराचे सर्व सद्हेतू सोइस्करपणे विसरून जातो.

स्वतःची प्रतिष्ठा सांभाळण्यासाठी हा प्रतिनिधी किंवा संचालक बँकेच्या माध्यमाचा सर्रास गैरवापर करतो. कर्जवाटप हा त्यातलाच एक भाग! 'मी बँकेचा संचालक आहे आणि माझ्याकडे खूपच अधिकार आहेत' असे ठामपणे भासवून हा संचालक बँकेच्या अध्यक्षाशी किंवा प्रमुख व्यवस्थापकाशी कसलाही विचारविनिमय न करता परस्पर बँकेच्या तालुक्यातील अधिकाऱ्याकडे जातो आणि पाहिजे ती कामे त्याच्याकडून करवून घेतो. बँकेच्या अधिकाऱ्याला संचालकाच्या आज्ञा पाळण्यावाचून गत्यंतरच नसते. आज्ञा न पाळल्यावर रिव्हर्ट करणे, बदली करणे, पगारवाढ रोखणे, असे अनेक प्रकारचे छळ आणि धमक्या त्याला सहन कराव्या लागतात. आज्ञापालन करावे तर बऱ्याच वेळेला नियमबाह्य व्यवहार होऊन अधिकारी अडचणीत येतो आणि त्या वेळी संबंधीत संचालक सोइस्करपणे हात झटकून मोकळा होतो. इतकेच काय, पण तो संचालक हात झटकून मोकळा व्हावा म्हणून इतरही कित्येक संचालक त्याला मदत करतात. हे दुष्टचक्र जोपर्यंत अस्तित्वात आहे तोपर्यंत सहकारी बँकांतल्या कर्मचाऱ्यांच्या मनावरचे दडपण दूर होणे सर्वथैव अशक्य आहे. अर्थात हे दुष्टचक्र थांबविणे ही बाब फारच कठीण आहे. त्याची मुळे फार खोलवर रुतलेली आहेत.

या सर्व विवेचनामागे एकच हेतू आहे, तो असा की सहकारी बँकातल्या सेवकांची परिस्थिति सर्वार्थाने सुधारण्याचा प्रयत्न होणे खरोखरच आवश्यक आहे, हा विचार प्रसारित व्हावा. देशाच्या अर्थव्यवस्थेत तसे म्हटले तर सहकारी बँकांचा वाटा फार मोठा आहे आणि तसा तो अपेक्षितही आहे. पण हा वाटा उचलणारे कर्मचारी मात्र फार उपेक्षित आहेत ही गोष्ट तितकीशी योग्य नाही. या कर्मचाऱ्यांचा आर्थिक, सामाजिक आणि मानसिक दर्जा सुधारणे याबद्दल जारूगक प्रयत्न होणे जरूर आहे.


नवनवीन फॅन्सी माल ! योग्य किंमत ! !

बनारसी शालू, कांजीवरम, कोईमतूर, बंगलोर साड्या व अनेक फॅन्सी साड्यांचा भरपूर स्टॉक ! तसेच इतर सर्व प्रकारच्या मालासाठी

शाहाडे आठवले [प्रा. लि.] दादर

टेलि. : ४५४५५४)

आणि

शाहाडे आणि कंपनी, गिरगांव

टेलि. : ३५६१३१)

मुंबई ४.

रिगल बेकरी

गोखले चौक, पुणे ४

सप्रे टेलर्स

अप्पा बळवंत चौक, पुणे ३०

### पीक विमा-योजनेचा भारतातील एक प्रयोग

काही ना काही नैसर्गिक आपत्तीमुळे भारतातील शेतीची पिके नष्ट होतात. त्यामुळे शेतीच्या धंद्याला जुगाराचे स्वरूप प्राप्त होऊन शेतकऱ्यांचे भयंकर नुकसान होते. यावर एक उपाय म्हणजेच पीक-विमा. पिक-विम्याची योजना बऱ्याच वर्षांपासून सरकारच्या विचाराधीन आहे. पण या योजनेतील धोका आणि शेतीच्या धंद्यातील नुकसानीचे स्वरूप, प्रमाण वगैरेंबाबत वास्तव पण खात्रीशीर माहिती उपलब्ध नसल्यामुळे अशा प्रकारची योजना कार्यान्वित होऊ शकत नव्हती व नाही.

या दृष्टीने, संकरित कापसाच्या पिकाबाबत पीक-विमा योजना, प्रयोग म्हणून लागू करण्याचा आयुर्विमा मंडळाचा निर्णय स्वागतार्ह आहे. गुजरात स्टेट फर्टिलायझर्स कार्पोरेशन आणि इंडियन कॉटन मिल्स असोसिएशन यांच्या सहकार्याने ही प्रायोगिक योजना मंडळाने १९७२–७३ च्या हंगामापासून लागू करण्याचे ठरविले आहे. गुजराथ खत मंडळाने तयार केलेल्या ह्या योजनेप्रमाणे गुजराथ राज्यातील भडोच, बडोदा व खेडा या जिल्ह्यांतील सिंचनाखालील संकरित–४ या जातीच्या कापसाच्या पिकाच्या ३०० एकराला ती लागू होणार आहे. खत-मंडळ आपल्या देखरेखीखाली खते, जंतुनाशके वगैरेंचा पुरवठा करणार असून भारतीय कापड-गिरणी मंडळातर्फे तज्ज्ञ सल्लामसलत मिळणार आहे. इतकी व्यवस्था करण्यात आल्यावरही पीक नष्ट झाले तर आयुर्विमा मंडळ एकरी १७५० रु. प्रमाणे शेतकऱ्याचे नुकसान भरून देणार आहे. या रकमेत शेतकऱ्याने पाणी, मजूरी, खते वगैरेंवर प्रत्यक्ष केलेला खर्च समाविष्ट करण्यात आला आहे. विम्याचा हप्ता फक्त दोन टक्के राहील.

या योजनेमुळे पीक-विमायोजनेसाठी तांत्रिक स्वरूपाची माहिती व तज्ञता उपलब्ध होईल अशी अपेक्षा आहे. पण प्रत्यक्षात ही अपेक्षा कितपत पुरी होईल याबद्दल शंकाच येते. कारण बागायती पीक सर्व साधनसामग्री उपलब्ध करून दिल्यावर फसल्याची व नुकसान झाल्याची उदाहरणे सहसा सापडणार नाहीत. तेव्हा ही सर्व योजना मुळात वास्तव दिसत नाही. तसेच प्रयोगासाठी निवडलेल्या क्षेत्रावरून सर्व पिकांबाबत व भारतासारख्या खंडप्राय देशाला उपयोगी पडेल अशी आकडेवारी मिळून ती उपयुक्त ठरण्याची शक्यता फार कमी वाटते. असे असले तरी, एक छोटासा व तोही शेतकऱ्यांच्या जीवनाशी अगदी निगडित असा हा प्रयोग असल्यामुळे असलेला त्याच्याकडे सर्वांनी लक्ष देणे मनोरंजक व उपयुक्त ठरेल.

---

### मक्तेदारीने कापूस खरेदण्याचा अधिकार सरकारकडे

मक्तेदारीने कापूस खरेदी करण्याचा अधिकार आपणाकडे घेण्यासाठी महाराष्ट्र सरकारने एक बील नुकतेच विधी मंडळापुढे मांडले आहे. ह्या-बिलाप्रमाणे कोणत्याही खाजगी व्यापाऱ्याला कापूस खरेदी करता येणार नाही अगर राज्याबाहेर तो पाठविता


# ओगले
## प्रभाकर कंदील

- अंधाऱ्या रात्री,
- वादळी वाऱ्यात,
- ओबड-धोबड रस्त्यावर,
- खवळलेल्या दर्यावर

**मार्गदर्शक व विश्वसनीय.**

तयार करणार
ओगले ग्लास वर्क्स लिमिटेड
ओगलेवाडी ( जि. सातारा )



तारेचा पत्ता : "मॉर्गेज" नी | दूरध्वनी मुख्य कार्यालय : २६७८० १/२/३ (३ लाईन्स)
कार्यकारी संचालक : २६१४९७ (डायरेक्ट लाईन)
उपकार्यालय नं.१: २६०३०६ नं.२: २९०००६

## दि महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह लँड डेव्हलपमेंट बँक लि.

जे. के. बिल्डिंग, १ रा माळा, नरोत्तम मोरारजी मार्ग, बॅलार्ड इस्टेट, मुंबई नं. १.
( स्थापना १९३५ )

महाराष्ट्र राज्यातील २७ प्राथमिक भूविकास बँका ह्या बँकेस संलग्न आहेत. बँकेने तगाई योजनेखाली विहिरी, ऑईल इंजिन्स, पंपिंग सेट्स, इलेक्ट्रिक मोटर्स तसेच जमीनसुधारणेकरिता कर्ज-वाटपाचा व्यवहार हाती घेतला आहे. जून १९७० अखेर बँकेचे भागभांडवल ७ कोटी ८१ लाख, गंगाजळी ५६ लाख, ऋणविमोचन निधीची गुंतवणूक ३६ कोटी व येणे कर्ज १०४ कोटी आहे.

नी. आ. कल्याणी
अध्यक्ष

रा. गो. गोखले
व्यवस्थापक

जी. पी. भावे
कार्यकारी संचालक

येणार नाही. राज्य सरकार बाजारातील सर्व कापूस महाराष्ट्र राज्य सहकारी मार्केटिंग फेडरेशनमार्फत खरेदी करील. ज्या शेतकऱ्याला आपला कापूस विकावयाचा असेल त्याने तो सरकारला खरेदी केंद्रात दिला पाहिजे. कापसाची प्रतवारी ठरविणे, त्यावर प्रक्रिया करणे वगैरे गोष्टी शेतीमाल कायद्यातील तरतुदीप्रमाणे करण्यात येतील. भारत सरकारच्या विचाराने राज्य सरकार कापसाचा गॅरंटी दर ठरवील व त्याप्रमाणे ८०% किंमत अॅडव्हान्स म्हणून दिली जाईल. सल्लागार समितीच्या सल्ल्यावरून अखेर किंमत राज्य सरकार ठरविणार आहे. ही अखेरची किंमत गॅरंटी किमतीपेक्षा कमी असेल तर गॅरंटी किंमत दिली जाईल. किंमत चढउतार फंड निर्माण केला जाईल. या फंडात राज्यसरकार एक कोटी रुपयांची रक्कम सुरुवातीस घालील. अखेरची किंमत ही गॅरंटी किंमतीपेक्षा जास्त असेल तर शेतकऱ्याला गॅरंटी किंमत दिली जाईल. याशिवाय दोन्ही किमतीतील फरकाचा एक-तृतीयांश भाग व विविक्षित बोनस त्याला मिळेल. या नंतर राहिलेली रक्कम किंमत चढउतार फंडात घातली जाईल. जिनिंग अॅण्ड प्रेसिंग फॅक्टरींना मालपुरवठ्याबाबत हुकूम सोडण्याचा अधिकार सरकारने आपणाकडे घेतला असून फॅक्टरींनी हुकूम पाळले पाहिजेत. अशा फॅक्टरींसाठी सरकार नियंत्रक नेमू शकेल. ह्या बिलान्वये राज्य सरकारला दोन कोटी रुपयाची आर्थिक जबाबदारी घ्यावी लागणार आहे. ह्या बिलाची मुदत ३० जून १९८० पर्यंत राहणार आहे.

### अमेरिकन लोकांचा आहार रोगांना कारण

अमेरिकेची अर्थव्यवस्था आजारी झाल्याचे डॉलरवर कोसळलेल्या संकटामुळे आता जगजाहीर झाले आहे. पण तेथील अर्थव्यवस्थाच केवळ दुखणाईत आहे असे नव्हे. तेथील नागरिकही आजारी होत असून त्यांच्या आजाराला कारण त्यांचा आहार आहे, असा अभिप्राय कॅलिफोर्निआ विद्यापीठातील आहारतज्ज्ञ डॉ. जॉर्ज ब्रिग्ज ह्यांनी व्यक्त केला आहे. न्यूयॉर्क येथे व्हिटॅमिन इन्फरमेशन ब्यूरो ह्या नावाची एक संघटना आहे. संघटनेने वृत्तपत्राच्या संपादकांचा आणि लेखकांचा एक परिसंवाद आयोजित केला होता. त्यात बोलताना डॉ. ब्रिग्ज म्हणाले की अमेरिकन लोकांचा आहार म्हणजे राष्ट्रीय आपत्ती आहे. अमेरिकेतील लोकांचा आहार अयोग्य असून त्याचे परिणाम रोगांच्या उद्‌भवात दिसून येत आहेत. लोकात शारीरिक आजार, मानसिक व्यथा, मेदवृद्धी, हृदयविकार, दंतरोग, अतिरिक्त मद्यपान, इत्यादींचा सुळसुळाट झालेला दिसून येतो. त्यांचा आहार म्हणजे एक अजब मामला आहे. अमेरिकन लोक जितके इतर अन्नपदार्थ खातात त्याच्यापेक्षा अधिक प्रमाणात साखर, चरबीयुक्त अन्न आणि गव्हाचे पीठ खातात. ते दरसाल दरडोई ४६.२ किलोग्रॅम साखर, २४ किलोग्रॅम चरबीयुक्त अन्न, ४५ किलोग्रॅम पांढरी कणीक, ६.४ किलोग्रॅम कॉर्न शुगर आणि ३.२ किलोग्रॅम पूर्ण सडलेला पांढरा तांदूळ खातात. ह्या अन्नपदार्थांची बेरीज १२४.८ किलोग्रॅम होते. त्यांच्या खाण्यातील इतर अन्न-पदार्थांचे वजन ११७.५ किलोग्रॅम इतके भरते. हा आहार अतिशय भयंकर स्वरूपाचा आहे.


—दीपावली अभिष्टचिंतन—

ही दीपावली व नूतन वर्ष आमचे ठेवीदार, सभासद व हितचिंतक यांना सुखाची जावो.

## दि नासिक मर्चंटस् को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड,

म. गांधी रोड, नासिक-३

शाखा-(१) सकाळ-संध्याकाळ शाखा म. गांधी रोड, नासिक१. (२) पंचवटी-केला रोड, नासिक-३ (३) नासिक इंड. इस्टेट शाखा, नासिक-७. (४) टिळकवाडी शाखा-शरणपूर रोड, नासिक

भद्रकाली येथे लौकरच शाखा सुरू करीत आहोत.

| | ता. ३०-६-७१ |
|---|---|
| भागभांडवल | २,५६,००० |
| रिझर्व्हस् | १,३१,००० |
| ठेवी | ५२,९३,००० |
| दिलेली कर्जे | ४८,२३,००० |
| खेळते भांडवल | ७५,४९,००० |

डिपॉझिट इन्शुअरन्स कार्पोरेशनची सभासद असलेली नासिककरांची जिल्ह्यातील बँक

म. ग. शुक्ल, चेअरमन — मु. शं. औरंगाबादकर, मॅ. डायरेक्टर

ग. वि. अष्टपुत्रे, व्हा. चेअरमन — व. के महादेवकर, मॅनेजर



## श्री. वा. काळे, संपादक अर्थ, ह्यांची लोकप्रिय पुस्तके

* १. कण आणि क्षण * २. पुढे पाऊल * ३. तुमचे स्थान कोणते? * ४. जया अंगीं मोठेपण
* ५. दाणे आणि खडे * ६. कौटुंबिक हितगुज * ७. रणजी * ८. नवी घडी नवे जीवन
* ९. सुखी जीवननी पगदंडी (गुजराती) * १०. सदाचारने पगले (गुजराती)
* ११. नव्या जीवनाची शानदार घडी

### अभिनव पुस्तक मंदिर, फर्ग्युसन कॉलेज रोड, पुणे ४



हे पत्र पुणे, पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यात, या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनी छापिले व 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणे ४, येथे प्रसिद्ध केले. (वार्षिक वर्गणी रु. ६)

# दि धुळे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., धुळे

स्थापना : १३-९-१९५७ मुख्य कचेरी :—गरुड बाग, धुळे ( पोस्ट बॉक्स नं. ३ )

★ ह्या बँकेत ठेवलेला पैसा शेतकऱ्यांच्या व औद्योगिक सहकारी संस्थांच्या प्रगतीसाठी वापरला जातो.

★ बँक अल्प मुदतीच्या ठेवी आकर्षक व्याजाच्या दराने स्वीकारते. वाढत्या प्रमाणात ठेवी ठेवून जिल्ह्यात शेतकऱ्यांना साहाय्य करण्यास आम्हांस मदत करा.

| | | |
|---|---|---|
| | | ता. ३०-७-१९७१ |
| अधिकृत भांडवल | ... | रु. १ कोटी, ५० लाख |
| भरपाई झालेले भाग भांडवल | ... | रु. ९४ लाख, २० हजार |
| ठेवी | ... | रु. ४ कोटी, ३३ लाख |
| कर्जे | ... | रु. ६ कोटी, २४ लाख |
| खेळते भांडवल | ... | रु. ८ कोटी, ३० लाख |

जिल्ह्यात ह्या बँकेची मुख्य कचेरी व ३२ शाखा अविरत कार्य करीत आहेत.

—आवाहन—

**या बँकेच्या अल्पठेव योजनेवर सर्वसाधारण जनता बेहद्द खुष आहे.** कारण

- पैसे भरण्यासाठी बँकेत जावे लागत नाही, चलन भरावे लागत नाही, एवढेच नव्हे तर बँकेचे अधिकारी घरी अगर दुकानावर येऊन पैसे घेऊन जातात व आवश्यक ते रेकॉर्ड ( नोंदणी पत्रक ) तेथे भरून देतात.
- रोज २५ नवे पैसे किंवा त्याच्या पटीवर म्हणजे ५० नवे पैसे, ७५ नवे पैसे अगर १ ते १०० रु. पर्यंत रकमा स्वीकारल्या जातात. या खात्यात दर महिन्यास रु. ५ आणि रु. ५ च्या पटीत रकमा ठेवता येतात आणि तसेच आपली ही बँक रिकरिंग डिपॉझिट खात्यावर ७ टक्क्यांपर्यंत व्याज देते.
- आपण एक वेळ येऊन आपले व आपल्या मित्राचे खाते उघडा व या अमूल्य संधीचा फायदा घ्या. —मॅनेजर



दीपावली व नूतन वर्ष आमच्या असंख्य ग्राहकांना सुखाचे व भरभराटीचे जावो !

**सेवा – सहकार – सचोटी**

हे आमच्या बँकेचे आधारस्तंभ होत शाखांची संख्या : ३१

# दि बेळगाव जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.

हेड ऑफिस : १५० भांदुर गल्ली, बेळगाव.

**प्र ग ती चे पा ऊ ल**

| | | | |
|---|---|---|---|
| १. अधिकृत भांडवल | रु. १,७५,००,००० | ४. ठेवी | रु. ५,१६,६७,८७३ |
| २. वसूल भांडवल | रु. १,०१,८३,१०० | ५. खेळते भांडवल | रु. ९,४०,६३,३२८ |
| ३ रिझर्व्ह व इतर फंड | रु. ३६,६४,८८३ | ६. दिलेली कर्जे | रु. ७,३७,६९,३६६ |

**१९७०-७१ चा निव्वळ नफा १३,२३,७७१**

ही बँक शहरी व ग्रामीण जीवन सुधारणेच्या कामी, त्याचप्रमाणे अधिक धान्य पिकविण्याच्या मोहिमेसाठी शेतकऱ्यांना कमी व्याजाच्या दराने कर्जे देऊन सर्वतोपरी साहाय्य करीत आहे. तसेच, त्यांच्या मालास योग्य किंमत येऊन त्यांचा धंदा किफायतशीर व्हावा यासाठी सेल सोसायट्या व विविधोद्देश संघामार्फत विक्री करून देण्याच्या कामी त्यांना मदत करीत आहे.

या बँकेच्या सर्व शाखांमध्ये चालू व सेव्हिंग्ज बँक ठेवी, एक महिन्यापासून पाच वर्षांवरील मुदती ठेवी व तसेच रिकरिंग ठेवी स्वीकारण्यात येतात तसेच सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहारही केले जातात.

बेळगाव बझार, बैलहोंगल व सौंदत्ती येथील शाखांमध्ये मौल्यवान जिनसांच्या सुरक्षिततेसाठी सेफ डिपॉझिट लॉकर्सची व्यवस्था आहे. जिल्ह्यातील प्रमुख शहरांमध्ये आमच्या ३० शाखा आहेत.

जी. व्ही. घोडगेरी, व्हाइस प्रेसिडेंट. — विशेष माहिती बँकेचे ऑफिसमध्ये मिळेल. — एम्. एस्. होसमनी, प्रेसिडेंट.

**ARTHA**
Divali Number, 1971
Price Rs. 2 = 00

LICENCED TO POST WITHOUT
PREPAYMENT
Reg. No. MH. 80, Licence No. 175




हे पत्र पुणे, पेठ शिवाजीनगर, घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यात या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनी छापिले व